सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०२ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एलपीजी सिलेंडर झाला महाग महिन्याच्या १ तारखेला झटका

मुंबई: वर्षाच्या शेवटच्या महिन्यातील डिसेंबरच्या पहिल्या तारखेला महागाईचा मोठा झटका बसला आहे. तसेच तेल वितरण कंपन्यांनी एलपीजी गॅस सिलेंडरच्या किंमतीत वाढ केली आहे. विविध शहरांतील कंपन्यांनी किंमती जाहीर केल्या आहेत. यानुसार १९ किलोच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात १८ रूपयांपर्यंत वाढ झाली आहे. याआदी नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेलाही सिलेंडरचे दर वाढले होते. दरम्यान, १४ किलोंच्या सिलेंडरच्या दरात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.



बदलानंतर हे आहेत नवे दर

एलपीजी सिलेंडच्या दरात १ डिसेंबरपासून बदल करण्यात आलेले आहेत. दिल्लीपासून ते मुंबईपर्यंत या दरात बदल झाले आहेत. १ डिसेंबरला देशाची राजधानी दिल्लीमध्ये १९ किलोच्या एलपीजी सिलेंडरटे दर १८१८.५० रूपये झाले आहेत. आधी हे दर १८०२ रूपये होते.

| शहरे | वाढलेले दर | आधीचे दर |
|---|---|---|
| दिल्ली | १८१८.५० रूपये | १८०२ रूपये |
| कोलकाता | १९२७ रूपये | १९११.५० रूपये |
| मुंबई | १७७१ रूपये | १७५४.५० रूपये |
| चेन्नई | १९८०.५० रूपये | १९६४.५० रूपये |

घरगुती गॅस सिलेंडरचे दर स्थिर

बऱ्याच कालावधीपासून १९ किलोच्या कमर्शियल गॅस सिलेंडरच्या दरात सातत्याने वाढ पाहायला मिळत आहे. मात्र १४ किलोंच्या घरगुती सिलेंडरच्या दरात मात्र कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.

# महाराष्ट्राच्या हिताचा योग्य तो निर्णय होईल : एकनाथ शिंदे

सातारा : मोदीजी आणि अमित शाह जो निर्णय घेतील तो मला आणि शिवसेनेला मान्य असेल, याबाबत मी स्पष्ट केले आहे. गृह खात्याबाबत चर्चा होईल. लोकांना जी आश्वासनं दिली आहेत, ती पूर्ण करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. सर्वात महत्त्वाचं मला काय मिळालं, दुसऱ्याला काय मिळालं हे महत्त्वाचं नसून जनतेला काय मिळणार आहे हे महत्त्वाचं आहे. उपमुख्यमंत्रिपद श्रीकांत शिंदेंना मिळणार अशा चर्चा आपण पत्रकारच चर्चा करत असता. या सर्व चर्चा आहेत. एक बैठक अमित भाई यांच्यासोबत झाली आहे. दुसरी बैठक आमची तिघांची होईल. त्यामधून महाराष्ट्राच्या हिताचा योग्य तो निर्णय होईल, असे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.



एकनाथ शिंदे यांनी भाजपचे केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल, त्याला आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले आहे. मात्र, दुसरीकडे एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद मिळणार, या आणि अशा अनेक चर्चा रंगत आहेत. या पार्श्वभूमीवर साताऱ्यातील दरे गावात शिंदे यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली.

शिंदे म्हणाले, विरोधक काहीही बोलतात त्यांना काही काम राहिलेलं नाही. आमच्यामध्ये कोणताही समन्वयाचा अभाव नाही. विरोधकांना काही काम नाही, अगदी विरोधी पक्षनेता देखील होता येत नाही. एवढं संख्याबळ आता त्यांचं कमी आहे. झारखंडमध्ये ते जिंकले त्यावेळी काही प्रॉब्लेम नव्हता. लोकसभेमध्ये ते जिंकले त्यावेळी काही प्रॉब्लेम नव्हता. लाडक्या बहिणींचा मोठा सहभाग या विजयामध्ये आहे. या भावांनी शेतकऱ्यांनी आम्हाला प्रेम दिलं, या सर्वांच्या आशीर्वादामुळे ही निवडणूक आम्ही जिंकलो. फेरमत मोजणीबाबत निवडणूक निवडणूक आयोग निर्णय घेईल. जेव्हा तुम्ही हरता तेव्हा ईव्हीएम खराब आहे, जेव्हा जिंकता त्यावेळेस ईव्हीएम चांगला आहे, त्यांनी एकच भूमिका घेणे गरजेचे आहे, असंही शिंदे यांनी नमूद केलं.

मी जनतेचा मुख्यमंत्री आहे. अडीच वर्ष मी कॉमन मॅन म्हणून मी काम केले. निवडणुकीच्या धावपळीमुळे तब्येत बिघडली होती. रोज आठ, दहा सभा मी घेत होतो. परंतु आता माझी प्रकृती आता बरी आहे, असंही शिंदेंनी स्पष्ट केले.

# मी डोंबिवलीतच, दिल्लीला गेलेलो नाही : रवींद्र चव्हाण

तभा वृत्तसेवा /विशेष प्रतिनिधी :

मुंबई दि.१ डिसेबर:

महायुती दोन सरकार मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनतील अशी दाट शक्यता असली तरीही अद्याप त्यांच्या नावाची घोषणा अधिकृतपणे करण्यात आलेले नाही. त्यामुळे भाजपाचा विधानसभेतील नेत्याबाबत विविध तर्क व्यक्त करण्यात येत असून ते सोशल मीडियावर वायरल होत आहेत. त्यामध्ये डोंबिवली विधानसभा मतदारसंघातील भाजपचे नवनिर्वाचित आमदार आणि ज्येष्ठ नेते रवींद्र चव्हाण यांचेही नाव चर्चेला येत आहे. शनिवारी ते तातडीने दिल्ली येथे गेल्याची चर्चा समाजमाध्यमांवर पसरली होती. त्याबाबत चव्हाण यांनी एक्स' वरून मी डोंबिवलीतच आहे, मी दिल्लीला गेलेलो नाही, असा खुलासा केला आहे.

गेल्या तीन दिवसांपासून मी माझ्या डोंबिवली विधानसभा मतदारसंघात आहे. सद्यस्थितीत डोंबिवलीतील नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहे. मी दोन दिवसात किंवा मध्यरात्री कुठल्याही वरिष्ठ नेत्याच्या भेटीसाठी दिल्ली अथवा अन्य ठिकाणी गेलेलो नाही, असे स्पष्टीकरण देऊन चव्हाण यांनी आपल्या बाबत सुरू असलेल्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

विधानसभा निवडणुकीचा निकालआठवडा उटूनही तरी राज्याचा मुख्यमंत्री ठरत नसल्याने राज्याच्या मुख्यमंत्री पदावरून विविध प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. या चर्चेच्या माध्यमांतून अफवा पसरत आहेत. राज्याचा मुख्यमंत्री ठरविण्याच्या जोरदार हालचाली दिल्लीत भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात सुरू आहेत. मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाबरोबर, या चर्चेबरोबर मराठा चेहरा महाराष्ट्राला देण्याची गरज असल्याच्या चर्चा भाजपच्या वरिष्ठ वर्तुळात आहेत.

भाजपमधील एक मोठा गट मात्र देवेंद्र फडणवीस यांनाच मुख्यमंत्री करावे, यासाठी देव पाण्यात बुडवून बसला आहे. तर, मराठा आरक्षण, आंदोलने विचारात घेता मराठा चेहरा महाराष्ट्राला असावा या चर्चा आणि अफवांच्या माध्यमातून भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे, मंत्री रवींद्र चव्हाण, मुरलीधर मोहोळ, चंद्रशेखर बावनकुळे, गिरिश महाजन यांची नावे विविध माध्यमांतून चर्चेला येत आहेत. मोहोळ यांनी समाज माध्यमातून आपण या स्पर्धेत नसल्याचे स्पष्ट केले आहे. शनिवारपासून रवींद्र चव्हाण यांचे नावाची चर्चा रंगल्याने त्यांनी खुलासा केला आहे.

## तेलंगणातील मुलुगुमध्ये चकमक! सुरक्षा दलाकडून ७ नक्षलवाद्यांचा खात्मा



मुलुगु : तेलंगणा राज्यामध्ये सुरक्षा दलाच्या पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. मुलुगु जिल्ह्यातील एतुरागरामच्या जंगलात पोलिस आणि नक्षलवादी यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत सुरक्षा दलाकडून ७ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे, अशी माहिती मुलुगुचे एसपी डॉ. सबरीश यांनी दिली.

# तब्बल आठ अपघात आणि ११ जणांचा बळी घेतल्यानंतर आली एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना जाग!

गोंदिया : दोन दिवसांपूर्वी भंडारा इथून गोंदियाच्या दिशेला जाणाऱ्या एका शिवशाही बसचा भीषण अपघात घडला होता. यामध्ये ११ प्रवाशांचा मृत्यू झाला असून अनेक प्रवासी जखमी झाले होते. दरम्यान, याप्रकरणी तपासात मोठी अपडेट समोर आली आहे.

गोंदिया अपघातास कारणीभूत ठरलेला चालक प्रणय रायपूरकर याने याआधीही सात अपघात केल्याची माहिती समोर आली आहे. आठ अपघात आणि ११ जणांचा बळी घेतल्यानंतर गोंदिया शिवशाही बस अपघातातील बस चालक प्रणय रायपुरकरवर कारवाई करण्यात आली आहे. काल रात्री विभागीय वाहतूक अधिकारी शितल शिरसाट यांनी आरोपी प्रणय रायपूरकरला निलंबनाचे आदेश दिले आहेत. पुढील आदेशाप्रमाणे हे निलंबन राहणार असून या कालावधीत सदर चालक निलंबीत कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रावर दररोज स्वाक्षरी करणे त्याला बंधनकारक असणार आहे.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे निकष बदलणार!

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०१ डिसेंबर - विधानसभा निवडणूकीत महायुतीला यश संपादन करून देण्यात लाडकी बहिण योजना हा फॅक्टर गेमचेंजर ठरल्याचे दिसून आले आहे. महायुतीला प्रचंड असे यश मिळाले आहे.

निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने लाडकी बहिण योजना लागू केली होती. त्यानुसार पात्र महिलांना महिना पंधराशे रूपये मिळाले होते. निवडणूकीपूर्वी राज्यातील महिलांना पाच हफ्ते मिळाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणुकीपूर्वी या योजनेमध्ये आता पंधराशे ऐवजी २१०० रूपये मिळणार असे आश्वासन दिले होते. मात्र आता शासनाने आता योजनेचे पूर्ण निकष लागू केले आहेत. त्यामुळे अपात्र महिलांना सहावा हफ्ता मिळणार नाही. लाडकी बहिण योजनेच्या पोर्टलवर एक कोटी बारा लाख महिलांनी नोंदणी केली होती. त्यातील एक कोटी सहा लाख महिला पात्र ठरल्या आहेत. ज्या महिला संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवत आहेत त्यांनीही या योजनेसाठी अर्ज दाखल केले होते.

मात्र आता सदर महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणार नाही असे बोलले जाते. संजय गाधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येणार आहे. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला असेल तर सदर योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र काही एकत्रित कुटुंबामध्ये २१ वर्षे पूर्ण झालेल्या दोन-तीन अविवाहित मुलींनी अर्ज केला आहे. यापुढे सदर युवतींना त्याचा लाभ मिळणार नाही. आता काटेकोरपणे पडताळणी केली जाणार आहे. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जादा आहे त्या महिलांनी अर्ज करू नये असे सांगितेले होते. मात्र तरीही काही महिलांनी अर्ज दाखल केले होते. आता त्यांना यापुढे योजनेचा लाभ मिळणार नाही. आता घरोघरी जाऊन पडताळणी केली जाणार आहे. जाच्याकडे चारचाकी वाहन नोंद आहे अशा महिलांनाही आता योजनेचा लाभ मिळणार नाही. आयकर भरणाऱ्या महिलांनाही यापुढे योजनेचा लाभ मिळणार नाही. शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत दीड हजार रूपये लाभ मिळत असेल त्या

महिलांना याजनेचा लाभ मिळणार नाही सर्व अर्जाची आता फेर पडताळणी केली जाणार आहे. डबल डोअर फ्रोज, वॅशिंग मशिन, स्पोर्टस बाईक चार चाकी वाहन दिसून आल्यास सदर योजनेचा लाभ मिळणार नाही. अशी चर्चा रंगत आहे.

# माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी घटनाबाह्य काम करून देशात आग लावली : संजय राऊत

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१ डिसेबर : माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी घटनापिठावर बसून घटनाबाह्य काम करून या देशात आग लावली आहे, अशी टीका ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी रविवारी केली.

पत्रकारांशी बोलताना ते हणाले, चंद्रचूड यांनी महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष , उत्तर प्रदेशमधील संभलचे प्रकरण असेल, या बाबतीत 'प्रार्थनास्थळ कायदा, १९९१'च्या माध्यमातून घटनाबाह्य काम करून देश पेटवला आहे. महाराष्ट्रातील घटनाबाह्य सरकारला त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे संरक्षण दिलं आहे. त्याच घटनाबाह्य सरकारचे काळजीवाहू सरकार महाराष्ट्रात असून काळजीवाहू सरकार देखील संविधानविरोधी आहे. या सगळ्याला चंद्रचूड जबाबदार आहेत.

> **शिंदेंना डॉक्टर की मांत्रिकाची गरज?**
>
> **काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडली असल्याने त्यांना उपचारासाठी डॉक्टर हवे की मांत्रिकाची गरज आहे हे पहावे लागेल, असा टोला लगावत राऊत म्हणाले की, दिल्लीतून मोदी किंवा अमित शाह त्यांना ते नक्कीच पाठवून देतील.'**

संजय राऊत म्हणाले, २६ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत संपली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नवे सरकार अस्तित्वात येणे आवश्यक होते आता या भाजपावाल्यांचे भाडोत्री कायदेपंडित येतील, कुठलेही कागद दाखवतील आणि हे काळजीवाहू सरकार कसे योग्य आहे ते सांगतील. मात्र, आज महायुतीच्या जागी महाविकास आघाडी असती तर एव्हाना या लोकांनी राष्ट्रपती राजवट लागू केली असती. महायुतीला बहुमत मिळूनही अद्याप त्यांनी सरकार स्थापनेचा दावा केलेला नाही. निवडणुकीचा निकाल लागून आठ दिवस झाले आहेत. त्यांच्याकडे बहुमत आहे तरी त्यांचा मुख्यमंत्री कोण हे ठरलेलं नाही. भारतीय जनता पार्टीचा विधिमंडळ पक्षनेता देखील ठरलेला नाही. इतका मोठा पक्ष, इतके मोठे नेते, मोठे बहुमत आहे तरीदेखील त्यांना विधिमंडळाचा नेता निवडता आलेला नाही. ते सरकार स्थापनेचा दावा करू शकलेले नाहीत. इतकंच काय तर सरकार स्थापनेसाठी कोणी राज्यपालांना भेटले देखील नाही आणि राज्यपाल देखील हे सगळे चालू देत आहेत.

५ डिसेंबरला नव्या सरकारचा शपथविधी होईल. हे सांगायला चंद्रशेखर बावनकुळे हे त काय राज्यपाल आहेत का? अशी विचारणा करत राऊत म्हणाले की, त्यांना हे अधिकार आहेत का आणि हे अधिकार त्यांना कोणी दिले? राज्यपालांनी बावनकुळेंना कळवले आहे का? एकीकडे हे महायुतीवाले सरकार स्थापनेचा दावा करायला तयार नाहीत आणि बावनकुळे पाच तारखेची घोषणा करत आहेत.

# सा.बां.उपविभागाने जुनेच काम दाखवून लाटले ८.८१ लाख?

## म.ग्रा.रो.ह.योजनेतून पानंद रस्ता जळगाव मेटे ते भैरवनाथ देवस्थान रस्त्याचा कामात सावळा गोंधळ!

फुलंब्री (प्रतिनिधी) सार्वजनिक बांधकाम उपविभाग फुलंब्री यंत्रणेने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मातोश्री पानंद रस्ता जळगाव मेटे ते भैरवनाथ देवस्थान पर्यंत किलो मीटर ०/०० ते १/०० असा रस्ता मंजूर करण्यात येऊन रस्त्याच्या कामाची अंमलबजावणी न करता रस्त्याच्या कामावर बोगस मजूर दाखवून योजनेचा ८ लाख ८१ हजार रुपये एवढा अकुशल निधी परस्पर हडप करण्यात आला असल्याचा गंभीर प्रकार ज्ञानेश्वर बोरसे यांनी दाखल केलेल्या तक्रार निवेदनावरून चव्हाट्यावर येताना दिसून येत आहे.

सदर रस्त्याचा कामात करण्यात आलेली अनियमितता व ग्रामपंचायत कार्यालयाची असलेली जबाबदारी याबाबत ज्ञानेश्वर बोरसे यांनी दिनांक १३/०८/२०२४ रोजी जळगाव मेटे ग्रामपंचायत कार्यालयाकडे मजूरनिहाय वाटप रकमेची यादी जोडून तक्रार निवेदन दाखल करण्यात आले होते परंतु सदर तक्रार निवेदनावर ग्रामपंचायतीकडून कुठलीही कार्यवाही अथवा अहवाल तक्रारदारास उपलब्ध करून



देण्यात आलेला नसल्याने त्याबाबत ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक विनोद बनसोडे यांना भ्रमणध्वणीद्वारे विचारणा केली असता सदर काम हे सार्वजनिक बांधकाम उपविभाग फुलंब्री यंत्रणेचे असल्याने त्याबाबत ग्रामपंचायतचा कुठलाही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामसभेत रस्त्याच्या कामाचे सामाजिक लेखापरीक्षण करून चावडी वाचन व मजुरांची नावे चावडीवर प्रसिद्ध करणे,ज्या त्या मजुरावर झालेल्या खर्चाची सविस्तर माहिती मजुरांना देण्यात आलेल्या जॉब कार्ड मध्ये नोंदविणे ही ग्रामपंचायतची जबाबदारी असून १)सार्वजनिक बांधकाम उपविभाग फुलंब्री यंत्रनेने कामाचे अभिलेख ग्रामपंचायत कार्यालयास लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आले किंवा नाही याची नोंद २) रस्त्याच्या कामावर माहिती फलक प्रसिद्ध करण्यात आलेले नाही याची नोंद ३)चावडी वाचन झाल्यानंतर मजुरांनी अथवा गावकऱ्यांनी घेतलेला आक्षेपाची नोंद ग्रामसभेच्या प्रोसिडिंगमध्ये घेण्याची जबाबदारी ही ग्रामपंचायतची आहे.

परंतु सदर रस्त्याचा कामाची नियमबाह्य अंमलबजावणी ग्रामपंचायतीच्या आशीर्वादाने व सहकार्याने झालली असल्याने ग्रामपंचायत त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

# अजूनही प्लॅस्टिक पिशव्या वापरताय, सावधान! होणार कठोर कारवाई

पिंपरी : केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने प्लॅस्टिक वेस्ट मॅनेजमेंटने जारी केलेल्या नियमानुसार प्लॅस्टिक पिशव्या वापरण्यास बंदी घातली आहे. आरोग्याला घातक तसेच पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे सखल भागात पाणी साचण्याला कारणीभूत ठरणाऱ्या ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्यांवर काही वर्षांपूर्वी बंदी घालण्यात आली होती. मात्र अजूनही कित्येक जण प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरताना दिसून येतात. त्यामुळे आता पालिका प्रशासन पुन्हा ॲक्शन मोडवर आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने 'महाराष्ट्र प्लॅस्टिक व थर्मोकोल अविघटनशील वस्तूंच्या (उत्पादन, वापर विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक व तद्नंतर वेळोवेळी केलेल्या सुधारणा) अधिसूचना, २०१८' संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आली आहे. तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने ३० सप्टेंबर २०२१ पासून ७५ मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या आणि ३१ डिसेंबर २०२२ पासून १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी करण्यात आली आहे. या नियम व अधिसूचनेची कठोर अंमलबजावणी शहरांमध्ये सुरू करण्यात आली आहे. परंतु अनेक ठिकाणी प्लॅस्टिक पिशव्यांची विक्री व खरेदी होत आहे. त्यामुळे सरकारने ठरवून दिलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांबाबत नियमांचे पालन करण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त सिंह यांनी दिला आहे.

## मनसेच्या ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांचा राजीनामा

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१ डिसेबर : विधानसभा निवडणुकीत भोपळाही फोडू न शकलेल्या मनसेला आता आणखी एक धक्का बसला आहे. ठाण्याचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. ठाणे , पालघरमधील पराभवाची जबाबदारी स्वीकारत राजीनामा देत असल्याचे त्यांनी राज ठाकरेंना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे ते पक्षातच राहणार की अन्य कुठली पक्षात प्रवेश करणार ?याबाबत चर्चा सुरू झाली आहे. जाधव यांनी स्वतः ठाणे विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र त्यात ते तिसऱ्या स्थानावर राहिले. पक्षप्रमुखाला पाठवलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, ठाणे आणि पालघर येथे पराभवाची जबाबदारी घेऊन मी माझ्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे. काम करताना माझ्याकडून कळत नकळत काही चूक झाली असल्याच आपण मला माफ करावे. जाधव आगामी राजकीय भूमिका कोणती घेतात, याकडे ठाण्यातील मनसे सैनिकाचे लक्ष लागून राहिले आहे.

# ऊस दराबाबत संभ्रम, शेतकरी संघटनाही गपगार

छत्रपती संभाजीनग/प्रतिनिधी

विधानसभेची निवडणूक एकदाची पार पडली, आचारसंहिताही संपली. गाळप हंगामही सुरू होवून महिना उलटला. मात्र, अद्यापही कारखानदारांनी उसाचा भाव काही जाहीर केलेला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मागच्या वर्षीच्या दुष्काळामुळे यंदाच्या गाळपासाठी जिल्ह्यात तसा कमी प्रमाणात ऊस उपलब्ध आहे. त्यातील ७० ते ७५ टक्के ऊस खोडवाच आहे. केंद्राने साडेनऊ टक्के रिकव्हरी ग्राह्य मानून तीन हजार ४५० रुपयांची एफआरपी घोषित केली, पण बहुतेक कारखानदारांनी उसाचे भाव जाहीर केलेले नाही. शेतकरी संघटनाही मूग गिळून गप्प असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

हंगाम ९० दिवसांचा

यंदाचा उसाचा गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू झाला. सध्या विभागातील १७ कारखान्यांचे गाळप सुरू झाले आहे. दरम्यान, गतवर्षी दुष्काळामुळे शेतकऱ्यांनी नवीन उसाची लागवड केली नाही आणि आहे त्यातील बराच ऊस जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरला. ८० टक्के क्षेत्रावरील ऊस खोडवा आहे. त्यामुळे यंदाचा गाळप हंगाम ९० दिवसांपर्यंतच (तीन महिने) चालेल, अशी स्थिती असल्याचे प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. यंदा चांगला पाऊस झाल्याने खोडवा ऊस जतन झाला आहे. त्यामुळे चांगली रिकव्हरी येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दराबाबत उत्सुकता

आतापर्यंत विभागात १७ कारखान्यांचीच धुराडी पेटली आहेत. दराबाबत कोणी अवाक्षरही काढलेले नाही. या निवडणुकीत बहुतांशी साखर कारखानदारांचा पराभव झाल्याने आणखीच शांतता पसरली आहे. निवडणुकीमुळेच यंदाच्या हंगामास उशीर झाला. हंगामाच्या तोंडावर निवडणुका आल्याने दराबाबत चढाओढ लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. उलट ऊस हंगमाकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले. बहुतांशी साखर कारखानदार हे विधानसभेसाठी उमेदवार होते. त्यांच्याकडून दर जाहीर झाला नाही. आचारसंहितेमुळे कदाचित त्यांना अडचण आली असावी. परंतु शेतकऱ्यांत यंदा कोणता कारखाना किती दर देतो, याची उत्सुकता आहे.

विभागात ४१ कारखाने

छत्रपती संभाजीनगर विभागाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह नंदूरबार, जळगाव, धुळे, बीड आणि जालना हे सहा जिल्हे येतात. या सहा जिल्ह्यांत जवळपास कारखान्यांची संख्या ४१ वर आहे. परंतु, यातील काही कारखाने अवसायानात गेलेले आहेत. काही कारखान्यांची नोंदणी रद्द झालेली असून बहुतांश कारखाने बंद अवस्थेत आहेत. उर्वरित सुरू असलेल्या १७ कारखान्यांना यंदाच्या गाळप हंगामासाठी परवाने देण्यात आले आहेत.

खासगी १० कारखाने

सर्वांत जास्त सहकारी कारखाने हे एकट्या बीड जिल्ह्यात असल्याची साखर आयुक्तालयाची आकडेवारीवरून दिसून येते. बीड जिल्ह्यात तब्बल पाच सहकारी साखर कारखाने आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागात २१ पैकी तब्बल ११ कारखाने हे सहकारी तत्त्वावरील असून, १० खासगी कारखाने आहेत.

एफआरपी ३४०० रुपये जाहीर

केंद्र शासनाने उसासाठी प्रतिक्विंटल ३४०० रुपये इतका रास्त किफायतशीर दर (एफआरपी) निश्चित केला आहे. साखर आयुक्त अनिल कवडे यांचे तसे परिपत्रक येथील प्रादेशिक सहसंचालक कार्यालयास प्राप्त झाले आहे. गतवर्षी ३१५० रुपये एफआरपी होती. वाहतूक खर्च वजा करून कारखान्यांनी २८०० रुपयांपर्यंत भाव दिला होता. मात्र, काही कारखाने वगळता कोणीही एफआरपी उस उत्पादक शेतकऱ्यांना दिली नव्हती, हे विशेष!

# अपेक्षित उंचीवर पोहचण्यासाठी मदत करणाऱ्यांप्रती कृतज्ञता बाळगणे आवश्यक : खा. कपिल सिब्बल

## एमजीएम विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ उत्साहात; सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकरांना डी. लिट. प्रदान

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

आज आपणा सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. आपण या अपेक्षित उंचीवर कसे पोहचलो, हा प्रश्न स्वत:ला याक्षणी विचारायला हवा. या उंचीवर पोहचला आहात यामध्ये आपले पालक आणि शिक्षकांची महत्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. आपल्यापैकी अनेकजण अपेक्षित उंचीवर पोहचल्यास आपल्याला या प्रवासात कोणी मदत केली आहे, हे विसरून जातो. मात्र, आपल्या अपेक्षित उंचीच्या प्रवासात ज्यांनी ज्यांनी आपल्याला सहकार्य केले, अशा सर्वांना आपण विसरता काम नये, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ, खासदार कपिल सिब्बल यांनी शनिवारी, ३० रोजी येथे केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ ज्येष्ठ विधिज्ञ, खासदार कपिल सिब्बल यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या रुख्मिणी सभागृहात पार पडला. यावेळी त्यांनी दीक्षांत भाषण करीत विद्यार्थ्यांना संबोधित केले. एमजीएम विद्यापीठातून उत्तीर्ण झालेल्या १२८४ विद्यार्थ्यांना या वेळी पदवी प्रदान करण्यात आली. या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी प्रास्ताविकातून विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला, तर कुलपती अंकुशराव कदम यांनी अध्यक्षीय समारोप केला.

एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे सदस्य डॉ. पी. एम. जाधव, डॉ. सुधीर कदम, डॉ. नितीन कदम, अमरदीप कदम, भाऊसाहेब राजळे, रणजित कक्कड, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. हरिरंग शिंदे, डॉ. प्राप्ती देशमुख, डॉ. रेखा शेळके, डॉ. जॉन चेलादुराई, प्रा. पार्वती दत्ता, डॉ. विजया मुसांडे आणि सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर आदी उपस्थित होते.

खासदार सिब्बल म्हणाले, मी एक निसर्गप्रेमी आहे. मी माझ्या आयुष्यात जे काही शिकलो आहे, ते सगळे निसर्गाकडून शिकलो. आपण निसर्गाच्या सानिध्यात गेल्यास आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. आपण प्राण्यांच्या जगात गेल्यास आपल्याला समजते की, त्यांना भूक लागल्यानंतरच ते शिकार करतात. ते विनाकारण शिकार करीत नाही, त्यामुळे आपली वने शाश्वत आहेत. आपण या शाश्वत निसर्गाकडून अनेक गोष्टी शिकत असतो. आपण दररोज अनेक आव्हानांना सामोरे जात असतो. प्रवाहाच्या विरुद्ध जाणाऱ्यांनी या जगामध्ये क्रांती केलेली असून हेच आपण येणाऱ्या पिढ्यांना सांगणे आवश्यक असल्याचे सिब्बल म्हणाले.



### सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी व्यक्त केलेल्या भावना

**मी आजपर्यंत कधी मी कोणत्या विद्यापीठात पदवी घेण्यास गेले नाही. आज मला महात्मा गांधी यांच्या विचारांवर चालणाऱ्या एमजीएम विद्यापीठाने डी. लिट पदवी देऊन सन्मानित केले. हा आमच्या सर्वांच्या कार्याचा पुरस्कार असून यातून आम्हांला प्रेरणा मिळते. आज पदवी मिळणारा हा दिवस कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविणारा आहे. आज ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली आहे, त्या सर्वांचे सर्वप्रथम मी अभिनंदन करते. विद्यार्थ्यांनी सत्तावादी बनण्यापेक्षा समाजवादी बनणे आवश्यक आहे. आज आपण या एमजीएम विद्यापीठातून जे काही ज्ञान घेऊन जात आहेत, त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करा. आपण सगळे विद्यार्थी संविधान हातात घेत सत्य आणि अहिंसेच्या मार्गावरून मार्गक्रमण कराल, असा विश्वास व्यक्त करते. लोकशाहीचे मी ५ स्तंभ मानते. यामध्ये जनता हा पहिला स्तंभ आहे. 'माझे जीवन हाच माझा संदेश' हा संदेश नसून महात्मा गांधी यांचा आपल्याला आदेश आहे.**

कुलपती अंकुशराव कदम यावेळी बोलताना म्हणाले, आजच्या दिवशी ज्यांच्या एका नव्या प्रवासाला सुरुवात होणार आहे, अशा एमजीएम विद्यापीठातील सर्व पदवीधारक विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करतो. आपण खूप मोठे व्हा, खूप प्रगती करा! आजचा दिवस माझ्यासाठी आणि एमजीएम परिवारासाठी अभिमानाचा आहे. याचे कारण म्हणजे आजच्या दिवशी ज्येष्ठ आजीवन सामाजिक कार्यकर्त्या मेधाताई पाटकर यांचा डिलीट पदवी देऊन सन्मान करण्याचे सौभाग्य आम्हाला लाभले. ही पदवी स्वीकारल्याबद्दल मेधाताई आपले मन:पूर्वक आभार. मेधाताई यांनी नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला. शेतकरी आदिवासी आणि गरिबांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे.

एमजीएम विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाची पूर्णपणे अंमलबजावणी केलेली आहे. आज सर्वच क्षेत्रामध्ये विद्यापीठाने यशस्वीपणे प्रगती केलेली आहे. एमजीएम हे मराठवाड्यातील पहिले स्वयं अर्थसाहाय्यित खाजगी विद्यापीठ असून २०१९ पासून कार्यान्वित झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने एमजीएम विद्यापीठाला २ (एफ) दर्जा दिलेला आहे. येथे अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, मूलभूत आणि उपयोजित विज्ञान, व्यवस्थापन आणि वाणिज्य , सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या, प्रयोगकला विद्याशाखा, आंतरविद्याशाखीय शिक्षण, फॅकल्टी ऑफ डिझाईन या विद्याशाखांतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्तम आणि प्रतिभासंपन्न कामगिरी केली असल्याचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

दीक्षांत समारंभामध्ये एमजीएम विद्यापीठातून २०२३ -२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण पूर्ण करून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. या दीक्षांत समारंभात विद्यापीठातील ७ विद्याशाखांच्या पदवी झ७६२, पदव्युत्तर पदवी झ ३९९ , पदविका झ ८३ , पदव्युत्तर पदविका २७, विद्यावाचस्पती पदवी झ ०३ आणि प्रमाणपत्र झ ०४ विद्यार्थ्यांचा समावेश होता. यापैकी ३०६ अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, ३९२ मूलभूत आणि उपयोजित विज्ञान, ३१९ व्यवस्थापन आणि वाणिज्य , १५६ सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या, १० प्रयोगकला विद्याशाखा, ३१ आंतरविद्याशाखीय शिक्षण, ७० फॅकल्टी ऑफ डिझाईन विद्याशाखेचे विद्यार्थी होते. अशा विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या एकूण १२८४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. तसेच या दीक्षांत समारंभात प्रथमच ३ विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती पदवी (पीएचडी) प्रदान करण्यात आली.

१० विद्यार्थी कुलपती सुवर्ण पदकाचे मानकरी

एमजीएम विद्यापीठाच्या वतीने तिसऱ्या दीक्षांत सोहळ्यात विद्यापीठातील पदवीचे ५ आणि पदव्युत्तर पदवीच्या ५ अशा एकूण १० विद्यार्थ्यांना 'चान्सलर्स गोल्ड मेडल' देऊन गौरवण्यात आले. यावेळी स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखेत सर्वाधिक गुण घेणाऱ्या वरद प्रशांत वर्मा यास प्राचार्य प्रताप बोराडे सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले.

तेजस कल्लाळे (मूलभूत आणि उपयोजित विज्ञान), धनश्री शिंदे (मूलभूत आणि उपयोजित विज्ञान), क्षितिजा कल्याणकर (व्यवस्थापन आणि वाणिज्य), अदिती राजगुरू (व्यवस्थापन आणि वाणिज्य), सुधीर कारले (आंतरविद्याशाखीय शिक्षण),

सृष्टी मोतीयाळे (सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या), खान मोहम्मद (सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या), वैष्णवी शास्त्री (अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान), अमन सहाणी (अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान), भावना वर्मा (फॅकल्टी ऑफ डिझाईन).

मेधा पाटकर यांना डी. लिट. प्रदान

सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना सामाजिक क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल एमजीएम विद्यापीठाने डी. लिट. पदवी प्रदान केली. त्यांनी टाटा इन्स्टट्यिूट ऑफ सोशल सायन्सेसमधून सामाजिक कार्यात एमए केले. त्यांना अनेक आंदोलने आणि उपोषणे करीत असताना तुरुंगातही जावे लागले. १९८५ मध्ये पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन केले. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना ह्युमन राईट्स डिफेंडर्स वार्ड, ग्रीन रिब्बन वार्ड, छात्र भारती पुरस्कार, प्रभा पुरस्कार, बॅरिस्टर नाथ पै पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.

समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दीपा देशपांडे आणि प्रा. सरफराज अली कादरी यांनी केले. राष्ट्रगीताने दीक्षांत समारंभाचा समारोप करण्यात आला.

# ईव्हीएम टॅंपरफ्रूफ, हॅकिंगचा दावा निराधार – महाराष्ट्र निवडणूक विभाग

मुंबई, १ डिसेंबर : ईव्हीएम हॅक करू शकतो, असा दावा अमेरिका हॅकर सैजय शुजा याने दावा केला आहे. त्यासाठी त्याने ५४ कोटी रुपयांची मागणी केल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. या संदर्भात महाराष्ट्र निवडणूक विभागाने स्पष्टीकरण दिलं आहे. व्हिडिओमध्ये केलेला दावा निराधार, खोटा आणि अप्रमाणित आहेत. मुंबई सायबर पोलिसांनी या व्हिडिओतील व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८/४ अन्वये आयटी ॲक्ट २००० च्या कलम ४३ (ग) आणि कलम ६६ (घ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ईव्हीएम ही टॅंपरफ्रूफ आहे, नेटवर्कसोबत ती जोडली जाऊ शकत नाही, असेही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

तसेच सर्वोच्च न्यायालयाने देखील ईव्हीएमवर विश्वास दर्शवला आहे. दरम्यान, २०१९ मध्येही अशाच प्रकारचा दावा केल्याने दिल्लीतील व्यक्तीविरुद्ध २०१९ मध्ये देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर विरोधकांकडून ईव्हीएमवर संशय व्यक्त केला जात आहे. अनेक मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी, निकालानंतर उमेदवारांना मिळालेली मतं शेअर करत ईव्हीएममध्ये घोळ असल्याचं म्हटलं जात आहे. शिवसेना युबीटी नेते संजय राऊत यांनी हा निकाल मान्य नसल्याचे म्हटले, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांनीही संशय व्यक्त करत सोशल मीडियातून प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यातच, सध्या सोशल मीडियावर ईव्हीएम टॅम्परिंगचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. एका वृत्त वाहिनीच्या युट्यूब चॅनलेवरुनही हा व्हिडिओ प्रदर्शित करण्यात आल्यानंतर तो तुफान व्हायरल झाला असून लोकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला.

काय आहे व्हिडिओत

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर सोशल मीडियात एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, व्हिडिओतील व्यक्ती ईव्हीएम मशिन हॅक करुन एका राजकीय पक्षाच्या बाजुने निवडणुकांचा निकाल फिरवू असा दावा करताना दिसून येते. त्यामध्ये किती जागांवर निकाल फिरवला जाईल, त्यासाठी व्हीव्हीपॅट मशिनचे काही नंबर मला हवेत आहेत, असेही ती व्यक्ती सांगताना दिसून येते. व्हिडिओत अमेरिका हॅकर सैजय शुजा याने दावा केली की, तो अमेरिकेतली संरक्षण विभागाच्या तांत्रिक बाबींचा वापर करुन ईव्हीएम हॅक करू शकतो. त्यासाठी, त्याने ५४ कोटी रुपयांची मागणी केल्याचं व्हिडिओत ऐकायला मिळत आहे.

# प्रजनन दर २.१ पेक्षा कमी नसावा- सरसंघाचालक

नागपूर, ०१ डिसेंबर : भारतीयांचा प्रजनन दर २.१ टक्क्यांहून कमी नसावा असे प्रतिपादन सरसंघाचलाक डॉ. मोहन भागवत यांनी केले. ते आज, रविवारी नागपुरात आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते.

प्रजनन दरात झालेल्या घटीबद्दल सरसंघचालक म्हणाले की, लोकसंख्येच्या दरात होत असलेली घट चिंतेचा विषय आहे. लोकसांखिकीच्या नियमानुसार लोकसंख्येचा वृद्धीदर २.१ पेक्षा कमी नसावा. आधुनिक लोकसंख्या विज्ञानानुसार, जेव्हा एखाद्या समाजाची संख्या (प्रजनन दर) २.१ पेक्षा कमी होते, तेव्हा तो समाज जगातून नष्ट होतो. एखाद्या समाजावर समजा कुठले संखट नाही आले. परंतु, त्यांचा प्रजनन दर कमी असला तरी असा समाज नामशेष व्हायला वेळ लागत नाही. याचप्रकारे अनेक भाषा, अनेक समाज नष्ट झाले. त्यामुळ लोकसंख्या वाढीचा दर २.१ च्या खाली जाता कामा नये, असे सरसंघचालकांनी सांगितले. आपल्या देशाने १९९८ किंवा २००२ मध्ये लोकसंख्या धोरण तयार केले. लोकसंख्येचा वृद्धी दर २.१ च्या खाली जाता कामा नये असे त्यात नमूद करण्यात आले आहे. जर आपण लोकसंख्या वाढीचा दर २.१ विचारात घेतला, तर आपल्याला दोनपेक्षा अधिक मुलांची गरज आहे, किमान ३ अपत्य तर असायलाच हवेत. लोकसंख्येचं विज्ञान हेच सांगते. समाज टिकायला हवा यासाठी संख्या महत्त्वाची असल्याचे भागवत यांनी यावेळी सांगितले.

# लष्करातील सेवानिवृत्त सुभेदार हरेश औटी यांचा सन्मान

अहमदनगर, १ डिसेंबर : राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना व खासदार निलेश लंके यांच्या वतीने भारतीय सैन्यदलात ३० वर्ष देशसेवा करुन (एएससी) सुभेदार पदावरुन सेवानिवृत्त झालेले जामगावचे (तालुका पारनेर) हरेश बबनराव औटी यांचा सेवापुर्तीबद्दल सन्मान करण्यात आला. सेवानिवृत्त एसटी कर्मचारी बबनराव औटी यांच्या दोन्ही मुलांनी लष्करात देश सेवेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा देखील सत्कार पार पडला.संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे व इतर पदाधिकारी आणि खासदार निलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांच्या हस्ते हरेश औटी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बलभीम कुबडे यांनी सेवानिवृत्त एसटी कर्मचारी बबनराव औटी यांनी आपल्या मुलांवर देशभक्तीचे धडे देऊन त्यांना सैन्य दलात पाठविले.त्यांनी उत्कृष्ट कार्य करुन निष्ठेने सेवा केल्याचे स्पष्ट करुन त्यांच्या कार्या चे कौतुक केले. दीपक लंके यांनी औटी यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामस्थांच्या वतीने सेवापुर्तीबद्दल सुभेदार हरेश औटी यांची बॅण्ड पथकासह गावातून मिरवणुक काढण्यात आली.प्रारंभी मळगंगा मंदिरात आरती करण्यात आली.यावेळी जामगावचे सरपंच बाळासाहेब माळी यांनी औटी यांचा सत्कार केला.याप्रसंगी गावातील विविध संस्थांमधील आजी-माजी पदाधिकारी, ग्रामस्थ,कुटुंबीय व मित्रमंडळी उपस्थित होते.गावातील सर्व आजी-माजी सैनिकांनी सुद्धा औटी यांचा सन्मान केला.सुभेदार हरेश औटी यांनी गावाने केले ले सहकार्य कधीच विसरणार नाही. आजी-माजी सैनिकांची एकजूट करून गावाच्या विकासासाठी व तरुणांसाठी चांगला उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले.

# भावनिक ऐक्य वाढण्यासाठी उत्तर पूर्व राज्यांना भेट द्यावी : राज्यपाल

मुंबई, १ डिसेंबर : आपल्या राज्य स्थापनेपासून नागालँड व आसाम या राज्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती व पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. दोन्ही राज्यांना निसर्ग संपदेचे वरदान लाभले आहे. देशातील राज्ये समजून घेण्यासाठी त्या त्या राज्यांना प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे व तेथील संस्कृती लोकांमध्ये राहून समजून घेतली पाहिजे. नागालँड व आसाम राज्यांना भेट देऊन तेथील लोकांशी संवाद वाढवल्यास राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होईल. यास्तव नागरिकांनी उभय राज्यांना भेट द्यावी, असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र राजभवन येथे राज्यपालांच्या उपस्थितीत नागालँड (१ डिसेंबर) व आसाम (२ डिसेंबर) राज्य स्थापना दिवस संयुक्तरित्या रविवारी (दि. १) साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राजभवनतर्फे एसएनडीटी महिला विद्यापीठ व 'ईश्वरपूरम पुणे' या उत्तर पूर्व राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण व सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या संस्थेच्या सहयोगाने करण्यात आले.

राज्य स्थापना दिवस साजरे करताना आपल्याला विविधतेतून सामान भारतीय मूल्ये दिसून येतात. त्या त्या प्रदेशांचे गीत, नृत्य, लोककला व खाद्य संस्कृतीची माहिती होते.

आज देशातील केंद्र शासनातर्फे विविध राज्यांमधील युवकांना इतर राज्य जाणून घेण्याची संधी दिली जात आहे. अलीकडेच आपण 'वतन को जानो' व 'युवा संगम' कार्यक्रमांतर्गत जम्मू काश्मीर तसेच ओडिशा येथील युवकांना भेटलो असे सांगून केंद्र सरकारच्या या उपक्रमांमुळे युवकांना भारताची विविधता व संपन्नता पाहण्यास मिळते, असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी 'ईश्वरपूरम' संस्थेतील नागालँड व अरुणाचल प्रदेशच्या विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध बांबू नृत्य सादर केले. तर, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी संथाली नृत्य व आसामी लोकगीत सादर केले.

राज्यपालांच्या हस्ते एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा उज्वला चक्रदेव, प्रकुलगुरु रुबी ओझा, ईश्वरपूरम संस्थेचे अध्यक्ष विनीत कुबेर, संस्थापक सदस्य प्रशांत जोशी यांसह उपस्थित विद्यार्थी व कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

# बीड येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा शांततेत

बीड : रविवार १ डिसेंबर रोजी उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक , तहसीलदार इत्यादी पदांसाठी घेतली जाणारी राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा बीड येथे शांततेत पार पडली . बीडचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह



समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके , अविनाश शिंगटे , नरेंद्र कुलकर्णी , उपकेंद्र प्रमुख , पोलीस कर्मचारी व अधिनस्त कर्मचारी यांनी या कामी मेहनत घेतली . एकूण दहा केंद्रावर ३०४७ उमेदवार होते . त्यापैकी सकाळच्या सत्रात २०१० तर दुपारच्या सत्रात १९९७ उमेदवार हजर होते .

# सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे शेखर बंगाळे यांना न्याय द्या : हणमंतराव वनाळे यांची निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

सामाजिक कार्यामध्ये सतत अग्रेसर राहणारे सोलापूर जिल्ह्यातील शेखर उर्फ संकेत चंदन बंगाळे यांच्यावर सुडबुद्धीने दोन जिल्ह्यातील तडीपार कार्यवाही तात्काळ थांबविण्यात यावी व बंगाळे यांना न्याय द्यावा, अशा मागणीचे निवेदन धनगर एस.टी. आरक्षण अंमलबजावणी वंचित धनगर महासंघाच्या वतीने निमंत्रक हनुमंतराव वनाळे यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्या मार्फत भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविले आहे.

धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी शेखर बंगाळे हे आमच्या खांद्याला खांदा लावून लढत होते. त्यामध्ये रास्तारोको, निवेदन देणे, ढोल बजाओ आंदोलन, सोलापूर विद्यापीठाला राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव मिळावे यासाठी त्यांच्या आंदोलनाचा सिंहाचा वाटा आहे. भंडारा उधळून आंदोलन करण्यात सदैव सक्रिय असतात. तसेच शेतकऱ्यांच्या थकीत वीज बिलासाठी उपोषण करून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडले आहे. अशा धनगर समाजाच्या लढावू युवा नेत्यास एखाद्या पुढाऱ्याच्या सांगण्यावरून एवढी मोठी कार्यवाही करणे लोकशाहीमध्ये योग्य नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

पोलीस व महसूल प्रशासनाने कोणाचे ऐकून कार्यवाही न करता लोकशाही मार्गाचा अवलंब करून शेखर बंगाळे यांच्या कुटुंबियांचा विचार करून लोकशाहीप्रमाणे सद्विवेकबुद्धीचा अवलंब करून त्यांच्यावरील तडीपारीची कार्यवाही तात्काळ थांबविण्यात यावी, अशी मागणीही हनुमंतराव वनाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# चित्रपट चावडीमध्ये 'लकीर के इस तरफ' माहितीपट प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर, दि.१ : यशवंतराव चव्हाण सेंटर, एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत 'नर्मदा बचाव आंदोलना'च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा 'लकीर के इस तरफ' चित्रपटाचा विशेष शो सायं. ६ वा. व्ही. शांताराम प्रेक्षागृहात दाखविण्यात आला. यावेळी या माहितीपटाच्या दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.



'नर्मदा बचाव आंदोलना'च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा माहितीपट म्हणजे – लकीर के इस तरफ. ९० मिनिटांच्या या माहितीपटात, आंदोलनाचं यश-अपयश याची मांडणी तर आहेच, पण त्यापेक्षा मनात भरतात त्या आंदोलनानं सुरू केलेल्या आदिवासी मुलांसाठीच्या, नर्मदेच्या कुशीतल्या जीवनशाळा!!! लडाई - पढाई साथ साथ म्हणत, संघर्ष आणि निर्माण एकत्र कसं साधायचं याचा वास्तूपाठ प्रेक्षकांना पहावयास मिळाला.

महाराष्ट्र शासनाच्या समाजशास्त्र विषयाच्या पुस्तकात, लकीर के इस तरफ या माहितीपटाचा उल्लेख केला आहे. सामाजिक चळवळी या प्रकरणात संदर्भ म्हणून विद्यार्थ्यांना ही फिल्म सुचवली गेली आहे. चित्रपट प्रदर्शनानंतर दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर,डॉ. रेखा शेळके, प्रा. शिव कदम, सुबोध जाधव, रसिक, विद्यार्थी, अभ्यासक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.


## मुदखेड नगर परिषद मुदखेड जि. नांदेड

जा.क्र. मुनपा/ताशा/विकास/२०२४-२५/१०८२ दिनांक २९/११/२०२४

**ई-निविदा सुचना (क्रं. ०२/२०२४-२५) (दुसरी वेळ)**

### स्वच्छता विभाग

मुदखेड नगर परिषद अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत घनकचरा प्रकल्प येथे Compost Pit With Shed, MRF Shed, Sanitary Landfill, Leachate Tank विषयक बांधकाम करणे करिता ऑनलाइन पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. अटी व शर्ती सह सविस्तर ई-निविदा प्रपत्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २४/१२/२०२४ रोजी १६:०० वाजे पर्यंत मागविण्यात येत आहे. तरी सर्व कंत्राटदारानी नोंद घ्यावी.

(शेलेश फडसे)
**मुख्याधिकारी**
न.प.मुदखेड जि.नांदेड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दरवर्षी फुलांच्या शेतीतून मिळवतात लाखोंचे उत्पन्न; डोंगरगाव येथील शेतकऱ्याची यशस्वी फुलशेती









तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि .१ डिसेंबर- कन्नड तालुक्यातील डोंगरगाव येथील प्रगतशील शेतकरी तथा माजी सरपंच रामेश्वर भीमराव आग्रे हे गेल्या दहा वर्षापासून विविध प्रकारच्या फुलशेती करतात. दरवर्षी तीन एकर क्षेत्रात शिर्डी गुलाब, निशिगंध, शेवंती, बिजली, पितांबरी झेंडू ,पिवळा झेंडू, केशरी झेंडू अशा विविध प्रकारचे फुलांची शेती लागवड ठिबक सिंचन वर करतात. त्यासाठी त्यांना ७० हजार रुपयापर्यंत खर्च येतो. खर्च व्यतिरिक्त पाच लक्ष रुपये उत्पन्न त्यांना दरवर्षी मिळते. या फुलांना ५० ते २०० रुपये पर्यंत प्रति किलो भाव मिळत असून संभाजीनगर येथे विक्रीसाठी नेतात. या माध्यमातून दररोज दहा मजुरांना रोज हाताला काम देखील मिळते. पारंपरिक पिकांना फाटा देत शेतकऱ्यांनी युवा तरुणांनी नियोजन करून विविध प्रकारची शेती करणे काळाची गरज असल्याचे मत शेतकरी रामेश्वर आग्रे यांनी व्यक्त केले. त्यांच्या पत्नी तथा सध्याच्या विद्यमान (सरपंच) पुष्पा रामेश्वर आग्रे या देखील त्यांच्यासोबत संभाजीनगर येथून ये-जा करीत यशस्वी फुल शेती करण्यासाठी मोठे योगदान देत आहे. फुल शेतीच्या माध्यमातून एक आदर्श कन्नड तालुक्यातून या शेतकरी दांपत्याने घडवून दिला आहे. या आगळ्यावेगळ्या शेतीच्या माध्यमातून चांगले उत्पन्न मिळत असल्याने आमच्या मुलांचे शिक्षण देखील योग्यरीत्या होत आहे माझा मुलगा पुणे येथे इंजीनियरिंग करत असून मुलगी स्पर्धा परीक्षा ची तयारी करत आहे. नियोजन पूर्वक जर शेती केली तर नक्कीच शेतीतून भरघोस उत्पन्न मिळते असे मत या शेतकरी दांपत्याने व्यक्त केले केले.

# पऱ्हाट्यांची कुट्टी करून जमिनीत गाडल्यास विविध अन्नद्रव्यांची निर्मिती : इंजि. यादव

## विविध विषयांवर शास्त्रज्ञांचा शेतकऱ्यांशी सुसंवाद

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

कापसाची फरदड घेऊ नये तसेच कापसाच्या पऱ्हाट्यांची कुट्टी करून जमिनीत गाडल्यास मोठ्या प्रमाणावर विविध अन्नद्रव्यांची निर्मिती होते. याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ शकतो. यासाठी कुट्टी मशीनचा वापर करावा, असा उपयुक्त सल्ला केव्हीकेच्या कार्यक्रम समन्वयक इंजि. गीता यादव यांनी येथे दिला.

कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्राव्दारे रविवार, १ डिसेंबर २०२४ रोजी १०५ वा शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमात इंजि. गीता यादव बोलत होत्या. विषय विशेषज्ञ डॉ. संजुला भावर डॉ. बस्वराज पिसुरे, जयदेव सिंगल, जयदीप बनसोडे यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.




यावेळी इंजि. यादव यांनी कापूस लागवड, कापूस वेचणी आणि एकूणचे कापूस लागवड तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देवून त्यांचे समाधान केले.

मोसंबी बहारवर मार्गदर्शन

डॉ. भावर यांनी मोसंबी बहार व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. भावर म्हणाले, शेतकऱ्यांनी जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता यानुसार योग्य तो बहार धरावा. ताण देण्यापूर्वी झाडावरील पूर्वीची फळे वाळलेल्या रोगट फांद्या काढून टाकाव्यात. आवश्यकतेपेक्षा जास्त ताण बसणार नाही, यांची काळजी घ्यावी. हलक्या जमिनीसाठी ३० दिवस मध्यम जमिनीसाठी ५०-५५ दिवस तर भारी जमिनीसाठी ५५-६० दिवसांचा ताण योग्य होतो. झाडांची नियमित पाहणी करून कीड व रोगांचे व्यवस्थापन करावे. ताण तोडताना आवश्यक तेवढेच खत व्यवस्थापन करावे. सूत्रकृमीच्या नियंत्रणासाठी बागेभोवती झेंडूच्या रोपांची लागवड करावी. झाडाचा ताण तोडताना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ४५० ग्रॅम नत्र, ३०० ग्रॅम स्फुरद, ३०० ग्रॅम पालाश प्रतिझाड जमिनीत मिसळून द्यावेत. शेणखतांसोबत ०७ किलो निंबोळी पेंड, १०० ग्रॅम स्फुरद विरघळणारे जिवाणू आणि १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा यांचे एकत्र मिश्रण करून द्यावे. त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी द्यावे.

यावेळी डॉ. पिसुरे यांनी जैविक खते बुरशीनाशके याचा प्रभावी वापर आणि सद्य स्थितीतील तूर पीक व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन डॉ. पिसुरे यांनी केले.

# २५ डिसेंबरपासून विद्यपीठ परिसरात केंद्रीय युवा महोत्सवाचे आयोजन

## विविध ३६ कलाप्रकारांचे सादरीकरण

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा केंद्रीय युवा महोत्सव या सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन २५ ते २८ डिसेंबर या कालावधीत विद्यापीठ परिसरात करण्यात आले आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली.

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आहे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील कलागुणांसह सुप्त प्रतिभांचा विकास व्हावा, उच्च शिक्षणातील तरुणांमध्ये सांस्कृतिक वृत्ती रुजावी, प्रतिभावान विद्यार्थी कलावंतांना राज्यस्तरीय, विभागीय व राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, सोबतच निवडक युवा कलाकारांना सांस्कृतिक कला स्पर्धेसाठी तयार करावे, यासाठी केंद्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. संगीत, नृत्य, नाट्य, ललित कला, वाङ्मय, महाराष्ट्राची लोककला अशा सहा विभागात ही स्पर्धा संपन्न होणार आहे.

३६ कला प्रकार

३६ कलाप्रकारांचे सहा रंगमंचावरून सादरीकरण होणार आहे. याकरिता पदवी व पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांचे वय वर्षे २५ पेक्षा अधिक नसावे. तसेच केवळ महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येईल. यामध्ये कोणत्याही प्रकारची चुकीची वा खोटी माहिती आढळून आल्यास महाविद्यालयावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे विद्यार्थी विकास मंडळ सल्लागार समितीच्या बैठकीत ठरविण्यात आले.

सहभागी होण्याचे आवाहन

या बैठकीला कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्यासह सदस्य डॉ. दासू वैद्य, डॉ. सोनाली क्षीरसागर, डॉ. किशोर शिरसाठ, डॉ. वैशाली देशमुख, इंजि. आर. डी. काळे, उपकुलसचिव डॉ. संजय कवडे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भगवान साखळे, डॉ. मुस्तजीब खान यांची उपस्थिती होती. या महोत्सवात अधिकाधिक महाविद्यालयांनी, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर व विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी केले आहे.

# समाज सेवा करण्यासाठी मी कटिबद्ध : मनोज पवार

## तालुक्यातील मतदारांनी दिलेला कौल मान्य

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०१ डिसेंबर - कन्नड सोयगाव विधानसभेच्या निवडणुकीच्या माध्यमातून प्रथमच राजकारणात उतरलेले उद्योजक मनोज पवार हे पराभूत झाले. त्यांनी केलेले समाजकारण आणि प्रचारात मतदारांसमोर ठेवलेले व्हीजन पाहता त्यांना अतिशय त्रोटक मते मिळाली. हा पराभव त्यांनी मान्य केला. यापुढे कोणतीही राजकीय भूमिका आपली राहणार नाही असे त्यांनी जाहिर केले.

मतदारांच्या भेटीसाठी राजुरेश्वर येथे घेतलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, जनतेचा निर्णय पूर्णतः मान्य करतो. यापुढे माझी कोणतीही राजकीय भूमिका नसेल. मात्र, समाजाच्या भल्यासाठी आणि मतदारसंघातील प्रगतीसाठी माझे प्रयत्न अखंड सुरू राहतील. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि स्थानिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी मका स्टार्च उत्पादनावर आधारित फार्मा प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून औद्योगीकरण घडवून आणण्याचा निर्धार केला आहे. या उपक्रमामुळे मतदारसं च्याघात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील आणि स्थानिक तरुणांना त्यांच्या कौशल्याचा उपयोग करून आत्मनिर्भर बनवता येईल. हा प्रयत्न फक्त आर्थिक स्थैर्य देणार नाही, तर आपल्या मतदारसंघाच्या उज्ज्वल भविष्याचा पाया देखील रचेल. राजकीय भूमिका न घेता, उद्योग आणि रोजगाराच्या माध्यमातून समाजसेवेचा संकल्प पूर्ण करण्यासाठी नेहमी तत्पर राहीन., अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार किलोमीटरवर असलेले तालुका कृषी कार्यालय शहरात आणा !

## शेतकऱ्यांचे मागणी; कार्यालयात जाण्यासाठी मोजावे लागतात दोनशे रुपये

तभा वृत्तसेवा

कन्नड -दि ०१ डिसेंबर - कन्नड तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय हे शहरापासून तब्बल चार किलोमीटर अंतरावरील ब्राम्हणी गराडा रोडवर नरसिंगपूर शिवारात कृषी विभागाच्या जागेवरील इमारती मध्ये आहे.

या कार्यालयात जाण्यासाठी शेतकऱ्यांना खासगी वाहनाने जाण्यासाठी तब्बल २०० रुपये मोजावे लागण्याची दुर्दैवी बाब आहे

हे कार्यालय कन्नड शहरात स्थलांतरीत करण्याची मागणी शेतकरी व नागरीक करत आहेत. नवनिर्वाचित आमदार संजना जाधव यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व कार्यालय शहरात स्थलांतरित करावे जेणे करून शेतकऱ्यांना पायपीट करावी लागणार नाही,किंवा खाजगी वाहनाला २०० रुपये खर्च करण्याची वेळ येणार नाही.

**तालुका कृषी कार्यालय शहरापासून खूपच लांब आहे हे कार्यालय शहरात परत आणून तालुका कृषी अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी शहरात शेतकऱ्यांची कामे करायला पाहिजे शहरात कृषी कार्यालय लवकर स्थलांतरित करून शेतकऱ्यांची होणारी गैरसोय दूर करणार आहे**

**- आमदार संजना जाधव**

तालुका कृषी अधिकारी कार्यालय शहरापासून चार किलो मीटर अंतरावर ब्राम्हणी गराडा रोडवर आतमध्ये कृषी विभागाच्या शेत जमीनीतील इमारती मध्ये आहे. या ठिकाणी फळबाग,रोप वाटीका असून या कार्यालयात ८४ कर्मचारी व रोप वाटीकेत १२ कर्मचारी कार्यरत आहेत. तालुक्यातील ९२ हजार शेतकऱ्यांचा संपर्क या कार्यालयाशी आहे.

१ लाख ४ हजार ४०९ हेक्टर शेतीचे नियोजन व मार्गदर्शन या कार्यालयातून होते. या ठिकाणी जाण्यासाठी कोणत्याही वाहनाची सोय नाही. जायचे असेल तर खासगी वाहनाने किंवा चार कि.मी.ची पायपीट करावी लागते. विशेष म्हणजे रोड लगत वाहने लावून कार्यलयात शेतकरी, अधिकारी व कर्मचारी यांना जाण्यासाठी दिड किलो मीटर पायपीट करावी लागते. पीक विमा, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी , मुख्यमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा , पोकरा योजनेची अमंलबजावणी , ठिबक संच तसेच कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी या कार्यालयातून होते. याच ठिकाणी फळबाग रोप वाटीका असल्याने विविध फळझाडांच्या कलम घेऊन जाण्यासाठी जिकरीचे होताना दिसून येत आहे. सदर कार्यालय मध्यवर्ती ठिकाणच्या ऐवजी दुरस्थ असल्याने शेतकऱ्यांच्या कामांना यामुळे खीळ बसली आहे. दोन वर्षा पुर्वी तात्कालीन जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी या ठिकाणी भेट दिली होती. त्यावेळी याठिकाणी असलेल्या पुलाची दयनीय अवस्था झालेली होती परंतु लोक प्रतिनिधी सह संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याने या पुलाची परिस्थिती 'जैसे थे'च आहे. यामुळे कन्नड तालुक्यातील शेतकरी, कृषी अधिकारी, कृषी कर्मचारी यांना या ठिकाणी जाण्याची सोय नाही. यामुळे सदर कार्यालय कन्नड शहरा मध्ये मध्यवर्ती ठिकाण स्थंलातरीत करण्याची मागणी केली जात आहे.

# छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यावर पावसाचे सावट

## ढगाळ हवामानामुळे तापमानात सहा अंशाची वाढ

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

दक्षिणेत सुरू असलेल्या फेंगल चक्रीवादळाचा परिणाम शहरासह मराठवाड्यात दिसून येत आहे. शनिवार, रविवार रोजी दिवसभर ढगाळ वातावरण होते. यामुळे तपमानात वाढ होत असून रविवार रोजी तापमानात तब्बल सहा अंशाने वाढ झाल्याची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे. दरम्यान, रविवारी, चिकलठाणा वेधशाळेने १ डिसेंबर रोजी कमाल तापमान २९.४, तर किमान तापमान १६.० अंश सेल्सिअस एवढे नोंदविले आहे. शुक्रवारी आणि शनिवारी १० ते ११ अंश सेल्सिअस एवढे किमान तापमान होते.

बंगालच्या उपसागर निर्माण झालेले फेंगल हे चक्रीवादळ कोलकाताच्या दिशेने जात आहे. दरम्यान, या वादळाचा परिणाम दक्षिणोत्तर राज्यांमध्ये दिसून येत आहे. यात मराठवाड्यासह महाराष्ट्रातील काही भागांचाही समावेश आहे. याच्या परिणामी मराठवाड्यातील दक्षिणी जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. याच्या परिणामी छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात रविवार, १ रोजी ढगाळ वातावरण होते. ढगाळ वातावरण असल्याने वाऱ्याचा वेग कमी झाला. आणि तापमानात वाढ झाली आहे. शनिवार रोजी किमान तापमान ११ अंश होते. रविवारी यात तब्बल सहा अंशांनी वाढ होऊन १६ अंशांची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे. फेंगलच्या प्रभावामुळे मराठवाड्यातील काही भागांत पावसाची शक्यता असून मराठवाड्यातील दक्षिणोत्तर असलेले नांदेड, परभणीकडील जिल्ह्यांमध्ये तुरळक पावसाचा अंदाज एमजीएम वेधशाळेचे शास्त्रज्ञ डॉ. श्रीनिवास औंधकर यांनी 'नवराष्ट्र'शी बोलताना व्यक्त केला आहे. ही स्थिती आणखी दोन दिवस राहणार असल्याचे औंधकर यांनी सांगितले आहे. दरम्यान, ६ ते १२ डिसेंबरदरम्यान मराठवाड्यातील काही भागांत पावसाची शक्यता वसन्तराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील ग्रामीण मौसम विभागाच्या शास्त्रज्ञानी व्यक्त केली आहे. मुंबई येथील प्रादेशिक हवामान केंद्राच्या वतीने प्राप्त झालेल्या अंदाजानुसार, मराठवाड्यत पुढील तीन दिवस हवामान कोरडे राहणायची शक्यता आहे. तर २ व ३ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

फेंगलचा परिणाम

दरम्यान, दक्षिणी भागात सुरु असलेल्या नैसर्गिक आपत्तीचा परिणाम मराठवाड्यावर होत आहे. ३१ नोव्हेंबरपासून ढगाळ वातावरण सुरु आहे. अशातच मराठवाड्यातील तुरळक ठिकाणांसह राज्याच्या काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. ढगाळ वातावरणामुळे शनिवारी तापमानात वाढ झाली होऊन ११ अंश झाली होती, रविवारी यात आणखी वाढ होऊन पारा १६ अंशापर्यंत वाढला होता.

ढगाळ वातावरण

दरम्यान, वातावरणातील बदलाचा परिणाम तापमानावर होतो आहे. सध्या ढगाळ वातावरणामुळे हवेतील शुष्कता वाढली असल्याने पाराही वाढीस लागला आहे. रविवार रोजी चिकलठाण वेधशाळेने कमाल २९. ४ तर किमान १६ अंश तापमानाची नोंद घेतली आहे.

# 'सिफा' च्या सचिवपदी शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांची निवड

छत्रपती संभाजीनगर : शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांची देशातील शेतकरी संघटनांची शिखर संघटना असलेल्या भारतीय किसान संघ परिसंघ (सिफा) च्या राष्ट्रीय सचिवपदी निवड झाली आहे. सिफाचे मुख्य सल्लागार पी. चेंगलरेड्डी यांनी सिफाच्या हैदराबाद येथील राष्ट्रीय किसान संमेलनात ही घोषणा केली.

कालिदास आपेट यांनी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते म्हणून शरद जोशी यांच्या नेतृत्वात सन १९८३ साली विद्यार्थी दशेपासून सुरुवात केली. सन १९८८ ते १९९० पर्यंत शरद जोशी यांच्या समवेत आंबेठाण जि. पुणे येथे वास्तव्य केले. शेतकरी संघटनेने पुकारलेल्या कर्जमुक्ती, उसाची झोनबंदी, कापसावरिल प्रांतबंदी आणि कर, कर्जा नहीं देंगे, बिजली का बील भी नहीं देंगे या शेतकरी विरोधी कायद्यांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविलेला आहे. प्रसंगी अनेकदा तुरुंगवासही भोगला आहे. शरद जोशी यांच्या विचारांवर राष्ट्रीय पातळीवर काम करणारी सिफा ही एकमेव संघटना आहे. सिफाच्या सचिवपदी कालिदास आपेट यांची निवड करताना डावीकडून पी. चेंगलरेड्डी, नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष बिपिनभाई पटेल, मानद अध्यक्ष रघुनाथदादा पाटील, सिफाचे जनरल सेक्रेटरी शंकर नारायण रेड्डी आणि कालिदास आपेट दिसत आहेत.

# परमपूज्य बाबाजींच्या ३५ व्या पुण्यस्मरण निमित्त जनशांती धर्मसोळ्याचे आयोजन स्थळ श्रीक्षेत्र ओझर नाशिक

तभा वूतसेवा

खुलताबाद. निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज अर्थात प.पु. बाबाजींनी अध्यात्मिक-सामाजिक कार्याची पताका देशभरात फडकविली. गुरुकुल शिक्षण, कृषीसेवा, गोसेवा, अनुष्ठान परंपरा व धर्मसंस्कार सोहळ्यांच्या माध्यमातुन लाखो कुटूंबांमध्ये शिवभक्ती निर्माण केली. लाखो लोक व्यसनमुक्त करून सशक्त समाजनिर्मितीसाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

हीच परंपरा श्री बाबाजींच्या कृपाशिर्वादाने त्यांचे उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज पुढे नेत आहेत. त्यांच्या प्रेरणेने 'श्री क्षेत्र जनशांती धाम' श्री क्षेत्र ओझर नाशिक येथे हे भव्यदिव्य अध्यात्मिक तीर्थक्षेत्र विकसित झाले आहे. या पावन भूमीवर श्री बाबाजींच्या ३५ व्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने 'जनशांती धर्म सोहळा' या कार्यक्रमाचे आयोजन ५ डिसेंबर ते १२ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्यानिमित्त= जपानुष्ठान, १११ कुंडी यज्ञ ,श्रीमद् भागवत पारायण ,नामस किर्तन, अखंड नंदादीप ,महिला जप आणि या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता उत्तर अधिकारी महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून पूर्णत्वास गेलेले भगवान बानेश्वर महादेव मंदिर अर्थात जनशांती धाम यावर १७५ स्वर्ण कलश स्थापित होणार असून यामध्ये ४१ सुवर्ण कलश हे मोठे असून या कलशाची विधीवत पूजा हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये व देशभरातील पूजनीय संत व मान्यवराच्या शुभ हस्ते कलश व मूर्ती स्थापनेचा हा सोहळा दिनांक ११ तारखेला संपन्न होणार आहे या पुण्यस्मरणाची समाप्ती १२ डिसेंबर रोजी संपन्न होणार असून या भव्य दिव्य सोहळ्याची तयारी गेल्या सहा महिने पासून महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जय बाबाजी भक्त परिवार करत आहे येणाऱ्या लाखो भाविकांची प्रसादाची पिण्याच्या पाण्याची व आरोग्याची व्यवस्था करण्यात आली असून महाप्रसादासाठी ११११ साखर पोत्यांची बुंदी करण्यात येणार आहे सर्व भाविक भक्तांनी परम पूज्य बाबाजी च्या ३५ लप व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित जनशांती धर्म सोहळ्याचा लाभ घेऊन परमपूज्य बाबाजींचा आशीर्वाद प्राप्त करावा असे आव्हान जय बाबाजी भक्त परिवार महाराष्ट्र व जनशांती धर्म सोहळा समितीच्या वतीने प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र पवार यांनी केले आहे .

# शिक्षण परिवर्तनाचे प्रभावी माध्यम : ऋषिकेश चव्हाण

## वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०१ डिसेंबर - शिक्षण परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे वाढदिवसाला खर्च करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात वापरला जावा यासाठी ऋषिकेश चव्हाण यांनी निर्धार केला

वाढदिवसाचा खर्च वाया जाण्याऐवजी विद्यार्थ्यांचे शालेय हित वाढून त्यांच्या गरजा भागवता येतील. शिक्षण हे परिस्थिती बदलण्याचे माध्यम आहे आणि आपले ज्ञान वाढवण्यात शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नाउमेद व निराश न होता पुढील शिक्षणासाठी



प्रयत्न केले पाहिजेत. जीवनात बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण उपयुक्त आहे. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते ऋषिकेश चव्हाण यांनी केले

तालुक्यातील भिलदरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना भारतीय संविधान दिन व वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी गोरख जाधव, सागर चव्हाण, तुषार चव्हाण यांच्यासह मित्र मंडळातील इतर सदस्य पालक उपस्थित होते.

# ...आता सरकारची जबाबदारी

## प्रासंगिक

अक्षय रानडे

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने मिळवलेल्या अभूतपूर्व यशानंतर लोकसभा निवडणुकीमध्ये मागे राहिलेली प्रत्येक जागा महायुतीने बळकावल्याचे दिसले. खेरीज महिलांनी मतदानाच्या प्रक्रियेत घेतलेला पुढाकारही निर्णायक ठरल्याचे पाहायला मिळाले. हे दोन्ही कल येत्या काळातही काम करतील आणि सरकार राज्याच्या मुख्य प्रश्नांना हात घालून जनमताचा मान ठेवेल अशी अपेक्षा आहे.**

नुकतीच पार पडलेली राज्य विधानसभा निवडणूक अनेकार्थाने महत्त्वपूर्ण होती. गेले काही दिवस सुरू असणाऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक घुसळणीचा फार मोठा प्रभाव या निवडणुकीवर होताच. खेरीज राजकारणाचा वेगळा बाज अनुभवल्यानंतर मतपेटीतून दिसलेला मतदारांचा कौलही अत्यंत महत्त्वपूर्ण होता. त्यामुळे निवडणूक, निकाल आणि नवीन सरकारची स्थापना असे सगळे मैलाचे दगड पार करूनही या निवडणुकीचे कवित्व पुढील बराच काळ उरणारे आहे. ही निवडणूक कुठली शिवसेना आणि राष्ट्रवादी खरी आणि कोणती खोटी हे ठरवणारी होती, राज्यातील काँग्रेसची स्थिती निर्देशित करणारी होती, तसेच भाजपाचा घटता वा वाढता जनाधार निश्चित करणारी होती. या पृष्ठभूमीवर मतदारांनी स्पष्ट आणि निर्विवाद कौल देत महायुतीला पाठिंबा दिला, तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच मूळ पक्ष असल्याचे निर्देशित केले. स्वाभाविकच आता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे दोन्ही पक्ष आगामी काळातील राजकारणाकडे कशा प्रकारे बघतील, हे आता पाहावे लागेल.

महाराष्ट्रात काँग्रेसचा दारुण पराभव झाला. युती वा आघाडी असणाऱ्या राज्यांमध्ये सातत्याने पराभव होताना दिसत असल्यामुळे काँग्रेसला आता आपल्या विचारसरणीचाच नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाल्यासारखी स्थिती पाहायला मिळत आहे. काँग्रेस निवडणुकीमध्ये हवा तेवढा जोर लावत नसल्याचा आक्षेप केवळ महाराष्ट्रातील त्यांच्या मित्रपक्षांचा नसून, देशातील विविध राज्यांमधील मित्रपक्षांचीही सातत्याने हीच तक्रार राहिली आहे. त्यामुळेच आता त्यांची प्रतिष्ठा पणाला लागल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. खरे तर लोकसभा निवडणुकीनंतर ती थोडी वाढली होती. पण महाराष्ट्रातील निवडणुकांनंतर आता येणाऱ्या अन्य निवडणुकांमध्ये त्यांची बार्गेनिंग पॉवर किती राहील, हे बघावे लागणार आहे. कारण, महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या राज्यात इतर पक्षांप्रमाणे त्यांनीही बराच जोर लावला होता. त्यामुळेच एकंदर निवडणुकांच्या समीकरणामध्ये त्यांना आपली पत पुन्हा मिळवण्यासाठी बराच प्रयत्न करावा लागणार आहे.

एकूणच या निवडणूक निकालाने इतिहास घडवला असे म्हणण्यास पुरेपूर वाव आहे. यापूर्वी काँग्रेस पक्षाला एवढे यश मिळाले असेल, पण त्यानंतर कोणत्याही एका पक्षाला वा पक्षसमूहाला एक तृतीयांश मते मिळाल्याचे चित्र महाराष्ट्राने बघितलेले नाही. म्हणूनच महायुतीला मिळालेले हे अपूर्व यश नवा इतिहास घडवणारे आहे. म्हणूनच आश्चर्यही वाटणार नाही. खेरीज या निवडणुकीमध्ये राजकारणातील एक पिढी बदलल्याचे चित्रही बघायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांचे पुढे आलेले नेतृत्व असेल वा शिवसेनेमध्ये एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व असेल वा भाजपामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा मिळवलेले आपले स्थान असेल; हे सगळेच मुद्दे महत्त्वपूर्ण म्हणावे लागतील, कारण या नेतृत्वांचा उदय आधीची पिढी मागे टाकणारा, विचारांची दिशा बदलवणारा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये महायुतीला मोठा फटका बसला. त्यानंतर अनेकांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मात्र, ताज्या निवडणूक निकालामध्ये भाजपाला मोठा विजय मिळाल्यानंतर आता या शंकेला जागा उरली नसून त्यांचे निर्विवाद नेतृत्व स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच राज्यस्तरीय पातळीवर आता त्यांचे नेतृत्व ओळखले जाईल, यात शंका नाही.



आधी उल्लेख केल्याप्रमाणे या निवडणुकीतून समोर आलेले चित्र राज्यात काँग्रेसचा अस्त होतोय का, हा प्रश्न पुढे आणणारे आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला काही प्रमाणात का होईना, महाराष्ट्र आणि देशातील काही राज्यांमध्ये यश मिळालेले दिसले. मात्र, महाराष्ट्राचा विचार करता इथे त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कर्नाटक वगळता काँग्रेसला कुठेही स्वतंत्रपणे यश मिळवता आलेले नाही. झारखंडचा विचार केला तरी तेथे मिळालेले यश झारखंड मुक्ती मोर्चाचे असल्याचे स्पष्ट दिसते. काँग्रेसच्या महाराष्ट्रातील नेतृत्वाचा विचार केला तर बऱ्याच मोठ्या नेत्यांनाही इथे यश मिळाल्याचे दिसले नाही. पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात असे नेते पराभूत झाले. अशोक चव्हाण यांच्यासारख्या ज्येष्ट नेत्याने तर आधीच पक्षांतर केलेले... अशा अवस्थेत पुढच्या काळात काँग्रेसचा महाराष्ट्रातील पाईक कोण असेल, हा प्रश्न उरतो. म्हणजेच वैचारिक आणि संस्थात्मकदृष्ट्या महाराष्ट्रात काँग्रेसची जबर पीछेहाट होतेय का आणि त्यांची जागा आताचे हे नवे पक्ष घेत आहेत का, हे बघावे लागेल. काँग्रेसला इथे पुन्हा ताकदीने उभे राहायचे असेल तर आधी स्वत:मध्ये काही मूलभूत बदल घडवून आणावे लागतील, हे ताज्या निकालांनी दाखवून दिले आहे.

या निवडणुकांनंतर राज्य स्तरावरील राजकीय समीकरणे बदललेली दिसतील. आधीचे राजकीय ध्रुवीकरण वेगळे होते. भाजपा-शिवसेना एका ठिकाणी, तर राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस दुसऱ्या ठिकाणी असे चित्र राज्याने बराच काळ पाहिले. एक धर्मनिरपेक्ष पुरोगामी गट, तर दुसरी कट्टर हिंदुत्ववादी आघाडी अशी ही फळी होती. पण आता काही प्रमाणात हे ध्रुवीकरण बदलताना दिसत आहे. अजित पवारांचा गट, एकनाथ शिंदे गट भाजपाबरोबर आल्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गट बऱ्याच प्रमाणात कमकुवत झालेला आहे. त्यामुळे आपल्याला पुढील राजकीय समीकरणे बऱ्याच प्रमाणात बदललेली दिसतील. त्याचा फायदा निश्चितच भाजपा आणि शिंदे गटाला होताना दिसेल.

या निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये भाजपाचे वाढलेले वजन हादेखील येत्या काळात प्रभावी ठरणारा विषय असेल. २०१४ च्या आधी एकत्रित शिवसेना हा आघाडीवरील पक्ष होता तर भाजपा दुसऱ्या क्रमांकावरील पक्ष समजला जायचा. मात्र, २०१४, २०१९ आणि आता २०२४ मधील निवडणुकांमध्ये झालेले मतदान पाहता लक्षात येते की, आता भाजपाने राज्यावर पूर्ण वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळेच राज्यातील सर्वांत मोठा पक्ष झाला आहे. त्यानुसार काही समीकरणेही बदललेली दिसत आहेत. उदाहरणार्थ, महत्त्वपूर्ण सहकार क्षेत्रात भाजपा पाय रोवताना दिसत आहे. अजित पवारांना आपल्याकडे घेण्यामागेही अशी भूमिका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. थोडक्यात, येत्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपाचा प्रभाव वाढणार आहे. शिवसेनेला काही प्रमाणात का होईना, भाजपाबरोबर जमवून घ्यावे लागले आहे.

पुढील पाच वर्षे महाराष्ट्राला एक स्थिर सरकार मिळण्याच्या दृष्टीने जनतेने दिलेला कौल अत्यंत आश्वासक आहे. शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिघांनीही संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये एका सुसूत्रतेने लढत दिली. त्यांच्यामध्ये बऱ्याच प्रमाणात एकमत झालेले दिसले. म्हणूनच पुढची पाच वर्षे महाराष्ट्राला स्थिर सरकार मिळण्याची अपेक्षा आहे. आता या सरकारवरील जबाबदारीही वाढली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जाच्या वाढत्या बोज्याचा-असंतुलित विकासाचा मुद्दा, विदर्भ-मराठवाड्याला पुढे नेण्याचा, रखडलेले प्रकल्प पुढे नेण्याचा प्रश्नही विचारात घ्यावा लागेल. मागे राहिलेले प्रकल्प, योजना गतिमान करणे आणि महाराष्ट्राचा विकासदर वाढवून वेगाने प्रगतिशील अवस्थेकडे नेण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. जनतेच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान या सरकारपुढे असेल.

वैचारिकदृष्ट्या या सरकारपुढे फार अडचण येईल असे वाटत नाही. पुरेसे बहुमत असल्यामुळे हिंदुत्वाचा विषय वा तसे कळीचे विषय हाताळत सरकार चालवण्यात त्यांना फारशी अडचण येणार नाही. मात्र, अजित पवार गटाला सांभाळत पुढे नेण्याचा प्रश्न काही प्रमाणात असेल. याचे कारण म्हणजे निवडणूक प्रचारात भाजपाच्या काही मुद्द्यांपासून पवारांनी फारकत घेतल्याचे आपल्या नजरेतून सुटलेले नाही. 'एक है तो सेफ है', 'बटेंगे तो कटेंगे'सारख्या कळीच्या हिंदुत्ववादी प्रचाराला त्यांनी लांब ठेवलेले दिसले. त्यामुळेच अशा काही विषयांवर सरकारपुढे पेच निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेगळ्या विदर्भाचा विषय वा लहान राज्यांच्या निर्मितीबाबतचे आपले मुद्दे भाजपा फारसे पुढे नेऊ शकेल, असे वाटत नाही. कारण, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष त्याच्या बाजूने नाहीत. आजही एकहाती सत्ता असल्यामुळे भाजपाला काही बाबतीत तडजोड ही करावी लागेल, हे निश्चित!

(लेखक प्रसिद्ध विश्लेषक आहेत)

# उत्तर प्रदेशमध्ये योगींची करामत

## दखल

अजय तिवारी

**ताज्या पोटनिवडणुकांमध्ये उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांनी धमाल केली आणि अखिलेश यादव यांना जमिनीवर आणले. लोकसभा निवडणुकीतील यश डोक्यात गेल्याने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे जे झाले, तेच उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यांचे झाले होते. भाजपाच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी आणि दीड वर्षांत होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा विजय उपयोगी पडणार आहे.**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीला धोबीपछाड दिली. तशीच धोबीपछाड या आघाडीने उत्तर प्रदेशमध्ये भाजपा आणि त्याच्या मित्रपक्षांना दिली. मात्र, त्याची अगदी तशीच परतफेड योगी आदित्यनाथ यांनी करून अखिलेश यादव यांना जमिनीवर आणले. निवडणुकीतील प्रचाराचे चलनी नाणे झाले असताना योगींनी उत्तर प्रदेशवरील पकड ढिली होऊ दिली नाही, हे तेथील पोटनिवडणुकांच्या निकालावरून दिसते. नऊ जागांच्या या निकालामुळे सत्ता समीकरणात काहीही फरक पडणार नसला, तरी भाजपाच्या कार्यकर्त्यांचा लोकसभेच्या निवडणुकीनंतर कमी झालेला आत्मविश्वास परत मिळवून देण्यासाठी आणि दीड वर्षांत होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा निकाल खूप उपयोगी पडणार आहे. या वेळी उत्तर प्रदेशमध्ये नऊ जागांवर झालेल्या पोटनिवडणुका योगी यांच्यासाठी जीवन-मरणाचा प्रश्न बनल्या होत्या. समाजवादी पक्षाचे बालेकिल्ले उद्ध्वस्त करताना अखिलेश यांना मोठे धक्के दिले. साठ टक्क्यांहून अधिक मुस्लिम असलेल्या मतदारसंघात भाजपाचा उमेदवार सव्वा लाखपेक्षा अधिक मतांनी जिंकतो, हा मोठा संदेश आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि योगींना ज्या पराभवाला सामोरे जावे लागले होते, त्यातून बाहेर पडण्यास पोटनिवडणुकांचे निकाल पक्षाला मदत करू शकतील. योगींनी लोकसभा निवडणुकीनंतर लगेचच पोटनिवडणुकीत सर्व जागा जिंकण्याचा निर्धार केला होता. तो त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखवला.

भारतीय जनता पक्षातील कथित अंतर्गत कलहाचा परिणाम या निवडणुकांमध्ये दिसून आला नाही. सर्वांनी संघटित होऊन जोमाने प्रचार केला. निवडणुकीत योगी यांनी पाच दिवसांमध्ये १५ सभा घेतल्या, यावरून याचा अंदाज लावता येतो. योगी सरकारने नऊ जागांवर ३० मंत्र्यांची टीम तयार केली होती. उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनीही सर्व नऊ जागांवर प्रत्येकी एका निवडणूक सभेला संबोधित केले. त्यांचा संपूर्ण जोर फुलपूर आणि माळवण या जागांवर होता. उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनीही नऊ जागांवर प्रत्येकी एक सभा घेतली. दुसरीकडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक यावेळी पूर्ण ताकदीने भाजपा उमेदवारांच्या प्रचारात उतरले होते. योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेची उत्तर प्रदेशपेक्षा महाराष्ट्रात जोरदार चर्चा झाली; परंतु तिथल्या पोटनिवडणुकीत या घोषणेची अजिबात आवश्यकता नव्हती. असे असताना समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी या घोषणेला जीवदान दिले आणि त्यांच्या पक्षाने या घोषणाबाजीला थट्टा मानून खिल्ली उडवली. हे केवळ आपल्या मूळ मतदारांना खूश करण्यासाठी केले गेले; परंतु त्याचा उलटा परिणाम झाला. दुसरीकडे, योगी आदित्यनाथ यांनी कायदा आणि सुव्यवस्था तसेच बेरोजगारीवर लक्ष केंद्रित केले. योगी यांनी कोणत्याही टीकेला न जुमानता बुलडोझर चालवून न्याय मिळवून देण्यावर भर दिला. त्यांची ही शैली लोकांना आवडते.

लोकसभा निवडणुकीत अखिलेश यांचा 'पीडीए'चा फॉर्म्युला कामी आल्याचे बोलले जात होते. त्यामुळे ही लढतही अखिलेश यांच्या या फॉर्म्युल्यावर होती.



भाजपाच्या 'ओबीसी फर्स्ट' फॉर्म्युल्यावर ते तुटून पडताना दिसत होते. पोटनिवडणुकीत 'पीडीए'चा फॉर्म्युला यशस्वी झाला असता, तर २०२७ पर्यंत तोच पुढे नेला असता; पण आता भाजपा आपला 'ओबीसी फर्स्ट' फॉर्म्युला पुढे नेणार आहे. या विधानसभा पोटनिवडणुकीत नऊ जागांवर ९० उमेदवारांमध्ये स्पर्धा होती. सर्व नऊ जागांवर भाजपा-सपा आणि बसपा यांच्यात तिरंगी लढत झाली; मात्र थेट लढत भाजपा आणि सपामध्येच झाली. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत या नऊ जागांपैकी समाजवादी पक्षाकडे चार जागा होत्या, तर 'एनडीए'कडे पाच जागा होत्या. त्यात भाजपाकडे तीन तर मित्रपक्षांना दोन जागा होत्या. या पोटनिवडणुकांमध्ये अखिलेश यांनी मुस्लिम कार्ड खेळले, तर भाजपाने ओबीसींवर डाव लावला. भाजपाने सर्वाधिक पाच ओबीसी, एक दलित आणि तीन सवर्ण दिले. भाजपाने कोणत्याही मुस्लिम व्यक्तीला तिकीट दिले नव्हते, तर समाजवादी पक्षाने चार मुस्लिम उमेदवार उभे केले आहेत. याशिवाय तीन ओबीसी उमेदवार, दोन दलित उमेदवार दिले; परंतु एकाही सवर्णाला तिकीट दिले नाही. यामुळे समाजवादी पक्ष मुस्लिमसमर्थक असल्याचा संदेश गेला. ओबीसी जातींच्या जनगणनेबाबत जिथे विरोधक भाजपाला कोंडीत पकडत आहेत, तिथे भाजपाने ओबीसींच्या मुद्यावरच बाजी मारली.

उत्तर प्रदेशमधील लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांमध्ये, विशेषत: काँग्रेस आणि समाजवादी पक्षांमध्ये ज्या प्रकारची एकजूट दिसली, ती यावेळी नव्हती. पोटनिवडणूक आपण एकट्याच्याच जीवावर जिंकू, असा विश्वास अखिलेश यांना होता. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसला अधिक संधी दिल्यास एक दिवस तो पक्ष आपल्याला खाऊन टाकेल, असे अखिलेश यांना वाटत असावे. उद्याची चिंता करून अखिलेश यांनी वर्तमानही खराब केले. लोकसभा निवडणुकीत रायबरेली, अमेठी आणि इतर लोकसभा जागांवर काँग्रेसला मिळालेली बंपर मते ही केवळ समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यामुळे मिळाली नसल्याचा पुरावा आहे. काँग्रेसनेही या लढाईत राहावे अशी जनतेची इच्छा होती. उत्तर प्रदेशमध्ये अनेक जण काँग्रेसकडे भाजपाला पर्याय म्हणून पाहतात. समाजवादी पक्षाने काँग्रेसला बरोबर घेतले असते, तर वेगळे चित्र दिसले असते. भाजपाने सोबत घेऊन मोठ्या भावाची भूमिका निभावली; पण अखिलेश यांनी मनाचा असा मोठेपणा दाखवला नाही. कुंडरकीच्या जागेवर तर भाजपाने आपला ३१ वर्षे जुना विक्रम मोडला. भाजपाने ही जागा १९९३ मध्ये जिंकली होती. खरे तर मुरादाबाद जिल्ह्यात येणाऱ्या या जागेवर ६० टक्क्यांहून अधिक मुस्लिम मतदार आहेत. या जागेवर भाजपाचे उमेदवार रामवीर सिंह ठाकूर आणि समाजवादी पक्षाचे उमेदवार हाजी रिझवान यांच्यात चुरशीची लढत व्हायला हवी होती; मात्र आश्चर्याची बाब म्हणजे या समाजवादी पक्षाच्या उमेदवाराने मोठ्या फरकाने ही जागा गमावली. ही जागा समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला मानली जात होती.

भाजपा सरकारमध्ये आठ वर्षांपासून सक्रिय कार्यकर्ता असलेले आणि जनतेला सर्वतोपरी मदत करणारे भाजपचे रामवीर सिंह ठाकूर यांना मुस्लिम समाजातील लोकांचाही पाठिंबा मिळाला. त्यांचे कुटुंब मुस्लिमांमध्ये खूप लोकप्रिय होते. यापूर्वी मुस्लिम समाजातील नेत्यांनी भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढवली; परंतु त्यांना या समाजाने नाकारले. या मतदारसंघात मुस्लिम मतांची विभागणी झाली. एकूण १२ उमेदवार होते. रामवीर सिंह वगळता सर्व मुस्लिम होते; परंतु मुस्लिम जनतेने त्यांच्यापैकी कोणालाच नेता म्हणून स्वीकारले नाही. या मतदारसंघामध्ये मुस्लिम जनताच अल्लाची शपथ घेऊन भाजपाला मत देण्याचे वचन घेत होती. तुर्किक मुस्लिम विरुद्ध राजपूत मुस्लिम मतांचा उपयोग करण्यासाठी भाजपाने त्यांच्या उमेदवारीचा डाव खेळला होता. येथील बासित अली हा नेता मुस्लिम राजपूत आहे. त्याने ठाकूर रामवीर सिंह यांना आपला भाऊ संबोधून मुस्लिम मते मिळवली. मुरादाबादमध्ये भाजपाच्या एका कार्यकर्त्याच्या मृत्यूनंतर मोठ्या मशिदीच्या इमामाने अन्त्यसंस्कार करण्यास नकार दिला. कारण मृताचे कुटुंब भाजपासमर्थक होते. एवढेच नाही तर, आजूबाजूच्या लोकांनीही या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकला होता. मृताच्या मुलाने जिल्हाधिकारी कार्यालय गाठून तक्रार दिली होती. मृताच्या तक्रारीवरून इमामासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात समाजवादी पक्षाच्या नेत्यांवर या कुटुंबाला धमकावल्याचा आरोपही करण्यात आला होता. याचा उलट परिणाम झाला आणि समाजवादी पक्षाच्या विरोधात अनेक लोकांचा मोर्चा निघाला. समाजवादी पक्षाने कुत्र्याच्या गळ्यात पट्टा बांधला, तरी कुंडरकी जागा जिंकू, अशी घोषणा केली होती. रामवीर सिंह यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याचा फायदा भाजपाला झाला. अशा प्रकारे भाजपाने ताज्या पोटनिवडणुकीमध्ये उत्तर प्रदेशमध्ये केवळ लक्षवेधी जागाच जिंकल्या नाहीत, तर गमावलेली प्रतिष्ठाही कमावली आहे.

## रविवारची पत्रे

### पर्थला भारतीय संघाचे कांगारूमर्दन

पर्थच्या ऑप्टस मैदानावर झालेल्या बॉर्डर-गावस्कर चषकाच्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाने बलाढ्य कांगारूंना तब्बल २९५ धावांनी मात दिली आहे. पहिल्या डावात दीडशे धावांमध्ये गारद होणाऱ्या भारतीय संघाने जणू काही 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा गांभीर्याने घेत सामन्यात पुनरागमन करत कांगारूंना काबूत केले. कांगारू संघाची मदार त्यांच्या पोलादी फलंदाजीत होती. शिवाय त्यांच्या दिमतीला स्टार्क, कमिन्स, हेजलवूड हे वेगवान त्रिकूट होते. मात्र भारतीय फलंदाजांनी ऑसींच्या 'पेस है तो सेफ है'चा नारा हाणून पाडत आपल्या संघात मालिकेत बढत मिळवून दिली.

खरे तर पर्थची खेळपट्टी फलंदाजांसाठी एक दु:स्वप्न होते. वेगवान गोलंदाजांचे चेंडू जणूकाही गरम तव्यावरील पॉपकॉर्नसारखे उडत होते. त्यातच सलामीला रोहित शर्मा नसल्याने, भारतीय फलंदाजी 'निराधार योजने'सारखी वाटत होती. क्रमवारीत यशस्वी जयस्वाल, राहुल, विराट, पंत, वॉशिंग्टन सुंदर, रेड्डी असले तरी ऑसींच्या पेस बॅटरीपुढे ते कितपत तग धरतील हा प्रश्नच होता. याच प्रश्नाचे उत्तर आपल्याला पहिल्या डावात मिळाले. उण्यापुऱ्या पन्नास षटकांत, दीडशेत भारतीय संघाचा बट्याबोळ होऊन सामन्याचे रूझान पहिल्याच दिवशी येऊ लागले होते. प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर पर्थला एक्झिट पोल घेतले असते तर भारतीय संघाच्या दारुण पराभवावर प्रेक्षकांनी शिक्कामोर्तब केले असते. भारतीय संघाची नजर त्यांचा हुकमाचा एक्का बुमराहवर होती. त्यानेही ऑल आईज ऑन बुमराहच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. एकहाती सत्ता द्या मी बदल घडवतोप्रमाणे बुमराहने एक हाती बॉल दिल्यावर पर्थला सत्तांतर घडवून आणले. अख्खा कांगारू संघ बुमरो बुमरो शाम रंग बुमरोच्या तालावर नाचू लागला. कधी नव्हे ते ऑस्ट्रेलियात डर का माहौल दिसू लागला होता आणि बुमराहसाठी आयसीसीने क्रिकेट संविधान बदलल्याच्या चर्चांना ऊत आले होते. जयस्वाल, राहुल, विराटच्या फलंदाजीला तळाशी येऊन नितीश रेड्डीने जो तडका दिला ते पाहता कांगारू गोलंदाजांचे हाल 'इस दिल के टुकडे हजार हुए, कोई यहां गिरा कोई वहां गिरा' असे झाले होते. कांगारूंवर बुमराची किती दहशत होती हे तिसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात पाहायला मिळाले. चौथ्या दिवशी ऑसी संघ कितपत प्रतिकार करतो याची उत्सुकता होती परंतु आपल्या वेगवान गोलंदाजांनी त्यांचे मनसुबे उधळून लावले. कांगारू संघाला डर के आगे जीत नहीं, लेकिन दर्द जरूर होता है हे कळून चुकले असेल. पर्थ आणि ऑसींचे वेगवान गोलंदाज यांचे मोहब्बतचे दुकान जयस्वाल, विराटच्या शतकी प्रहाराने बंद पाडले. गोलंदाजीत बुमराह, सिराजने अशक्यप्राय काम करून दाखवले. पाच कसोटींच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेऊन ऑसी संघावर दबाव वाढवला आहे. मात्र ऑसी संघाचा मूळ स्वभाव पाहता, त्यांना कमी लेखून चालणार नाही.

**डॉ. अनिल पावशेकर**/९८२२९३९२८७

### मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण

मुलांचे मूलभूत अधिकार म्हणजे प्रत्येक मुलाच्या जगण्यासाठी, वाढण्यासाठी, विकासासाठी आणि संरक्षणासाठी आवश्यक असणारे अधिकार. या अधिकारांचे संरक्षण हे केवळ त्यांच्या भल्यासाठीच नाही, तर देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला एक महत्त्वपूर्ण निर्णय यासंदर्भात आहे, ज्याने मुलांशी संबंधित अश्लील साहित्याच्या प्रसारावर कठोर भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणखी मजबूत झाले आहे. मुलांना त्यांचे जीवन सुरक्षित, सन्मानाने आणि सशक्तपणे जगता यावे, यासाठी काही मूलभूत अधिकार असतात. हे अधिकार कोणत्याही परिस्थितीत अबाधित राहिले पाहिजेत. संयुक्त राष्ट्र बाल अधिकार घोषणापत्र हे मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आहे. यात चार प्रमुख अधिकारांचा उल्लेख आहे-

जीवनाचा अधिकार : प्रत्येक मुलाला जीवन जगण्याचा आणि त्यांचे आरोग्य व विकासाचे संपूर्ण समर्थन मिळण्याचा हक्क आहे. संरक्षणाचा अधिकार : मुलांना शारीरिक, मानसिक आणि भावनिक शोषणापासून संरक्षित केले पाहिजे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या शोषण, हिंसा किंवा शारीरिक छळाचा सामना करावा लागू नये. विकासाचा अधिकार : मुलांना शिक्षण, आरोग्यसेवा आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व संधी मिळणे आवश्यक आहे.

सहभागाचा अधिकार : मुलांना आपल्या जीवनातील निर्णयांमध्ये सहभागी होण्याचा हक्क आहे, त्यांना आपले मत मांडता यावे आणि त्यांचे मत विचारात घेतले जावे. भारतीय संविधानातही मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचे अनेक उपाय केले गेले आहेत. याशिवाय, पोक्सो कायदा आणि माहिती तंत्रज्ञान कायदा हे मुलांच्या संरक्षणासाठी महत्त्वाचे आहेत. पोक्सो कायदा मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण देतो तर आयटी कायदा मुलांशी संबंधित अश्लील साहित्याच्या प्रसारावर कठोर निर्बंध लावतो. न्यायालयाने महत्त्वाच्या एका निकालात युक्तिवाद केला की, नवीन शब्द योग्यरीत्या व्यक्त करेल की ही केवळ अश्लील सामग्री नाही तर एका लहान मुलासोबत घडलेल्या भीषण घटनेची नोंद आहे. मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे. समाजातील जबाबदार नागरिक या नात्याने आपली भूमिका ही अशा लैंगिक कुंठित मानसिकतेला रोखण्याची असली पाहिजे. या कृतीतून समाजातील नैतिक अध:पतनाची उंचीही दिसून येते. इंटरनेटवर अश्लील साहित्याची विपुलता पाहता किशोरवयीन मुलांचे प्रबोधन करून त्यांना प्रौढ आणि जबाबदार नागरिक बनवण्यासाठीही प्रयत्न व्हायला हवेत. मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण हे कोणत्याही समाजाचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य आहे.

सरकार, समाज, पालक, शिक्षक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या यांच्यात सामूहिक प्रयत्नांनीच मुलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण होऊ शकते. बालकांना सुरक्षित, सन्माननीय आणि सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण देणे हे समाजाचे कर्तव्य आहे, ज्यामुळे ते सक्षम आणि सशक्त नागरिक होऊ शकतील.

**विकास मेश्राम**/७८७५५९२८००

### पाकिस्तानची हेकडी कायम

भारताचे कार्यक्षम व तडफदार परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर १५ व १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या एससीओ बैठकीच्या निमित्ताने पाकिस्तानला जाऊन आले. त्यांच्या या बैठकीचे कवित्व पाकिस्तानी माध्यमांमध्ये दीर्घकाळ गायिले जाईल, असे दिसते. चिनी पंतप्रधान या बैठकीला उपस्थित असतानाही त्या देशातील मुख्य धारेतील माध्यमे व सोशल माध्यमांचे लक्ष डॉ. जयशंकर यांच्यावरच केंद्रित झाले होते. डॉ. जयशंकर यांचा प्रत्येक भाव व त्यांची कृती याचे बारीक अवलोकन करीत त्यातून अर्थ काढण्याचे प्रयत्न झाले. डॉ. जयशंकर पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना भेटायला जात असताना आपले परराष्ट्रमंत्री त्यांच्यापासून पाच-सहा पावले दूर असतानाच शरीफ यांनी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला होता, ही बाब सूचक ठरते. या कृतीतून पाकिस्तानची अगतिकताच दिसून येते. परराष्ट्रमंत्र्यांनी त्यांच्या २४ तासांच्या इस्लामाबाद भेटीदरम्यान ते सभ्य भारतीय संस्कृतीचे पाईक आहेत, हे पदोपदी कृतीने दाखवून दिले. पाकिस्तान वरकरणी जरी भारताबाबत मित्रत्वाचा हात पुढे करण्याचा देखावा करीत असला, तरी नेहमीप्रमाणे त्यांचा अंत:स्थ हेतू वेगळा आहे, हे लपून राहात नाही. त्यांची अर्थव्यवस्था सध्या गाळात गेली आहे. गोवा येथे झालेल्या बैठकीला त्यावेळचे पाकिस्तानी परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो भारतात आले होते. विमानतळावर त्यांचे स्वागत आपल्या परराष्ट्र खात्यातील अधिकाऱ्याने केले होते. याला प्रत्युत्तर म्हणून डॉ. जयशंकर यांचे इस्लामाबाद विमानतळावर स्वागत त्यांच्या परराष्ट्र मंत्रालयातील अधिकाऱ्याने केले. भारताने गोवा बैठकीसाठी १३ पाकिस्तानी पत्रकारांना व्हिसा प्रदान केला होता. पाकिस्तानने इस्लामाबाद बैठकीसाठी १३ च भारतीय पत्रकारांना व्हिसा दिला. या कृतीमधून त्यांच्या जनतेला ते संदेश देऊ इच्छितात की, ते भारतासोबत बरोबरी करू शकतात. आज पाकिस्तानला भारताची गरज आहे. आपल्याला त्यांची अजिबात गरज नाही. असे असतानाही तो देश त्यांच्या परंपरागत ठोशास ठोसा या मानसिकतेतून बाहेर पडू शकत नाही. यातून त्यांची हेकडी अजूनही कायम असल्याचे दिसून येते.

**सतीश भा. मराठे**/९४२२४७७६६८

### मराठी आणि महाराष्ट्र

महाराष्ट्राची सुरुवात जरी मरहट्टी बोलीभाषेपासून झाली, तरी महाराष्ट्राचा प्रवास हा खूप मोठा आहे. मग ती मरहट्टी असो, मऱ्हाट्टी असो किंवा आता आपण बोलणारी मराठी; आपल्या लक्षात येतं की, आपण महाराष्ट्रातील मराठी माणसं आहोत. भाषा ही संवाद साधण्याचं, इतरांशी साद घालण्याचं, बोलण्याचं, लाड व्यक्त करण्याचं, राग व्यक्त करण्याचं माध्यम आहे. शुद्ध भाषेतच बोलायला हवं, असं म्हणणारी बरीच माणसं भेटतात. मात्र शुद्ध भाषा, अशुद्ध भाषा अशी कुठलीही संकल्पना नाही. आपल्या घरातून वडिलोपार्जित वारसा असलेली, आईकडून ऐकलेली, शिकलेली भाषा म्हणजेच प्रमाण भाषा आहे. आपण अशा देशाचे वासी आहोत ज्या देशात दर एका कोसावर पाणी आणि वाणी बदलताना दिसून येते. आपले मराठी लोकं तसे कणखर, रुबाबदार पण सोबतच साधे-भोळे आणि मोठ्या मनाचे आहेत. कदाचित त्यामुळेच आपल्या या मराठी राष्ट्राला 'महा' हा उपसर्ग दिला गेलेला असेल. आपल्याकडे पुस्तकीय मराठी भाषा बोलणारे लोक असले, तरी प्रत्येकाला आपल्या मायबोलीवर तितकेच प्रेम आहे, जितके मराठी असण्याचं. यामध्ये विठुरायापासून शिवरायांपर्यंत आपल्या थोर लेखकांनी खूप महिमामंडन केलं आहे. ज्ञानोबारायांची 'ज्ञानेश्वरी' ही मराठीचा पाया आहे. मराठी भाषा ही जगाच्या पाठीवर एकमेव सर्वांत समृद्ध असलेली भाषा आहे, असं स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटलं आहे. भाषा ही त्या त्या प्रदेशाची जननी असते. माझ्या विचारात आईशिवाय जीवन नाही. भाषा ही आपल्या आईप्रमाणेच. आपल्या भाषेवर प्रेम करणारी व्यक्ती ही सहजपणे जगातल्या कुठल्याही भाषेवर प्रेम करू शकते, असं पुलं म्हणतात. व्यवहार, संवाद हा आपल्या भाषेतूनच झाला पाहिजे. आपण आपल्या भाषेला योग्य तो न्याय देऊन तिला टिकवू शकतो. यामुळे आपण आपल्या प्रादेशिक अस्मितेला मोठेपणा मिळवून देतो. भाषा टिकली की संस्कृती टिकते, भाषा टिकली की व्यक्तीमधलं व्यक्तित्व टिकते, भाषा टिकली की राज्य टिकतं आणि राज्य टिकलं तर देश टिकतो. महाराष्ट्र केवळ भाषेवरूनच ओळखला जातो, असं मुळीच नाही. महाराष्ट्र ही एक जिवंत भूमी आहे; जी देशाला आर्थिक आणि आध्यात्मिक ऊब देत देशाचं नेतृत्व करत राहील आणि उंचच उंच झेप घेत राहील.

**समिरण वानखेडे**/८३०८००६९३९

### दुसऱ्या धवल क्रांतीची गरज

भारत हा जगातील अग्रणी दूध उत्पादक देश आहे. व्यवसायाचा अधिक विस्तार व्हावा व शेतकरी आर्थिक स्वावलंबी बनावा हा उद्देश ठेवून देशात पाच दशकांपूर्वी इंडियन मिल्क मॅन डॉ. वर्गीस कुरियन यांच्या माध्यमातून धवल क्रांती झाली होती. पुनश्च हीच गरज लक्षात घेता देशाचे गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शाह यांनी धवल क्रांती २.० ची घोषणा नुकतीच केली. पहिल्या धवल क्रांतीची सुरुवात १९७० ला झाली होती. त्याला 'ऑपरेशन फ्लड' म्हणतात. तीन टप्प्यांतील धवल क्रांती १९९६ पर्यंत चालली. याची सुरुवात भारतीय राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने सुरू केली. डॉ. कुरियन यांनी दूध उत्पादन क्षेत्रात सहकार चळवळीचा प्रयोग केला आणि याच्या सकारात्मक परिणामाने दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. अवघ्या चार दशकांत भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादक करणारा देश बनला. त्यांच्या नेतृत्वातच म्हशीच्या दुधाची भुकटी तयार करण्याची किमया साधली. यामुळे देशात दूध प्रक्रिया क्षेत्रात क्रांती झाली. दरम्यान, २०२१ ला नव्यानेच केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापन झाले. सहकार मंत्रालयानुसार देशातील एकूण जिल्ह्यांपैकी ७० टक्के जिल्ह्यांमध्ये दूध सहकारी संस्था आहेत. त्यांची संख्या सुमारे १.७० लाख आहे. या संस्था दोन लाख गावांपर्यंत पोहोचल्या असून, २२ टक्के एवढे घरगुती उत्पादनाचे प्रमाण आहे. या संस्था देशातील एकूण दूध उत्पादनाच्या १० टक्के दूध खरेदी करतात. बाजारात विकता येईल यासाठी त्यांच्याकडे अधिकचे उत्पादन सुमारे १६ टक्के आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाने येत्या पाच वर्षांमध्ये ५६ हजार नवीन बहुउद्देशीय दूध सहकारी सोसायटी स्थापन करण्यासाठी कृती आराखडा आखलेला आहे. ग्रामीण भागात अस्तित्वात असलेल्या ४६ हजार दूध सोसायट्यांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा देऊन सक्षम करण्याची धोरण 'धवल क्रांती २.०' मध्ये असल्याचे सांगितले आहे. 'धवलक्रांती २.०'ची कल्पना सहकारी सोसायट्यांना केंद्रस्थानी ठेवणारी आहे. केंद्र सरकारच्या एका आकडेवारीनुसार २०२३-२४ मध्ये दूध सहकारी सोसायटीच्या माध्यमातून ६५० लाख किलो प्रतिदिन इतक्या दुधाची खरेदी झाली. यापुढे सरकारने २०२८-२९ पर्यंत प्रतिदिन १००७ लाख किलो इतक्या खरेदीचे लक्ष्य ठेवले आहे. आता या माध्यमातून येत्या पाच वर्षांत दूध खरेदी ५० टक्क्यांनी वाढेल. ज्या दूध उत्पादकांना सध्या बाजारात विक्रीची सोय उपलब्ध नाहीये अशांना तशी सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे तसेच संघटित क्षेत्रातील दूध सहकारी सोसायट्यांचा हिस्सा वाढविण्यात येणार आहे. दूध उत्पादन हा शेतकऱ्यांचा प्रमुख जोड व्यवसाय आहे, याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होईल. देशातील नागरिकांची दुधाची व दूध उत्पादन गरजेची पूर्तता होण्यास हातभार लागेल म्हणून दुसऱ्या धवल क्रांतीची आज आद्य गरज वाटते.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

### शत्रू-मित्र ओळखायला शिका!

सनातन भारतीय जनमानस कमालीचं सहनशील आणि क्षमाशील आहे. त्याला स्वबोध, मित्रबोध आणि शत्रुबोध लवकर होत नाही. ते स्वत:पेक्षा इतरांवर आणि घरच्यांपेक्षा बाहेरच्यांवर अधिक विश्वास टाकते. एवढ्या तेवढ्या कारणावरून ऊठसूट स्वकीयांच्या अंगावर धावून जाणारे सनातन भारतीय जनमानस परकीयांसमोर मात्र नांगी टाकते. स्वकीयांशी निर्माण केलेलं शत्रुत्व दीर्घकाळ सोडत नाही; मात्र परकीयांशी फार काळ शत्रुत्व ठेवत नाही. खरं-खोटं शरण येणाऱ्या परकीयांना तत्काळ क्षमादान देते; मात्र स्वकीयांना क्षमादान देताना कमालीचं आढेवेढे घेते. पृथ्वीराज चौहान यांनी मुहम्मद घोरीला पुन:पुन्हा अपात्री क्षमादान दिलं, जयचंद राठोडला स्वकीय पृथ्वीराज चौहानपेक्षा परकीय मुहम्मद घोरी जवळचा वाटला. त्याऐवजी पृथ्वीराज चौहान आणि जयचंद राठोड यांनी एकमेकांना समजून घेऊन सत्पात्री क्षमादान दिलं-घेतलं असतं तर विदेशी-विधर्मी मुहम्मद घोरीच्या तंगड्या गळ्यात अडकवून घ्यायची गरजच भासली नसती आणि पुढचा सगळा अनर्थ टळला असता वस्तुत: 'अपात्री क्षमादान' हे मुळी सनातनत्व नव्हे! श्रीकृष्ण, श्रीराम यांचे प्रत्यक्ष वर्तन हे खरे सनातनत्व! अन्यथा कंसवध, बालीवध झाले असते का? जयद्रथ शिरच्छेद झाला असता का? अधर्मीयांकडून लढत असलेल्या महारथी कर्णाला श्रीकृष्णाने अपात्री क्षमादान देवविलं असतं तर गांडीवधारी अर्जुन धर्मयुद्ध जिंकू शकला असता का? कधी श्रीराम व्हायचं आणि कधी श्रीकृष्ण व्हायचं याचं भान कायम ठेवलं पाहिजे. अपात्री क्षमादान आणि सद्गुण विकृती हे मध्यंतरी केव्हातरी अहिंसा तत्त्व बोकाळल्यानंतर आले असावेत. अपात्री क्षमादान ही सद्गुण विकृती नेहमीच घातक ठरत आली आहे, तरीही सनातन भारतीय जनमानस त्यातून अजूनही पूर्णपणे बाहेर येऊ शकलेलं नाही. आता तरी सावध व्हा अमृतपुत्रांनो! आधी स्वत:ला ओळखा, पारखा आणि सिद्ध करा. मग शत्रू आणि मित्र ओळखायला, पारखायला शिका.

**सोमनाथ देशमाने**/९४२१६३६२९१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## आनंदाचे डोही

**अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८**

रेवा आज निवांतपणे जुने फोटो बघत बसली होती. अगदी तिच्या आईच्या बालपणातील ब्लॅक अँड व्हाईट फोटो बघताना तिला जाणवले, आपले आजोबा किती हौशी होते ते! पणजोबांच्या झुबकेदार मिश्या आणि पणजीचा चोपूनचापून बांधलेला अंबाडा बघत असताना, तिला त्या काळात गेल्याचाच भास झाला. तेवढ्यात बेल वाजली. मानसी तिची लेक भली मोठ्ठी ट्रॉफी घेऊन दारातच रेवाला बिलगली. 'आई, छायाचित्र स्पर्धेत माझा पहिला नंबर आला बघ! तुझ्या प्रोत्साहनामुळे हौशी छायाचित्रकार म्हणून नाव होतंय माझं. खूप खूप आनंद झालाय मला! किती मज्जा येते सांगू तुला! छायाचित्रण घालत, आव्हानच देतात, 'करा आम्हाला तुमच्या कॅमेऱ्यात कैद!' मग सुरू होतो पाठशिवणीचा खेळ! विजयाचा जल्लोष पुन्हा नव्याने ते क्षण अनुभवण्यास प्रेरित करतात आणि ही आनंदी साखळी जीवनाचा अविभाज्य घटक होऊन जाते.

आपण काढलेली छायाचित्रं बघून, चेहऱ्यावरील स्मितरेषा मोठी होते तेव्हा आपल्याही आनंदाचा गुणांक मोठ्ठा होत जातो. त्या समाधानाने चैतन्यनगरी गवसते. अशा लहानमोठ्या फुलपाखरी क्षणांनी आनंद वैभव शतगुणीत होत जातं.

आप्तेष्टांच्या, त्यांना आवडतील अशा नकळत काढलेल्या फोटोंनी आनंदाची झळाळी, दोघांच्याही जीवनात साखरपेरणी करत राहते. आपल्या छायाचित्रणाने आपल्यासोबतच इतरांनाही आनंद लाभतो, हे खरंच प्रसन्नतेचे चांदणे पसरविणारे किती आनंददायी माध्यम आहे, होय ना! स्वतः आनंदाच्या डोंगरावर चढत असताना उत्साही किरणे उधळीत, जीवन मोती घडवीत जाणे होय. वाह! अहाहा! सुरेख! अप्रतिम! सुंदर! या शब्द माधुर्याचा मंजुळ निनाद आयुष्याला प्रसन्नतेचा साज चढवित राहतो. 'खुशी का चांद खील उठता हैं!' पर्यटनस्थळी कोणाला त्याच्याच मोबाईलने जरी फोटो



# पुष्पगुच्छ छायाचित्रांचा!

करताना मन हळूवार संवेदनशील होत जातं. काही छायाचित्रकार कधी महिनोन्‌महिने एखाद्या प्राणी पक्ष्यांसाठी ताटकळत राहतात.

संयमाची कसोटी पाहणारे ते क्षण, हवे ते छायाचित्र चित्रांकित झाल्यावर आनंदाने झोळी भरते ते वर्णनातीत! छायाचित्रणात कल्पकतेला तर खूप वाव असतोच पण, रसिकांची दादही सुखावह असते. आपल्यापुढे आनंदाचे दालन उघडणारा छायाचित्रणाचा सर्जनशील विविधांगी समाजोपयोगी छंद आजोबांनी वाढदिवसाला दिलेल्या कॅमेऱ्याने जडला. नवनविन कॅमेरे आलेत तरी अजूनही त्याला हातात घेऊन कुरवाळले की, आजोबांच्या आशीर्वादाने मन उल्हासित होते. फोटोग्राफी आता माझा फक्त छंद नाही तर, सभोवतालच्या जगाशी जोडणारा सकारात्मक सेतू आहे, असे वाटायला लागले आहे मला! अंधारल्या ढगाळ वातावरणात अचानक होणाऱ्या सूर्यदर्शनास कॅमेऱ्यात टिपण्याचा क्षण म्हणजे युरेका! जीवनाला सर्वार्थिने अर्थ देण्याचे सामर्थ्य, छायाचित्रण या कलेत आहे. छायाचित्रण ही जितकी कला आहे ना, तितकेच शास्त्र त्यात ठासून भरले असते. हळूहळू ते सारे अवगत झाले की, उत्तम फोटोग्राफर म्हणून तुम्हाला नावजल्या जाते. ते आनंददायी क्षण मी आता अनुभवतेय.बाळाच्या वाढीचे टप्पे हृदय पटलावर तर अंकित होतात पण, ते क्षण कॅमेऱ्यात बंदिस्त करून आयुष्यभर अनेकदा नव्याने अनुभवत सुखद आठवणीत रमता येतं ते यामुळेच! रानावनात छायाचित्रण करत भटकताना काही प्राणी-पक्षी जणू साद काढून दिले तरी आनंदाने ओंजळ भरून जाते. जर आपला कॅमेरा अधिक चांगला म्हणून त्याने फोटो काढून दिले की, आनंदी आनंदच! छायाचित्रण करताना कधी अकस्मिकपणे निसर्गातील अद्भुत खजिना हाती येतो. निसर्गाशी अनन्यता साधत, त्याची रूपे डोळ्यात साठवत छायाचित्रीत करण्याचा आनंदही वर्णनातीतच!

खऱ्या जीवनाचा आनंद घेत, निसर्गाच?या कुशीत समरस होण्याचे प्रसंग अनेकदा लाभतात. हे पोषक जीवनसत्व मनाला सतेज व टवटवीत ठेवते. आता तर प्रत्येकच गोष्टीचा आनंद छायाचित्राद्वारे प्रदर्शित केला जातो किंबहूना छायचित्र पोस्ट केल्याशिवाय आनंदाच्या व्याख्येची जणू पूर्तताच होत नाही, असे वाटू लागल्याने छायाचित्रण करणे हा मोबाईलच्या जमान्यातील जन्मसिद्ध हक्कच झाला आहे. दिवसेंदिवस तंत्रज्ञानाच्या प्रगतीने नवनवे आयाम त्याला जोडले जात असल्याने हौशी लोकांसाठी आज हे सहजसुलभ साधन झाले आहे. प्रत्येक प्रसंग कॅमेराबद्ध करण्याची धडपड सुरू असते. एखादी आगळीवेगळी खगोलीय घटना, वन्यजीवांचे विशेष छायाचित्रण हातून झाले की, स्वतःचे मनच कौतुकाची थाप देऊन जाते. बस्स! स्वतःसाठी काढलेले गौरवोद्‌गार आत्मविश्वासाच्या पूर्णचंद्राने उजळलेला आनंद जीवनवाट रम्य करून जातो. छायाचित्रणाने आठवणींचा सुंदर पुष्पगुच्छ तयार करत, आनंदाची लयलूट करायलाच हवी ना! मग, आपल्या आनंदाच्या वृक्षाला मस्तपैकी बहर येतोच.

# उसवलेली वीण

(सत्यघटनेवर आधारित)

मॅटर्निटी लिव्ह संपत आली होती. मनात फक्त विचार आणि काळजी भरून होती, छोट्या बाळाला कुणाजवळ ठेवायचे, दोन्ही मुलं कुणाच्या भरोशावर ठेवून मी बिनधास्त जॉब करू शकेल? सारखं टेन्शन येतं होतं. जवळपासच्या कित्येक ओळखीतल्या लोकांची मदतही मागितली पण कुणाकडूनही काही सकारात्मक रिस्पॉन्स मिळत नव्हता. अप डाऊनच्या नोकरीमध्ये जास्त वेळ तर प्रवासात जाणार होता.

आणि, एक दिवस आईचा फोन आला.'अगं, एक मुलगी आहे. जवळपासच्या खेड्यातली ती, आपल्याच शहरात एका डॉक्टरकडे कामाला होती. पण, तिचे नुकतेच इकडचे काम सुटले आहे. तर ती तिच्या गावी परत जाणार आहे. मी तिला तुझ्या घरी येण्यासाठी विचारले. पण, ती द्विधा मनःस्थितीत आहे. एकदा तू बोलते का तिच्यासोबत?' आईने फोनवर जे सांगितले ते ऐकून आनंदच झाला.

मी लगेच तिला बोलते म्हटले आणि त्या मुलीसोबत बोलायला फोन द्यायला सांगितलं. बोलताना आवाजावरून ती शांत आणि नम्र वाटली. म्हणाली,'ताई, मला कामाची खूप गरज आहे गं! पण, तुझी आई म्हणाली की, जावई पोलिस खात्यात आहे. म्हणून, थोडी भीती वाटत आहे. शिवाय, नागपूरसारख्या ठिकाणी मी येईल पण, तिकडे माझे कुणीच नातलग नाही.

मी म्हटलं,'अगं पोलिस आहेत तर भीती कसली? उलट तर तू सुरक्षित घरी येणार आहेस. तर ती म्हणाली,'ताई, मोठमोठ्या लोकांचे खूप वाईट अनुभव येतात गं! आता मी ज्या डॉक्टरकडे त्यांचा मुलगा सांभाळायचे काम करत होते तिकडे त्या डॉक्टरांची नजर खराब होती माझ्यावर! मी कशीबशी तिकडून स्वतःच निघून आली. आज गावाला जाणार होती पण, तुझी आई भेटली आणि फोन लावून दिला. मी ते सारं ऐकून सुन्नच झाले. पण, तरीही तिला म्हटले,'अगं, सध्या मी सुटीवर आहे. तू आधी एक आठवडा माझ्याकडे माझी बहिण म्हणून राहायला ये. या आठ दिवसात जर तुला असे वाटले की, माझ्या घरी तू राहू शकणार नाही. तर, मी तुला रहाण्याचा आग्रह करणार नाही. आणि, माझे मिस्टर पोलीस जरी असले तरी त्यांची मला १००% खात्री आहे. ते कसे आहेत, मला माहित आहे. सगळीच माणसं वाईट नसतात अगं! तू एकदा हो म्हण आणि ये! मी तुला जाण्यायेण्याचे तिकीट आणि शिवाय आठ दिवस राहिल्याचेही पैसे देईन.'

मग, हो-नाही करता ती तयार झाली. त्या रात्री मी खूप आनंदात होते. शिवाय, घरात माझ्यासोबत ती राहणार म्हणून खुश झाले. दोन्ही मुलांचा सांभाळण्याचा प्रॉब्लेम सुटला, असे वाटून निश्चिंत झोपले. दुसऱ्या दिवशी दुपारी आई तिला माझ्याकडे घेऊन आली. सडपातळ बांध्याची, सावळी, मोठ्या पण तपकिरी डोळ्यांची, केस लांब काळेशार, शेती काम आणि इतर कामामुळे कसलेली शरीरयष्टी, नीटनेटकी साडी नेसलेली ती एकदम मनातच भरली. माझ्यासारखीच बडबडी वाटली पण, बोलताना मनात खूप यातना असाव्यात, असे जाणवत होते. ती थांबली आणि आई त्याच दिवशी परत गेली. माझे बाळ फक्त ३ महिन्यांचे होते आणि मोठा मुलगा ७ वर्षांचा! दोघांनाही तिने लाडाने जवळ घेतले आणि म्हणाली,'ताई, तुमच्या मोठ्या मुलापेक्षा फक्त २ वर्षांनी मोठा माझा मुलगा आहे गं! त्याला गावी ठेवून मी काम मिळवण्यासाठी वर्धेला होती. संध्याकाळी जेव्हा माझे मिस्टर घरी आले तेव्हा थोडी बुजून, खाली मान घालूनच उभी होती. मग हळूहळू बोलायला लागली आणि घरात रमायला सुद्धा! आमच्या घरात आठ दिवस राहायला म्हणून आलेली ती, कधी घरातली एक सदस्य होऊन गेली कळलेच नाही. ती माझी बहिणीसारखी काळजी घेऊ लागली. मुलांची आत्या आणि मावशी दोन्ही नाते निभावू लागली. माझा जॉब, माझ्या नवऱ्याचा टाईम अनलिमिटेड जॉब, माझ्या मुलांचे



**मंजुषा ठाकरे चौगावकर/ ९८२३६२२८२६**

संगोपन, घरात येणारे पै पाहुणे त्यांचे आदरातिथ्य सारं मनापासून करायची. आमच्या नात्यात जीवाभावाच्या मैत्रीची एक नवी वीण तयार झाली.

आणि, मग तिची घालमेल, वेदनादायी कहाणी पण कळू लागली. आयुष्यात आपल्याला कितीतरी लोक भेटतात. प्रत्येकाची एक वेगळीच कथा असते, मनावर खोलवर परिणामही होतो त्याचा! तिच्या मोठ्या बहिणीत आणि तिच्या वयात साधारण पंधरा वर्षांचे अंतर होते, आईवडील शेती करायचे. मोठ्या बहिणीचे चांगल्या सधन घरी लग्न झाले होते. तिचा सुखी संसार होता आणि ती मुलबाळांमध्ये खुश होती. आईवडीलसुद्धा सगळं लक्ष मोठ्या मुलीकडेच द्यायचे.

ही २० वर्षांची होणार तेव्हा नात्यातल्याच एका मुलासोबत तिचे लग्न लावून दिले. तिचेही स्वप्न फक्त एवढेच होते की, सुखी संसार करावा, नवरा-मुलं, सासरची मंडळी यांच्यात रमून जावं. पण, आयुष्यात येणारी वळणं आपल्याला थोडीच आधी ठाऊक असतात. तिच्या सासरी कुणालाही तिची कदर नव्हती, सासरचे सगळेच तिला त्रास द्यायचे. मानसिक आणि शारीरिकही! तिचा नवरा कधीही तिची बाजू घेत नव्हता. तरीही ती मन लावून सारी कामं पार पाडत होती. अशातच तिला बाळाची चाहूल लागली. तिला वाटले आता या आनंदाच्या बातमीने सगळे आपल्यासोबत चांगले वागतील पण, तसं काही झालं नाही. तिला सहावा महिना सुरू असताना माहेरी आणले आणि त्यानंतर कधीही तिला सासरी नेलेच नाही. बाळंतपण झाले, मुलगा झाला. ना कुणी बघायला आले ना तिला न्यायला आले. आईवडील तिलाच दोष द्यायचे की, तूच काही नीट नांदत नसशील तिकडे म्हणून!

असेच दिवस पुढे जात राहिले मुलगा मोठा होऊ लागला, ती शेतात कामाला जाऊ लागली. एक दिवस तिच्या नातलगांनी कुठले शेतीचे कागदपत्र आहेत, तुझ्या मुलाला मिळणार आहे असे सांगून काही कागदांवर तिचा अंगठा घेतला. तिनेसुद्धा मुलासाठी म्हणून लगेच दिला. मग वर्षभराने तिला कळले की, तिच्या नवऱ्याने दुसरं लग्न केलं आहे. पुरती कोलमडली ती!

आपल्याच नातलगांमध्ये सोयरिक होऊनही फसवल्या गेलेली ती, खूप दुःखी झाली. माहेरी असली तरी, शेतात कामाला जायची आणि आई बाबांची सेवा करायची. मुलाला शाळेत टाकले. तिचा मुलगाच तिचा आधार आणि जगण्याची आशा होती. गावात एक घटस्फोटित तरुण स्त्री, घाणेरड्या नजरांचा रोज प्रतिकार करून थकलेल्या तिने शहरात जायचं आणि तिकडेच रहायचा निर्णय घेतला. मुलाला आईवडीलांकडे ठेवून तिने शहर गाठले. आधी एका हॉस्पिटल मेसमध्ये पोळ्यांचे काम करू लागली. नंतर एका डॉक्टरने त्यांच्या मुलाला सांभाळशील का? म्हणून विचारलं. तिला वाटलं एखाद्याच्या घरी राहून मुलांना सांभाळणं सोपं आहे. शिवाय, राहण्याचा पण प्रश्न सुटेल आणि मग आपल्याही मुलाला अधूनमधून इकडे आणता येईल. म्हणून लगेच तयारसुद्धा झाली आणि त्या दिवसापासूनच डॉक्टरकडे आली. त्या मुलात स्वतःचं मातृत्व ही जपू लागली. त्या मुलालाही हळूहळू तिचा लळा लागला. मॅडमसुद्धा तिच्यासोबत नीट वागायच्या. पण, डॉक्टर मात्र तिच्यावर वाईट नजर ठेऊन असायचे आणि संधी मिळताच तिला त्रास द्यायचे. ती तिथूनही काम सोडून पुन्हा गावी जाणार ठरवून निघाली आणि योगायोगाने माझ्या घरी आली. माझ्या नवऱ्याला हक्काची धाकटी बहीण मिळाली आणि माझ्या मुलांना तिच्या रुपात आत्या आणि मावशी! ती मला ताई आणि ह्यांना दादा म्हणायची.

तिचा मुलगासुद्धा दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुटीत आमच्याकडे यायचा. माझ्या मुलांसोबतसुद्धा त्याचा चांगला बाँड तयार झाला. दिवस जाऊ लागले आणि मुलंही मोठी होऊ लागली. पण, गावातील लोकांनी तिच्या मुलाला काहीबाही सांगून बिथरवले. पौगंडावस्थेतील ते लेकरू उगाच राग राग करू लागलं. एका नातलगाच्या लग्नात आजीसोबत गेला असताना, कुणीतरी त्याची ओळख त्याच्या बाबाला सांगितली. बाबाला भेटल्यावर त्याला त्यांचीच ओढ जाणवू लागली. मग, तो अध्येमध्ये त्यांच्याकडे जाऊ लागला. तिला वाटलं, आपल्या नशिबात नाही त्यांचा सहवास, किमान मुलाला भेटतोय म्हणून मग तिनेसुद्धा कधी अडवलं नाही. हळूहळू तो त्याच्या आईपासून दुरावल्याचे तिच्या लक्षात आलं. आम्ही तिला समजावलं की, मुलाला इकडेच घेऊन येऊ. इकडेच शाळेत टाकू. ती यासाठी तयार होती पण, मुलगा यायलाच तयार नव्हता. मग, नाईलाजाने मला तिला पाठवावे लागले.मीसुद्धा एक आई होते त्यामुळे त्या आईचे मन समजू शकत होते. तिची आणि मुलाची ताटातूट होताना मी बघू शकत नव्हते. माझी मुलं तिला कधीही विसरू शकणार नव्हती, तिने खूप जीव लावला आम्हा सगळ्यांनाच! माझे सगळे नातलगसुद्धा तिच्या प्रामाणिकपणाचं कौतुक करायचे. ती आमच्या घरून गेली तेव्हा छोटा मुलगा लहानच होता. तो मोठा होत असताना आम्ही त्याला तिच्याबद्दल सांगत राहायचो. त्यामुळे, ती आपल्याच घरातली कुणी आहे असेच वाटत होते त्याला! ती माझ्याकडे मध्ये येत राहायची. तिच्या मुलासाठी जे करता येईल ते करत होते. नंतर ती पुन्हा शेतात कामाला जाऊ लागली. तिच्या

आईची तिने खूप सेवा केली. मात्र, तिच्या वडिलांनी त्यांचे राहते घर आणि शेती विकून पैसे मोठ्या मुलीला दिले आणि हिच्या डोक्यावर असलेले छप्परसुद्धा गेले.

मुलगा जसजसा मोठा झाला त्याला त्याच्या वडिलांचे सत्य समजले आणि त्याची सावत्र भावंडंसुद्धा त्याला झिडकारू लागले. हळूहळू तो त्यांच्यापासून दुरावला आणि पुन्हा आईकडे आला. मी सुद्धा तिला भेटायला गावी जायचे मुलांना घेऊन! आता तिच्या तब्येतीच्या कुरबुरी असतात पण, उमेद सोडली नाही. आता मुलगा कमवायला लागलाय. पण, तिच्या आयुष्यात कटू अनुभवांचं दुःख आजही भरून आहे.



# अक्षय्य ठेवा सुखाचा...

**ऋतुराज शरदातील आश्विन, कार्तिकातील सृष्टीचे विलोभनीय रुपडं साऱ्यांना वेड लावून उत्साहित करतं.असुरांवर विजय मिळविणाऱ्या महागौरीला बुद्धीमत्तेचे दान मागून, दसरा-दिवाळीच्या सणात सहकार्याची भूमिका दर्शीवित, आनंदाचा कुंभ घेऊन अक्षय सुखाचा ठेवा पासबुकमध्ये जमा करून किती आनंदी होत असतील ना सगळेच! गगनात मावेनासा हा आनंद जीवनाच्या वाटेवरचा आनंदी वाटाड्याच ठरत असतो हे अक्षय सुख नाही का? मानला गेला तर, वर्षभर मिळणारा हा आनंद मनुष्याला आनंदाची लॉटरी बहाल करतो आणि हाच आनंदाचा अक्षय्य साठा आहे. आपल्याजवळ असलेल्या लहान गोष्टीतही मोठा आनंद आहे. हे मानण्याऱ्याला, अशा आनंदात राहण्याऱ्याला आनंदयात्री म्हणणे योग्य होईल.**

*'माझे जीवनगाणे गाणे, गाणे*
*व्यथा असो, आनंद असू दे,*
*प्रकाश किंवा तिमिर असू दे,*
*वाट दिसो अथवा ना दिसू दे,*
*गात पुढे मज जाणे...'*

संकटांशी झुंजत, पुढे जात आनंदाच्या हिंदोल्यावर झोके घेत जगणे हाच तर अक्षय सुखाचा ठेवा! मानलं तर सुख नाही तर, सुखालाही दुःख मानून रडकथा सांगत बसणारेच जगात अधिक असतील. आता हेच बघा ना! वाचनानंद, लेखनानंद, पर्यटनानंद, संगीतानंद, समाजसेवेचा आनंद हे सगळेच अक्षय सुखाचा ठेवा! किती निरागस, निर्भेळ आनंद मिळत असतो ना या सगळ्यांतून! मनाच्या कोपऱ्यात ना, कुठेतरी उत्साहाच्या लहरी उसळत असतात हे सगळं

करताना! मग, हा जीवनातील अक्षर आनंद नाही काय?

समाधानाची संवेदना जिथे जागृती देत, ऊर्जा उत्पन्न करते तिथे निरपेक्ष भावनेचा ओलावा टिकून राहतो आणि मनातील मोर थुई थुई नाचत जीवनानंद देत जातो. हा अक्षय सुखाचा ठेवाच ना! वसंत ऋतुत चैत्रातील कडक ऊन मनाला विचलित करीत असतं. पण, हृदयस्थ रामरायाची, राम नवमी हिंदुस्थानात किती दिमाखात साजरी होते. व्यथा आहे पण, आनंदापुढे त्याची तीव्रता कमीच! समाधान हेच अक्षय्य सुख! भर उन्हातही पर्यटनाची मजा लुटताना कुठं आठवतं ते वैशाखातील राक्षसी ऊन?आनंद मिरवित जातोच ना आपण पुढे! संकटांशी झुंजत मिळणारा आनंद जीवनाच्या पासबुकातील अक्षय सुखाचा ठेवाच होय.

वर्षाऋतुतील आषाढ, श्रावण तर आनंदाची पर्वणीच! किचकिचलेल्या, दमट हवामानात, रोगराईला आमंत्रण देणारे दिवस तरीही उत्साह कायमच! अविरत

कोसळणाऱ्या धारांना आपलंसं करत,'ये रे घना, ये रे घना... न्हाऊ घाल माझ्या मना' असे आनंदाचे तराणे गात भक्तिच्या गोतावळ्यात गुंग होऊन, पासबुकातील अक्षय सुखाचा ठेवा जमा करून, आनंदाचे बचत खाते वाढवत असतोच.भर पावसात गोविंदा पथके जिवाची पर्वा न करता मनोमन आनंद घेतात, पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनासाठी आसुसलेले वारकरी हळव्या मनाने पांडुरंगाला भेटून आनंदीत होतात. तर, आपल्या लाडक्या बाप्पाच्या दिमतीला हजर राहून 'तुज मागतो मी आता' आळवून सारेच कसे जीवनाची बॅटरी चार्ज करीतच असतात ना! हा अक्षय सुखाचा ठेवाच होय.

ऋतुराज शरदातील आश्विन, कार्तिकातील सृष्टीचे विलोभनीय रुपडं साऱ्यांना वेड लावून उत्साहित करतं.असुरांवर विजय मिळविणाऱ्या महागौरीला बुद्धीमत्तेचे दान मागून, दसरा-दिवाळीच्या सणात सहकार्याची भूमिका दर्शीवित, आनंदाचा कुंभ घेऊन अक्षय सुखाचा ठेवा पासबुकमध्ये जमा करून किती आनंदी होत असतील ना सगळेच! गगनात मावेनासा हा आनंद जीवनाच्या वाटेवरचा आनंदी वाटाड्याच ठरत असतो हे अक्षय सुख नाही का?

हेमंत ऋतु उत्तम आरोग्य प्रदान करणारा! प्रेमीयुगुलांसाठी अतीव आनंदाचा तर मार्गशीर्ष दत्तजयंती, गीताजयंतीचे म्हणजे भक्तिचे पर्व! सूर्याची उब घेत दीप्तिमान होऊन आरोग्याच्या बँकेत आनंदी स्वास्थ्य जमा करणारा हा आनंदी काळ! पौष महिना तर तीळगुळ घ्या, गोड गोड बोला सांगून प्रेमाचा संदेश देणारा, अतिशय रम्य

**अरुणा देशपांडे/९४२०९ १७७७५**

काळ! प्रेमाचा साठा वाढवून अक्षर सुखाची ठेव जमा करणारा, असा उत्साही ऋतू ! हा तर अक्षय सुख भरभरून देणारा! शिशिर ऋतुत येणारे माघ, फाल्गुनात पानगळ आणि लगेच कोवळ्या पानांचा साज चढवून वसुंधरा नटलेली बघून, केवढं उत्साहित व्हायला होतं. हा प्रेमळ आणि लाडका, बोचरा पण गुलाबी थंडीचा आशावादी ऋतू! होळीच्या निमित्ताने सगळ्यांना 'बुरा ना मानो होली हैं' असा संदेश देत एकसंघ राहून सामाजिक बांधिलकीची जपणूक करण्याची मागणी तर करत नसेल ना! यातून मिळणारे अक्षय सुख अजून कुठे मिळेल काय हो? हेच ते अक्षय सुख!

मानला गेला तर, वर्षभर मिळणारा हा आनंद मनुष्याला आनंदाची लॉटरी बहाल करतो आणि हाच आनंदाचा अक्षय्य साठा आहे. आपल्याजवळ असलेल्या लहान गोष्टीतही मोठा आनंद आहे. हे मानण्याऱ्याला, अशा आनंदात राहण्याऱ्याला आनंदयात्री म्हणणे योग्य होईल कारण, स्वतः तृप्त होऊन इतरांना निखळ आनंद देणारा हा निःस्पृह, निरपेक्ष वृत्तीने वागणारा असेल तर खरा आत्मानंद त्याला मिळतो आणि इथेच अक्षय सुखाचा ठेवा गवसतो.

'आनंदाचे डोही, आनंद तरंग' तुकारामांच्या या अभंगातून आनंदाच्या अत्तराचा फाया माणसाच्या चित्तवृत्तीला लावून, आनंदी राहून अक्षय सुख प्राप्त करून घेण्यास ते सांगतात. आनंद ही एक भावावस्था आहे. त्यासारखे दुसरे काही असूच शकत नाही. या आनंदाला दुसरे तरंग नाहीत. त्याच्यासारखा फक्त तोच! ही भावना म्हणजे सुखाचा परमोच्च बिंदू आणि हा ज्याला मिळाला तोच अक्षर आणि अक्षय सुखाचा वाटेकरी !

आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहिकडे...बालकवींच्या या काव्यातला हा आनंद घेऊन, मनुष्य जगला तर सारेच सुखाचे सोबती होऊन एका सुंदर जगाची निर्मिती होईल. स्वर्गसुखाची कल्पना न करता ते प्रत्यक्षात अनुभवायला मिळेल त्यासाठी स्वार्थ सोडला की, मत्सर संपला, द्वेष संपला आणि आनंदाचे घोडे चौफेर उधळायला लागेल साराच आनंदी आनंद आणि हाच अक्षय सुखाचा ठेवा!

## गझल आरसपानी

**गझलनंदा / ८४२२०८९६६६**

# आता कळवळते बाई...

मंडळी, मुशायरा साधारण कसा असावा? यावर आपण बोलू. एक गोष्ट आज प्रकर्षाने जाणवते की, पुरुषांच्या बरोबरीने स्त्री गझलकारसुद्धा उत्तमोत्तम गझल लिहीत आहेत. साधारण असा आरोप होतो की, स्त्रियांचे विषय हे नेहमीच घर, चूल, मूल हे असतात. का असू नयेत? स्त्रीचं क्षेत्र हे आधी एक आई, बहीण, मुलगी, बायको अशा स्वरूपात असतं आणि तसं जगत असताना त्यांना जे अनुभव येतात तेच त्या शब्दबद्ध करतात. पण, गझलेचे सर्व निकष सांभाळून जर त्यांची द्विपदी होत असेल तर, ती सुद्धा अतिशय उत्तम ठरते. एक उदाहरण बघा.

**सुवास येता अंगणातली, जाई कळली**
**समईमधली ज्योत पाहता, आई कळली**
**आई म्हणते बरेच झाले, मुलगी झाली**
**तिच्या पित्याला किमान आता, बाई कळली**

जर असा शेर सरसरत येत असेल तर, स्त्रीची लेखणीसुद्धा समृद्ध आहे, असं म्हणायला हरकत नाही.

किंवा

**अश्रू आता कधीही, मी गाळणार नाही**
**गालास स्पर्श माझ्या करतो, कुणी कसाही**

किंवा

**भावास सोबतीला घेऊन, चालले मी**
**पुसले मला जगाने, हा कोण यार आहे**

अशा प्रकारची जर स्त्रीची गझल येत असेल तर, केवळ ती स्त्रीवादी आहे म्हणून दूर लोटता येणार नाही. या पुढचा भाग म्हणजे मुशायऱ्यात गझल सादर करणारा स्त्री वर्ग! पूर्वी कुठल्याही अडचणीत असेल, म्हणजे ठिकाण लांब आहे, कसं जायचं, स्वतःची नोकरी, घर, लहान मूल! या सगळ्या अडचणी बघता स्त्री सरसकट मुशायऱ्याला जाऊ शकत नसे. पण, आज त्या सर्वांवर मात करून, जी परिवहनाची साधनं उपलब्ध आहेत किंवा फोन, मोबाईल आणि तत्सम गोष्टी सहज उपलब्ध आहेत. त्यामुळे, स्त्री मुशायऱ्याला जाऊ शकते. अगदी रात्री बारा वाजेपर्यंत जरी मुशायरा झाला तरी, सोबत असेल तर स्वतःच्या गाडीनेसुद्धा ती सकाळपर्यंत घरी येते आणि लगेच नोकरीवर जॉईन होऊ शकते. तसंच, घरच्यांचं जर सहकार्य असेल तर, तिला हे सर्व करणं शक्य होतं.

मंडळी, मुशायऱ्यात गझलेचं सादरीकरण कसं करावं हा थोडा वेगळा भाग आहे. पूर्वी कवी संमेलन असेल तर कवी जेव्हा तिथे जायचा, त्यावेळेस त्याची ओळख साधा शर्ट-पॅन्ट किंवा कुडता-जिन्स आणि खांद्यावर एखादी पिशवी, तिला पूर्वी शबनम बॅग असे म्हणत, ती असायची. त्यात चोपड्या, डायरी, वही हे साहित्य असे. जर त्यांची पुस्तकं प्रकाशित झाली असतील तर (तो/ती) कवी आपली दोन-चार पुस्तकं घेऊन कवीसंमेलनाला येई. यावर कितीतरी व्यंगचित्र पण आलीत की, कवी म्हणजे जे मी आता वर्णन केले त्या प्रकारचा असायचा. अर्थात, त्यालाही चांगले अपवाद नक्कीच होते.

आता गझल सादर करताना गझलकाराने



किंवा गझलकार स्त्रीने कशाप्रकारे ती सादर करावी, यावर आपण विचार करू या. सर्वप्रथम त्यांची वेशभूषा!

कार्यक्रम कुठला आहे? तो अखिल भारतीय स्तरावरचा आहे की, स्थानिक? हे बघून पुरुषांनी कुडता पायजमा किंवा शर्टपॅन्ट अशी साधी वेशभूषा करायला हरकत नाही. एखाद्या कॉलेजमध्ये जर तुमचा कार्यक्रम असेल तर तुम्ही सोयीसाठी टीशर्टही घालू शकता. स्त्रियांसाठी सर्वात आदर्श म्हणजे साडी हीच वेषशभूषा! क्वचित प्रसंगी सलवार सूट सुद्धा चालेल. व्यवस्थित ओढणी घेतलेली असावी. उत्तम मेकअप पण, अतिशय माफक असावा पण, भडक नको. मंचावर उजेड असेल तर मेकअपची गरज असते आणि जर एखाद्या ठिकाणी दुपारचा कार्यक्रम असेल तर तिथे विशेष मेकअपची गरज नाही. तसंच वृद्धाश्रम, ज्येष्ठ नागरिक मंडळे अशा ठिकाणी कार्यक्रम असेल तर, त्या वृद्धांना तुमच्यात त्यांची सून किंवा मुलगी बघता यावी, एवढीच अपेक्षा असते. एकूणच काय तर, तुम्ही जे सादर करता आहात ते प्रेक्षकांपर्यंत पोहचायला हवं. मुशायरा संपल्यानंतर अमुक एक व्यक्ती कशी दिसत होती, किती भडक होती ही चर्चा रंगण्यापेक्षा त्यांनी म्हटलेली गझल किती छान होती, ही चर्चा व्हायला हवी.

नंतरचा भाग म्हणजे सूत्रसंचालकाकडून तुम्ही कोणत्या क्रमांकावर गझल सादर करणार आहात, ही माहिती आधी घ्या. त्यानुसार तयारीत रहा. माईकजवळ पोहोचलात की, स्वतःला आणि माईक आधी ॲडजेस्ट करा. मग गजलेला सुरुवात करा. वेळ, स्थळ, काळ, प्रसंग बघून आपल्या गझलेची निवड करा. गझल सादर करताना द्विपदीची पहिली

### आता कळवळते बाई

मी शेवटच्या ओळीचे, आभार मानते बाई
तू लिही नव्याने कविता, कविताच सांगते बाई
पायात साखळी रुळली, मज पैंजण वाटत होते
शृंखला नव्याने कळली, तोडून टाकते बाई
आले न बांधता त्याला, भाळाचे बंधन तुटले
मी दोरा वटवृक्षाला, गुंडाळत बसते बाई
लपविला गंध कोठे ते, प्रत्येक फुलाला पुसले
गंधाने बाग बहरली, मी शोधत फिरते बाई
मी रोज तुझ्या दाराशी, शिंपिली आसवे माझी
अन्याय दवावर झाला, हे आता कळते बाई
रिषभाच्या एक स्वराने, हा जौनपुरी गहिवरला
जोगिया रंगला आता, त्याच्यासह झुरते बाई
दुःखाच्या अष्टदिशांनी, रणशिंग फुंकले होते
मी झाशी तेव्हा झाले, आता कळवळते बाई

ओळ दोनदा म्हणावी आणि नंतर दुसरी ओळ म्हणावी. याचा अर्थ असा की, दुसरी ओळ किती प्रभावी आहे हे श्रोत्यांपर्यंत पोहचायला हवं. आपल्या द्विपदीला टाळ्या मिळाल्या तर, आपण त्या ठिकाणी किंचित थांबायला हवं. टाळ्या संपेपर्यंत आणि नंतर दुसऱ्या द्विपदीला सुरुवात करावी जर टाळ्या सुरू राहिल्या तर तुमची द्विपदी, तुमचा शेर श्रोत्यांपर्यंत पोहोचणार नाही. अगदीच वन्स मोअर आला तर तो शेर पुन्हा सादर करावा.

यात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही जी गझल सादर करता ती तरन्नूममध्ये सादर करण्याचा आग्रह ठेवू नका. ते जर गीत झालं तर त्याला तबला-पेटीची साथ हवी असते. त्याच्याशिवाय जर तुम्ही गात असाल तर कुठेतरी आवाजात फेरफार होण्याची शक्यता असते किंवा तुमचं गाणं फक्त लक्षात राहतं. तुमची गझल लक्षात राहत नाही, हे लक्षात ठेवा. व्यवस्थित स्पष्ट सादरीकरण झालं तर, दाद उत्तम मिळतेच कारण, गझल ही शब्दप्रधान असते. गझल गायचीच असेल तर ती व्यवस्थित वाद्यवृंदासह मैफिलीत गावी, मुशायऱ्यात नको. अर्थात हे माझं वैयक्तिक मत आहे. मंचावर आणखी एक पथ्य पाळायला हवं, ते म्हणजे कलावंतांनी आपापसात बोलत बसू नये. शक्य तिथे आपल्या सहकाऱ्यांना उत्तम दाद द्यावी, चुळबूळ करू नये, मध्येच उठून जाऊ नये, आवश्यक तिथे चेहरा आणि हातांचे हावभाव जरूर करावे पण, अनावश्यक नको. जाणत्या कलावंतांना माईक कसा धरायचा वगैरे ठावूक आहे. नवागतांनी त्याची योग्य ती माहिती करून घ्यावी. उगाचच प्रस्तावना,'मी नवीन आहे, मला सांभाळून घ्या,' वगैरे बोलण्याची गरज नाही. चेहऱ्यावर आत्मविश्वास ठेवा.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तुम्ही जी गझल सादरीकरणासाठी घेणार आहात, ती पाठ करा. स्वतःचे पाच शेर सहज पाठ होऊ शकतात. गझल पाठ असेल तर तुमचा आत्मविश्वास वाढतो तसेच, श्रोत्यांशी उत्तम संवाद साधता येतो. मित्रांनो, आज इथेच थांबते. नेहमीप्रमाणे आता माझीही एक गझल!

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# ६४ घरांचा सम्राट आणि त्याची साम्राज्ञी!



भारतीय क्रीडा जगतात बुद्धिबळपटूंचा इतिहास मोठा उज्ज्वल राहिला आहे. आपल्या देशाने जगाला अनेक बुद्धिबळपटू दिले आहेत. त्यात ग्रॅण्डमास्टर्सची समावेश आहे. आनंद ते प्रज्ञानंद असा भारताचा या क्रीडा क्षेत्रातील प्रवास मोठा रंजक आहे. तरीही प्रत्येक क्षेत्रात एखाद दुसरे नाव असे असते जे अगदी त्या क्षेत्राची ओळख बनून जाते. तसे आपल्या देशात बुद्धिबळ म्हटले की ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन आनंद हे नाव आपसूकच ओठावर येतं. विश्वनाथन आनंदविषयी सर्व जगभरात आदराची भावना आहे. त्यामुळे त्यांच्यावर सन्मानाचा वर्षाव होत असतो. तुम्ही म्हणाल की, पाच वेळा जगज्जेता राहिलेल्या खेळाडूवर बुद्धिबळप्रेमी राष्ट्रांमधील लोक प्रेम नाही करणार तर कोण? ज्या देशात बुद्धिबळ फार खेळले जात नाही, तेथेही आनंदविषयी आदराची भावना आहे.. जपानमधील खगोलशास्त्रज्ञ केन्झो सुझुकी यांनी एका नव्या छोट्या ग्रहाचा शोध लावला आणि त्याला २०१५ साली 'विशीआनंद' असे नाव दिले.

अशा या बुद्धिवानाच्या यशाची बिजे त्याच्या संस्कारातच रोवली गेली. आनंदला त्याच्या आईने वयाच्या सहाव्या वर्षीपासूनच बुद्धिबळ शिकविण्यास सुरुवात केली. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असे म्हणतात. मात्र, विशी आनंदच्या यशामागे दोन स्त्रिया आहेत. एक त्याची आई आणि दुसरी त्याची 'बेटर हाफ' सहधर्मचारिणी. किशोरवयापासूनच आनंद यशाची शिखरे गाठत होता. लग्नायोग्य वय झाल्यानंतर आता त्याच्या जीवनातील या टप्प्याचा निर्णय अतिशय काळजीपूर्वक घ्यावा लागेल, असे त्याच्या चाहत्यांना वाटत होते. लग्नानंतर त्याच्या कामगिरीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही ना, अशी भीतीही अनेकांना वाटायची. मात्र, याउलट घडले. लग्नानंतर आनंदने यशाची आणखी मोठी शिखरे सर केली. आनंद आपल्या करिअरच्या इतक्या उंचीवर पोहोचला जिथे यापूर्वी कोणीही भारतीय पोहोचला नव्हता.

आनंद-अरुणा यांचे लग्न अगदी टिपीकल मध्यमवर्गीय भारतीयांप्रमाणे चहा, पोह्यांचा कार्यक्रम होऊन ठरते तसे झाले. आनंदचे मित्र जे जागतिक स्तरावरील बुद्धिबळपटू आहेत त्याला आजही चिडवतात की आनंदने अरुणाला विवाह जुळवणी केंद्रातील मुलींच्या कॅटलॉगमधून शोधले. प्रत्यक्षात आनंद अतिशय शांत स्वभावाचा आणि ओळखीच्या आप्तांकडून अरुणाच्या स्थळाविषयी माहिती मिळाली. अरुणाच्या आईने बघण्याचा कार्यक्रम ठरवला. मात्र, अरुणा लग्नासाठी तयारच नव्हती. तिची आई मात्र ठाम होती की, इतका शांत, सुस्वभावी आणि नावाजलेला बुद्धिबळपटू मुलगा शोधूनही सापडणार नाही. आईच्या आग्रहाखातर अरुणा लग्नासाठी तयार झाली. तत्पूर्वी पाहण्याचा कार्यक्रम पार पडला. केवळ २० मिनिटांच्या भेटीत ही रेशीमगाठ जुळली. त्यावेळचा अनुभव सांगताना अरुणा म्हणते की, मला आनंदकडे पाहून अतिशय आश्चर्य वाटले होते की इतका प्रसिद्ध असूनही हा इतका शांत, धीरोदात्त आणि विनम्र कसा असू शकतो? माझी कल्पना होती की इतका गाजलेला असल्याने त्याच्यात अहंकार असेल. मात्र, अहंकाराचा लवलेशही त्याच्यात नाही. तेव्हाही नव्हता आजही नाही. लग्नानंतर आनंदने अनेक मोठमोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. त्याचे सतत बाहेरदेशात जाणे असायचे. त्यावेळी दोघांचे फोनवरून बोलणे व्हायचे. लग्नाच्या अगदी तीन दिवसांनंतरच आनंदला एका सामन्यासाठी विदेशात जायचे होते. तिथे तो अरुणाला सोबत घेऊन गेला. खेळ सुरू होण्यापूर्वी प्रतिस्पर्धी खेळाडूंनी अरुणाकडे पाहत आनंदला म्हटले, लग्नासाठी खूप खूप शुभेच्छा. मात्र, आता तू ७० अंकांनी हरण्यासाठी तयार राहा. हे ऐकून अरुणाला अतिशय वाईट वाटले. तिच्यासाठी हा अनुभव नवीन होता. आता आनंद हरला तर त्यासाठी आपल्याला जबाबदार ठरवले जाईल, याची धास्ती तिला वाटू लागली. मात्र, आनंदने तो सामना जिंकला आणि लग्नानंतर याचा खेळ बिघडणार असे म्हणणाऱ्यांचे आडाखे त्याने त्या नंतरच्या काळातही खोटे ठरवले.

> आपल्यासाठी आनंद म्हणजे अमूक सामना खेळला आणि जिंकला किंवा माघारला, एवढाच आहे. मात्र, अरुणा सांगते की, एखाद्या स्पर्धेसाठीची त्याची तयारी असो किंवा एरवी त्याच्या दिनक्रमातील विचार प्रक्रिया असो, त्यात मला नेमके काय करायचे, हे आता पुरते कळले आहे. त्याला हवी असणारी शांतता आणि सवड कुटुंबातील जबाबदाऱ्यांपासून मुक्ततेशिवाय शक्य नाही, हे मला माहिती झाले. त्यामुळे त्याच्या स्पर्धेसाठीच्या तयारीत कुठेही व्यत्यय येणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागते. गंमत म्हणजे, असे त्याने प्रत्यक्ष मला कधीही म्हटलेले नाही.

हा संपूर्ण काळ अरुणासाठी सोपा नव्हता. हळुहळू आनंदच्या स्वभावाचा अंदाज घेत त्याच्या मानसिकतेचा विचार करून अरुणा त्याच्यासाठी एक उत्तम मॅनेजर आणि कौन्सिलर कधी बनली, हे त्या दोघांनाही कळले नाही. त्याच्या विमानाचे तिकीट काढण्यापासून तर स्पर्धेसाठी तो मानसिक आणि भावनिकदृष्ट्या तयार आहे की नाही, हे पाहण्याचेही काम अरुणा करते आहे. आई झाल्यानंतर अरुणाने मुलाकडे आपले लक्ष केंद्रित केले. मात्र, या तिच्या नैसर्गिक जबाबदारीच्या काळात आनंदनेही तिला पुरेपूर साथ दिली.

आपल्यासाठी आनंद म्हणजे अमूक सामना खेळला आणि जिंकला किंवा माघारला, एवढाच आहे. मात्र, अरुणा सांगते की, एखाद्या स्पर्धेसाठीची त्याची तयारी असो किंवा एरवी त्याच्या दिनक्रमातील विचार प्रक्रिया असो, त्यात मला नेमके काय करायचे, हे आता पुरते कळले आहे. त्याला हवी असणारी शांतता आणि सवड कुटुंबातील जबाबदाऱ्यांपासून मुक्ततेशिवाय शक्य नाही, हे मला माहिती झाले. त्यामुळे त्याच्या स्पर्धेसाठीच्या तयारीत कुठेही व्यत्यय येणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागते. गंमत म्हणजे, असे त्याने प्रत्यक्ष मला कधीही म्हटलेले नाही. हे सारे काही आपसुकच घडले आणि आजतगायत त्याचे आम्ही कटाक्षाने पालन करत आलो आहोत.

एका यशस्वी खेळाडूमागे त्याच्या कुटुंबीयांचे योगदान काय आणि किती, याविषयी विचार करायचा झाला तर अरुणा त्याचे उत्तम उदाहरण आहे. जर जगज्जेता विश्वनाथन आनंद हा मद्रासचा वाघ असेल तर अरुणा, त्याची विनम्र समजुतदार बेटर हाफ, मद्रासची वाघीण म्हणता येईल. या वाघिणीसाठी आनंद म्हणत असेल....

**आकाशाला टेकतील**
**असे हात नाही माझे**
**सगळं काही साठवून ठेवतील**
**असे डोळे नाही माझे**
**पण तुझे प्रेम साठवून ठेवेन**
**एवढे हृदय नक्कीच आहे माझे....**

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/ ७८२१८१६४८५

# बहुगुणी कुर्डा!

माणसाचं शरीर विविध अवयवांनी तयार झालंय आणि त्या प्रत्येक अवयवाची कोणी काळजी घेतं तर कोणी स्वतःहून त्या सुंदर शरीराचा नाश करतात, ही आजची वास्तविकता आहे. एक अतिशय गुणकारी व शरीराला पोषण देणारे कडधान्य आहे. काही वर्षांपूर्वी ते मोठ्या प्रमाणात शेतात पेरलेलं दिसे. पण, अलिकडे मात्र ते कडधान्य फारसं बघायला मिळत नाही. तरीही, आपल्या गडचिरोली जिल्ह्यात कुरखेडा, कोरची आणि धानोरा या तालुक्यात आजही या कडधान्याचा पेरा दिसून येतो. या कडधान्याला झाडीबोलीत 'कुर्ता' या नावाने ओळखले जाते. हे कडधान्य तीन रंगाचे म्हणजे काळे, पांढरे आणि चितकबरे रंगाचे असतात. पण, काळ्या रंगाचा कुर्ता खाण्याची आवड ठेवतात. गावखेड्यातील हे आवडते कडधान्य होते आणि आजही आहे कारण, या कडधान्याची उसळ बनवून नुसते खाल्ले तरी पोट भरते. आधीचे लोक या कडधान्याचा आहारात भरपूर समावेश होत असे.

या कडधान्यावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही किंवा त्याला खतपाणी दिले जात नाही. एकदा त्याची पेरणी केली की, ते निसर्गाच्या सान्निध्यात वाढत राहतात. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात जंगलाच्या कडेला असलेल्या शेतात किंवा शेतातील मोकळ्या जागेत जिथे पाणी साचून राहत नाही, त्या जागेत कुर्ता या कडधान्याची पेरणी केली जाते. याची पानं मुगाच्या पानांसारखी दिसत असले तरी थोडा फरक असतो. या कडधान्याचा वेल असतो आणि त्याला लागलेल्या शेंगा लहान आणि चापट असतात. हे कडधान्य जानेवारी महिन्यात हातात येते. कुर्ता कडधान्याला काढून, मोकळ्या जागेत किंवा शेणाने सारविलेल्या जागेवर ढिग करून ठेवतात आणि पसरवून बैलांच्या पायांखाली त्याला चुरतात. हे कडधान्य कमी प्रमाणात असेल तर ठेचून कडधान्य काढतात. उसळ बनविण्यासाठी आधी कुर्ताला धुवून घेतात. नंतर पातेल्यात पाणी घालून, चुलीवर किंवा गॅसवर शिजवत ठेवतात. हे वाळलेले धान्य असल्यामुळे ते शिजायला अर्धा तास लागतो. ते पूर्ण शिजल्यानंतर, त्यातील काढून घेतात. हे पाणी वाया जाऊ न देता लसणाची कडक फोडणी देतात. त्याला उकळी आल्यावर, थोडं तांदळाचे पीठ लावून त्यात एक चमच मीठ, हळद, एक चमचा तिखट घालतात. गरमागरम कुर्ताचे कढण म्हणतात.

त्याचप्रमाणे कुर्ताचे उसळ बनविण्याची पद्धतही अगदी सोपी आहे. शिजवून घेतलेल्या कुर्ताला लसूण-जिऱ्याची कडक फोडणी देतात. त्यात चार-पाच हिरव्या मिरच्या टाकून, हळद, मीठ, तिखट घालून एकजीव केले जाते. ते शिजल्यावर कुर्ता टाकायचा आणि थोडं पाणी घालून उकळी येईपर्यंत ठेवायचं. बरेचदा तांदळाचे पीठ उकडून त्यात मीठ घालून लहान पण जाडसर मुठे तयार करून त्या शिजलेल्या भाजीत टाकतात. त्यांना झाडीबोलीत 'दिवसे'



म्हणतात. हे मिश्रण एकत्र झाले की, भात-भाकर किंवा कुर्ता उसळ आणि दिवसे खाल्ले? जाते. या शिजलेल्या उसळीचा सुगंध चार घरापर्यंत जातो, हे विशेष! कुर्ता कडधान्यापासून तयार झालेले बेसन सर्वोत्तम गुणकारी आहे. बेसन तयार करण्यासाठी आधी कुर्ताला भाजून घेतात आणि थंड झाल्यावर जात्यावर दळतात. आधीच्या बाळंतीणीला या कुर्ताचे बेसन, उसळ खायला देत कारण, हे कडधान्य खूप गरम असल्याने फायदेशीर ठरते. आज अशा गुणकारी कडधान्याची पेरणी करणे आवश्यक आहे.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# पादत्राणम् माहात्म्यहम्!

अबब, किती देखणा बंगला आणि बाहेरच दर्शनी बाजूला एक आकर्षक सजावट केलेले कपाट दिसतेय? नंतर खुलासा झाला. त्या बंगल्याच्या रुपाला साजेशी चप्पल काढण्याची ती जागा होती. हल्ली मॅचिंग चप्पल्स, मॉर्निंग वॉक शूज, स्पोर्ट्स शूज, होम विअर स्लीपर्स, पार्टी वियर असे घरातील प्रत्येकाचे किमान पाच जोड! एवढी मोठी फुटविअर मॅनेजमेंट असल्यावर मोठे कपाट तर हवेच!

माणूस नावाचा प्राणी दात घासतो, कपडे परिधान करतो. तसेच, पायात चप्पल घालतो. चपलांचा वापर आबालवृद्ध, अमीरगरीब सारेच आपापल्या वकुबाने करतात. अनादी कालापासून पादत्राणे लोकांच्या संरक्षणासाठी झिजत आली आहेत. बिचारी पादत्राणे उन्हातान्हात काट्यागोट्यातून वणवण फिरतात. पण, त्यांचे स्थान कुठे तर घराच्या बाहेर! आपण त्यांना उंबरठ्याच्या आत येऊ देत नाही. पण, पुन्हा काम झाल्यावर शेवटी परत जाताना त्यांची लगेच आठवण होते. कधी परत जाताना ठेवलेल्या ठिकाणी सापडली नाही किंवा कुत्र्याने इकडे तिकडे केली किंवा चोराने गायब केली तर कशी आफत होते, हे काय सांगायला हवे ! प्राचीन काळी झाडाच्या पानांची अथवा प्राण्यांच्या कातड्याची रक्षणार्थ केलेली सोय ही आजच्या चपलेची मूळ स्थिती असावी. काही भाविक भक्तीभावाने मुद्दाम अनवाणी पदयात्रा करतात. बैरागी, साधुसंत, महंत, संन्यासी हेसुद्धा पायात खडावा घालीत. महनीय लोकांच्या पादुकांना केवढे मानाचे स्थान ! लोक त्यांची पूजा करतात. जगातील जेवढ्या महान व्यक्ती कार्यासाठी घराबाहेर पडल्या त्या पादत्राणे घालूनच! युद्धावर जातानाही ढालतलवारी सोबत सुरक्षित बूट नक्की घालीत. आता संगणक कक्षात जरी बाहेर काढावी लागत असली तरी पूर्वी कार्यालयीन पूर्ण वेळ पायताण घालूनच व्यतीत व्हायचा.

अगदी चालता यायला लागल्यापासून ते थेट मरेपर्यंत ही चप्पल पाठपुरावा (की पायपुरावा?) करतच असते. म्हणून, प्रत्येक घरात शू रॅकने एक कोपरा पटकावलेला असतो. त्या घरातील सगळ्या चपलांचे एकत्रित बघताना आजोबा, आजीची चप्पल, छोट्या बालीची चिमुकली चप्पल ही वेगळी उठून दिसते. कुणी पादत्राणे म्हणतात. खेड्यात वहाण प्रचलित आहे. घरात घालण्याच्या त्या सपाता! खेटर हा आणखी एक इरसाल शब्द आहे. जुन्या मराठी सिनेमात एखाद्या मवाल्याने छेडखानी केल्यावर पोरीच्या तोंडी हमखास येणारा शब्द! एखाद्याची तुच्छतादर्शक संभावना खेटर या शब्दांनी होते तेव्हा या खेटराला लोकांच्या मनात कोणती जागा आहे हे कळते. तरी कोणत्याच काळात खेटाराचे महत्त्व कमी होणार नाही.

शब्द बदलला की रूप बदलते. पायताण आणि पादत्राण हे व्यापक शब्द असून यातून रूपाचा बोध होत नाही. जोडे म्हणताच पेशवेकालीन काळात आपण जातो. या जोड्यांना बूट बनवले इंग्रजांनी ! पण, जगात सर्वत्र ही वस्तू काहीशी दुर्लक्षित असूनही हमखास आढळून येते. इंग्रजीत तर नवख्या माणसाची परीक्षा त्याच्या पायातली शूज बघून करतात म्हणे! पश्चिमेत लोक पायात बूट घालून डायनिंग टेबलावर न्याहारी करायला बसतात. यावरून चप्पल आणि बूट यांचे महत्त्व ओळखावे.

दर्जेदार चप्पल जोड्यांचे निर्माते हे मोठे उद्योगपती असतात. त्यांची आयात निर्यात मोठ्या प्रमाणावर होते.

**दाने दाने पे लिखा है खाने वाले का नाम**
**गोली गोली पे लिखा है मरने वाले का नाम...**

तसे प्रत्येक पादत्राणांवर ते वापरणाऱ्यांचे नाव अव्यक्तपणे कोरलेले असते. असे समजायला काही हरकत नाही. फॅशनच्या लागणपासून पादत्राण पण सुटले नाहीत. व्यावसायिक निर्माते नित्य नवी फॅशन रूढ करून, नवा माल बाजारात आणत असतात. त्यानुसार, जाहिरातीत झळकत असतात. योग्य शूज पायात असल्याशिवाय पोशाख परिपूर्ण होऊ शकत नाही. डोईवर तुरापागोटे, लांब कंबरकस घातलेला शिपाई विचारात घेता येताच, आपसूक त्याचे टोकदार जोडे नजरेसमोर येतात की नाही? या अर्थी तो वस्त्रप्रावरणांचा एक अविभाज्य भाग आहे. याची निर्मिती प्रामुख्याने मृत जनावरांच्या कातड्यापासून करण्याची पद्धत असली तरी हल्ली कापड, रेक्झीन किंवा कृत्रिम फायबर, नायलॉन प्लास्टिक, रबर यांचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो.

कधी रागाच्या भरात पादत्राणांचा शस्त्रासारखा वापर होणेही पूर्वापार आहे. लोक टोकाची भाषा म्हणून जोड्याने चोपून काढण्याची भाषा करतात. दुसऱ्या बाजूने आपल्यावर कोणी फार मोठे उपकार केले तर त्यासाठी आपल्या कातड्याची जोडे करण्याइतपत गोष्टी होतात. पण, प्रत्यक्षात तसे कधी कोणी केलं असेल असं वाटत नाही. प्राणी आपले कातडे माणसांच्या चपलांसाठी देतात हे केवढे उपकार! पण, ते स्वतः कधीच पायताण वापरत नाही. पण, पिढ्यान्‌पिढ्या अनवाणी चालून झाल्याने निसर्गांनी त्यांना कणखर असे खूर बहाल केलेले असतात. याउलट माणसाचे पाय सदोदित चप्पल वापरून नरम नाजूक झालेले असतात. नवी चप्पल विकत घेताना आपण वरून खालून चांगली पारखून घेतो. पण, नंतर रोजच्या वापरणे तिचे रुपडे बदलून एक टिपिकल स्वरूप प्राप्त झालेले असते. याचा एक अनुभव आमच्या मित्राला आला. बाहेर चप्पल काढून तो सभागृहात व्याख्यानाला जाऊन बसला. नंतर बाहेर येऊन बघतो तो काय? त्याला स्वतःची



चप्पल नेमकी कशी दिसते ते आठवेच ना ! तिथे सारख्या दिसणाऱ्या अनेक चपला बघून गोंधळ उडाला. आता आली ना पंचाईत !अंदाजाने घालावी तर उगाच चोरीचा आरोप आणि नामुष्कीची वेळ! शेवटी अर्धा तास तिथेच थांबून शेवटी जी उरली ती स्वतःची मानली. दुसरा एक किस्सा! आमच्या ओळखीचे एक अण्णा मंदिरात चप्पल चोरीला जाऊ नये. चित्त खेटरात राहू नये म्हणून एक चप्पल या कोपऱ्यात तर दुसरी दुसऱ्या कोपऱ्यात काढीत. नेहमीप्रमाणे येऊन बघतो तो काय दोन्ही चपला उजव्या पायाच्या होत्या. नंतर, याचा उलगडा झाला की, दोन अलग ठिकाणी चप्पल ठेवण्याची युक्ती आणखी एकाने केली होती आणि चप्पल योगायोगाने सारखी असल्याने महाशय दोन्ही डाव्या पायाच्या चपला घालून गेले होते. थोडा वेळ थांबल्यावर ते परत आले आणि दोघांना आपापली जोडी मिळाली. आहे ना गंमत!

चप्पल आणि बूट असे पादत्राणांचे दोन प्रमुख प्रकार आहेत. चप्पल ही घालायला आणि काढायला सुटसुटीत असते. उभ्याने फेकून झटकन पुढे जाता येते. बुटाला लेस बांधावी लागते, बसून मोजे घालावे लागतात. पावसाळ्यात गम-बूट हा एक लांबरुंद बुटाचा प्रकार बघावयास मिळतो. हाय हिल्स चप्पल स्त्रीवर्गात लोकप्रिय आहेत. शिवाय, कमी उंचीची न्यूनता भरून निघत असल्याने त्या कमालीच्या लोकप्रिय आहेत. आपुलीच पादत्राणे आपण ओळीत राखावी. चपला एका रांगेत ठेवणे हेच सहज, सोपे आणि योग्य आहे. त्यासाठी वेगळी मेहनत करण्याची गरज नाही. तरीही आपल्याच चपला (ज्या आपल्याला थोड्या वेळानंतर पुन्हा घालायच्याच आहेत) कशाही अस्ताव्यस्त फेकून पुढे का जातो?

जिथे चपलांसाठी नंबरची खुराडे नसतात तिथे अनेकदा सभासंमेलनं आदी गर्दीच्या ठिकाणी दाराशी पादत्राणांचा भलामोठा अस्ताव्यस्त ढीग अस्वस्थ करून जातो. येणारा प्रत्येक जण त्यात आपल्या चपलेची भर टाकून आत प्रवेश करतो. काही लोकं खाली न बघता, चप्पल फेकून घाईघाईने आत जातात. नंतर, येणारे आधीच्या चपला उडवून आपली जागा करतात. परिणामी सर्वच चपला एकमेकांवर कुरघोडी करीत एकमेकांत मिसळून जातात. केव्हातरी तेथील कर्मचारी सर्वच चपलांचा कोपऱ्यात ढीग करून टाकतो. बाहेर आल्यावर तेथील विदारक दृश्य बघून, कुणीही वैतागेल. आपली जोडी शोधताना इतरांच्या चपला पायाने अस्ताव्यस्त फेकतो. नंतर, आपली एक चप्पल सापडली तरीही दुसरी सापडणे दुरापास्त! आता दुसरी चप्पल गवसल्याखेरीज पुढे मार्गस्थ होता येत नाही. म्हणून, चपला ठेवल्यास ते सर्वांना सोयीचे आणि बघायलाही चांगले दृश्य दिसेल. तेव्हा चपला ओळीने ठेवलेल्या बघून पुढील लोकही ओळ कायम राखतील, हे सर्वात महत्त्वाचे! चप्पल विकत घेणे हा एक आनंद सोहळा असतो. साधारणतः सातव्यांदा किंवा आठव्यांदा दाखवलेली चप्पल पसंत पडते. आता पादत्रणात त्राण नाही. पण, पूर्वी त्याला शस्त्राचा दर्जा होता. तेव्हा करकर वाजणारे जोडे कोण येतंय ही ओळख सांगायचे. कोल्हापुरी वहाण घालून करकर आवाज करत चालणे हीच एखाद्याच्या करारी व्यक्तिमत्त्वाची ओळख ठरावी, इतके सामर्थ्य या चपलेत नक्की असते.

पूर्वी नवीन चप्पल चावणे हा एक भयंकर प्रकार अस्तित्वात होता. ती एक मानवनिर्मित व्याधीच होती. चपलेचा अंगठा तुटणे, खालील तळ म्हणजे सोल झिजणे हे चपलेचे नित्याचे रोग! मग चपलेच्या डॉक्टरकडे गेल्यावर खिळे ठोकून घेणे, चिकट सोल्युशन लावणे इत्यादी उपचार करावे लागतात. आता युज एंड थ्रोचा जमाना आलाय तरी, पावसाळ्यात सोल चपलेपासून वेगळा होतोच आणि मग रखडत रखडत रस्त्याने चालण्याचा दुर्धर प्रसंग ओढवतो. म्हणून पावसाळी चपला-बूट हे प्लास्टिकचे मोल्डेड असतात. त्यांना पॉलिश वगैरे फारशी निगा ठेवावे लागत नाही. पूर्वी ग्रामीण श्रमिकांच्या पायात टायरची चप्पल हा मजबूत प्रकार असायचा. हवाई चपला या गुलाबी किंवा निळ्या पट्ट्यांच्या असत. त्या पावसाळ्यात मागून चिखल उडवून साध्या कपड्यांना डिझाईन करायच्या.पादत्राणांचे अपहरण हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. याची पोलीस ठाण्यात तक्रार पण करता येत नाही. इतका हा मामला बिकट आहे. देवदर्शनाला गेलेला माणूस जेवढा आनंदी झाला नसेल तेवढा आल्यावर आपली नवी चप्पल जाग्यावर बघून आनंदित होतो. धड देवळात आणि चित्त खेटरात आपल्या पायापूर्ती वाहन कापणे, पायीची वहाण पायी बरी अशा अनेक म्हणी सर्वश्रुत आहेत.ही पादत्राणे नेहमी जोडीने वावरतात तरी डावाउजवा हा भेद अवश्य बाळगतात. तरी त्यांची मैत्री अतूट असते इतकी की, एकाचा वियोग झाल्यास दुसऱ्याला काडीची किंमत उरत नाही. डाव्याउजव्या विचारसरणीवरून हमरीतुमरीवर येणाऱ्या पुढाऱ्यांनी या पादत्राणांपासून बोध घ्यावा आणि आपापसातील मतभेद विसरून लोककल्याणासाठी पादत्राणांप्रमाणे झिजायला हवे. स्त्रीच्या पायात चप्पल असली तर सौंदर्य वाढते आणि तीच हातात आली प्रसंगाचं गांभीर्य शतपटीने वाढते. चप्पल या शब्दाची व्युत्पत्ती काय असावी बरे! जी घातल्याने माणूस अधिक चपळ होतो ती चप्पल ! चपलेचा अंगठा तुटला की, माणूस इतका अचपळ होतो की थेट लंगडी घालू लागतो. स्त्रिया आणि पादत्राणे हा तसं नाजूक विषय! इतके डिझाईन आणि मॅचींग प्रकार असतात की, नवरोबा हवालदिल होऊन जातात. एखादी उंच टाचेची नखरेल डिझाईनची चप्पल बघून, ती स्त्रीचे रूपरंग, स्वभाव आणि कमनीयता इत्यादी माहिती या क्षेत्रातील रसिक देतात. भविष्यात कोणतेही युग येवो, ही पादत्राणे अखंड आणि अनंत काळ झिजत राहणार आहेत.



# लाईक्स

स्वाती देशपांडे/ ८३८०८३५४०३

हल्ली ना, मला एक सवय लागलीय. मी सारखी सारखी मोबाईल उघडून बघत असते. अगदी रात्री-अपरात्री सुद्धा, माझं हे काम सुरूच असतं कारण, मी काहीतरी ग्रुपवर किंवा फेसबुकवर पाठविलं असायचं. खूप वेळ वाट पाहून, मग माझ्या मनात सहजच प्रश्न उठला, दहा तास झाले एक कविता पोस्ट करून पण, कुणीही बघितली नाही, असं काही दिलेलेच नव्हतं. शी बाई ! म्हणजे माझं काव्य काही चांगलं झालेलं दिसत नाही. पण, किती सुमार कवितांना हजारो लाईक्स येतात ना! अगदी छान, खूप छान, सुंदर शब्द निवड, अप्रतिम वगैरे वगैरे अन् मला मात्र काहीच नाही? क्षणभरच हेवा वाटला त्यांचा, ज्यांना हजारो लाईक्स मिळतात. प्रयत्नांती परमेश्वरसुद्धा भेटतो, हे वाक्य कुठेसं वाचलेलं आठवलं अन् लागले प्रयत्न करायला! पुन्हा कविता लिहिली, पाठवली साहित्य सृजन ग्रुपवर! पुन्हा तेच सुरू, लाईक्स बघणं दिवसरात्र एकच उद्योग! एका कुणीतरी केलेलं होतं. खूप आनंद झाला. दिवसभर आनंद लहरी अनुभवत होते. जणू काही आनंद सागरात न्हाले. पुन्हा पुन्हा तेच ! कविता पाठवायची आणि लाईक्सची वाट बघत बसायचं. एका वेडगळपणाच्या विश्वात वावरत होते.

आमचे एक स्नेही होते. त्यांनी माझी वाचलेली ती कविता (ज्याला अजिबातच लाईक्स नव्हते) एका स्पर्धेसाठी माझ्या नावासह पाठवली. काय आश्चर्य! त्या कवितेने प्रथम क्रमांक पटकाविला. मी म्हटलं, अगं बाई! या कवितेला तर कुणीही लाईकसुद्धा केलं नव्हतं. त्यावर, ते स्नेही हसून म्हणाले, हे लाईक-कॉमेंट्स व्हॉट्स ॲप, फेसबुकवरच्या लाईक्सचा एवढा कसला विचार करायचा, मस्त मनाला भावला तो विचार लिहायचा. असंच लिहीत रहा.

पण, खरं सांगू का? ते एक छोटंसं प्रोत्साहन आणि प्रेरणा असते अधिकाधिक लेखन करण्यासाठी! लेखनाची उर्मी येते आणि नैराश्य पार कुठल्या कुठे पळून जातं. एका लाईकला जर मी आनंदसागरात डुंबले तर, खूप प्रतिसाद मिळाल्यावर, किसणीतून किस पडावा तशा कविता मनातून बाहेर पडतील,बघायचंय का तुम्हाला? मग द्या ना लाईक्स! कुणी कुणी तर लेखनातील चुका शोधन करत बसतात आणि कळवतात. अगदी मोठ्या ग्रुपवर विनाकारण लाजिरवाणं वाटतं बाई! या मंडळींना म्हणावं, लाईक नको पण कॉमेंट आवरा! खरं ना ,त्यांनी व्यक्तिशः कळवावं ना, दुरूस्त करता येईल. अर्थात, आपणच बरोबर लिहावं, हे बुद्धीच्या चैतन्यापासून ते अहंकारापर्यंत मान्य होते. पण, होते कधी कधी चूक, आपणही माणसंच ना!

मी एक कथा लिहिली. पाठवली ग्रुपवर, ही कथा काल्पनिक आहे का? कुणीतरी व्हॉट्स ॲपवर विचारलं. अगंबाई, किती भयावह प्रसंग ना! तुम्ही घाबरला नाहीत काहो! भलत्याच बाई द्वाड तुम्ही! (त्यांना धीट म्हणायचं होतं पण, वेळेवर शब्दच आठवला नाही) मी एक कविता वाचनाचा ऑडीओ ऐकत होते. थोडेसे फेरफार करून माझेच शब्द! मी चक्रावून गेले. पण, आमच्या एका सरांनी विनोदाने सांगितलेलं होतं. ते असं म्हणाले की, आपल्या कवितांची जर कुणी कॉपी करत असेल तर त्याच्यावर क्रोधित न होता आनंदीत व्हावं आणि स्वतःला ज्ञानदेव-तुकाराम समजावं अन् आनंदात न्हावं.?

आमचे हे मला म्हणतात, तू आपली ज्याच्या त्याच्या पोस्टला छान...छान पाठवित असतेस. तुझ्या पोस्टला तर बरेच जण, वाचून न वाचल्यासारखं करतात. मी त्यांना ऐकवून देते, राखावी बहुतांची अंतरे भाग्य येते तदनंतरे वगैरै! आपण कुणाला लाईक दिल्याशिवाय आपल्याला मिळेल का? या जगात फुकट काही मिळतं का हो? मी म्हणते, ते बरोबर ना! कुठेतरी दोघींचा संवाद कानाशी घुटमळला, अगं, ती मेली माझ्या पोस्टला लाईक पण देत नाही. काय पैसे पडतात का गं! पण, फारच बाई आहे अगदी! मग माझं तरी काय अडलंय खेटर! मी पण नाही देत. मला म्हणावंसं वाटलं,अगं अशाने फेसबुक, व्हॉट्स ॲप बंद पडतील ना. निदान फेसबुक आणि व्हॉट्स ॲप बंद पडू नये म्हणून तरी लाईक देत जा गं बायांनो! भलेही भाज्यांच्या वाट्या एकमेकींना नाही दिल्या तरी चालतील, हळदीकुंकवाला नाही बोलावलं तरी चालेल.

एवढं सगळं वाचल्यावर तुम्ही मला भरभरून लाईक्स देणार ना! शंकाच नाही मुळी! पण नाही दिल्यात तर हा सगळा उहापोह व्यर्थ होईल हो! त्यासाठी

तरी द्या...लाईक!

# एमआयडीसी परिसरातील तिरूमला ऑईल कंपनीला आग
## पाच जण गंभीर जखमी ; लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

एमआयडीसी परिसरातील तिरूमला आईल मिलचे तृप्ती गोल्ड रिफाईन्ड सोयाबीन ब्रँडचे तेल या कंपनीला विवारी सकाळी ११:३० ते १२ च्या दरम्यान अचानकपणे स्पोर्ट होऊन लागलेल्या आगीमुळे गोदामातील लाखो रुपयांचे तेल जळुन नुकसान झाले तर सदरील घटनेत पाच जण जखमी झाले असून यातील तिघेजण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे.





नांदेड सिडको परिसरातील एमआयडीसी येथील तिरूमला ऑईल मिलचे जागेचे मालक महेश रेखावार व भास्कर कोत्तावार यांच्या सह त्यांची मुले व सहकारी यासह पाचजन सकाळी हिशोब करण्यासाठी कंपनीत आले. दरम्यान सकाळी साडे अकरा ते पावणे बाराच्या सुमारास या कंपनीत अचानक आगीचा स्पोट झाला. या आगीत वरील मालक व भागीदार सहकारी गंभीर रित्या जखमी झाले. यात तीघाजनांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली. तर या स्फोटात गोदामाचे काही पत्रे उडून बाजूला पडले त्याचवेळी गोदामात आग लागून लाखो रुपयांच्या तेलाचे नुकसान झाले असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. मिलचे मालक व त्यांचे सहकारी भागीदार असे एकूण पाच जण जखमी झाले आहेत यापैकी तीन जणांचे प्रकृती गंभीर असल्याचे समजते गंभीर असलेल्या रुग्णांवर नांदेड शहरातील एका नामांकित खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे माहिती आहे. या घटनेचे माहिती समजतात नांदेड वाघाळा मनपाचे अग्निशमन अधिकारी अनुक्रमे केरोजी दासरे व निलेश कांबळे तसेच एमआयडीसीचे अग्निशमन दलाचे प्रमुख पी.जी. भोयर, आर.के. ओलीवकर, एस बी सातवकर व त्यांचे सहकारी अग्निशमन विमचक अर्थातच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले अग्निशमन दलातील जवानांनी अथक परिश्रम घेऊन ही आग दुपारी १ वाजेपर्यंत नियंत्रणात आणली.ही घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरल्याने घटनास्थळी नवनिर्वाचित आमदार आनंदराव बोंढारकर यांनी ही भेट दिली.तसेच तहसीलदार प्रवीण पांडे, नायब तहसीलदार जगताप व त्यांच्या सहकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून पहाणी केली.

तरसदरील घटनास्थळी या घटनेची माहिती समजतात पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी अधिकारी कर्मचारी घटनास्थळी धाव घेऊन आग नियंत्रण आणण्यासाठी अग्निशमन दलास सहकार्य केले. लागलेल्या या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

राज्यातील समस्त मराठी पत्रकारांच्या स्वाभिमान आणि न्याय हक्कासाठी लढा उभारणाऱ्या मराठी पत्रकार परिषद मुंबईच्या ८६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राज्यभरात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्याचे निर्देश पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिले आहेत. त्यानुसार नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता शहरातील जंगमवाडी येथील महानगरपालिका रुग्णालयात येथे पत्रकारांच्या आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर देखील अशा आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करावे,असेही सूचित करण्यात आले आहे. अशा प्रकारे मागील वर्षी देखील जंगमवाडी येथील रुग्णालयात असेच शिबीर आयोजित केले होते. त्यास पत्रकार बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

मंगळवारी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे , अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, उपायुक्त तथा विधी अधिकारी अजितपालसिंघ संधू आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचा समारोप करण्यात येणार आहे. तरी शहरासह जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकार बांधवांनी या आरोग्य तपासणीसाठी सकाळी वेळेवर उपाशीपोटी उपस्थित राहून या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी, कार्याध्यक्ष संतोष पांडागळे, सरचिटणीस राम तरटे, प्रसिध्दी प्रमुख माधव गोधणे,रविंद्र संगनवार, सुरेश काशिदे, प्रल्हाद लोहेकर, प्रशांत गवळे आदींनी केले आहे.



**नांदेड**-येथील बसस्थानक मेस्को सुरक्षा जवानांच्या कार्यतत्परतेमुळे महिला प्रवाशांचे चोरी गेलेले मंगळसूत्र परत मिळाले. बसस्थानक प्रमुख कार्यालय बसस्थानक प्रमुख यासीन खान, बसस्थानक कर्तव्यावरील सहा. पोलीस निरीक्षक संजय पवार, महिला पो.कॉन्स्टेबल मीनाक्षी बनसोडे, मेस्को सुरक्षा जवान पी.बी पाटोळे, एस. बी घुगे यांच्या उपस्थितीत महिलेला मंगळसूत्र परत देण्यात आले. छाया :के. के. वागदरीकर.

## संक्षिप्त वृत्त

### ‘गंमत असते नात्याची’ नाटकाने राज्य नाट्यस्पर्धेत प्रेक्षकांची मने जिंकली

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या ६३ व्या पर्वात गंमत असते नात्याची या नाटकाने प्राथमिक फेरीत उत्कृष्ठ सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. नांदेड येथील कुसुम सभागृहात ता. २९ रोजी सायंकाळी ७ वाजता या नाटकाचे सादरीकरण झाले. विजय करभाजन यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेले हे नाटक कौटुंबिक नातेसंबंधांवर भाष्य करणारे असून, कॉर्पोरेट जीवनशैलीतील ताणतणाव व त्यातून निर्माण होणारे संघर्ष यांवर प्रकाश टाकते. या नाटकाचे निर्माते अनिल पांडे असून, राजीव गांधी युवा फोरम, परभणीच्या वतीने हे नाटक सादर करण्यात आले. रवीशंकर झिंगरे लिखित गंमत असते नात्याची हे नाटक आधुनिक जोडप्यांच्या नातेसंबंधांवर आधारित आहे. लिव्ह-इन-रिलेशनशिप, नात्यांतील उदासीनता आणि कौटुंबिक मूल्यांचा संघर्ष यावर केंद्रित असलेल्या या नाटकात करिअर व नात्यांमधील संघर्षाचे परिणाम कसे होतात, हे अत्यंत संवेदनशीलतेने मांडण्यात आले आहे. या नाटकातील भूमिका साकारणाऱ्या कलाकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. शरद पांडे यांच्या भूमिकेत किशोर पुराणिक यांनी दमदार अभिनय केला. सुलभा पांडे यांची भूमिका डॉ. सौ. अर्चना चिक्षे यांनी प्रभावीपणे साकारली. वैभव उदास यांनी सागर पांडे यांची भूमिका जिवंत केली, तर अनघा चिटणीस यांच्या भूमिकेत मोनिका गंधर्व यांनी उत्कृष्ट अभिनय केला. नाटकाच्या यशामध्ये तांत्रिक बाजूंनीही मोलाचा वाटा आहे. नेपथ्याची जबाबदारी सिद्धार्थ नागठाणकर आणि मधुकर भगत यांनी समर्थपणे सांभाळली. प्रकाशयोजनेसाठी बालाजी बाबुराव दामुके आणि दिनकर जोशी यांनी प्रभावी कामगिरी बजावली. संगीत त्र्यंबक वडसकर आणि शौनक पांडे यांनी सांभाळले. रंगभूषा प्रभाकर जोशी आणि संतोष चिक्षे यांनी केली, तर वेशभूषा सौ. निता जोशी आणि आयुषी चिक्षे यांनी अत्यंत कुशलतेने साकारली. रंगमंच व्यवस्था प्रकाश ढोले, रमाकांत कुलकर्णी, बंडू जोशी, आणि सचिन आडे यांनी उत्तम प्रकारे पार पाडली. नाटकाच्या सादरीकरणाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. कौटुंबिक नातेसंबंध व आधुनिक काळातील जोडप्यांचे प्रश्न यांवरील या नाटकाने प्रेक्षकांच्या मनात विचारांची खळबळ निर्माण केली. नाट्यप्रेमींनी नाटकातील सादरीकरण, विषयाची मांडणी, आणि तांत्रिक बाजूंना भरभरून दाद दिली. गंमत असते नात्याची या नाटकाला प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी समन्वयक किरण चौधरी व त्यांची टीम परिश्रम घेत आहेत.

# खा.चव्हाण यांच्या सूचनेची तत्काळ दखल; उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत रब्बीमध्ये तीन तर उन्हाळ्यात चार पाणी पाळ्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

रब्बी व उन्हाळी हंगामासाठी इसापूर धरणातून पाणी सोडण्यात यावे अशी मागणी प्रकल्प क्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडे केली होती. रब्बी व उन्हाळी हंगामात पिकाला पाणी कमी पडू नये याचे गांभीर्य लक्षात घेत खा. चव्हाण यांनी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर कालव्याचे पाणी पाळ्याचे नियोजन करण्याचे सांगितले होते याची दखल घेत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर कालव्याचे पाणी एक डिसेंबर रोजी सुरू करून रब्बीमध्ये तीन तर उन्हाळ्यात चार पाणीपाळ्या सुरू करण्याचे नियोजन केले आहे. रविवारी पाणी सोडण्यास प्रारंभ झाला आहे. कालवा सल्लागार समितीची बैठक झाली नसल्याने पाणी पाळ्याचे नियोजन झाले नव्हते परिणामी शेतकऱ्यांना रब्बी हंगामाचे नियोजन करण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर प्रकल्प क्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने खा.अशोकराव चव्हाण यांची भेट घेत रब्बी व उन्हाळी हंगामात पिकाला पाणी कमी पडू नये यासाठी त्वरित कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. याची दखल घेत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये १५ ऑक्टोबर रोजीच्या धरणातील ९६४.१० दलघमी (शंभर टक्के) जिवंत पाणीसाठ्यावर आधारीत रब्बी हंगामात तीन पाणीपाळ्या व उन्हाळी हंगामात चार पाणीपाळ्या देण्याच्या नियोजनास मान्यता देण्यात आली आहे.



प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना व धरण जलाशय, अधिसूचित नदी-नाल्यावरील तसेच मुख्य कालव्यावरील प्रवाही व मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी रब्बी हंगामातील हंगामी, दुहंगामी तसेच दुहंगामातील इतर उभी पिके या पिकांसाठी कालव्याचे प्रवाही, कालव्यावरील उपसा, नदी-नाल्यावरील मंजूर उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यायचे असल्यास मागणी अर्ज भरून संबंधित शाखा कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे खा. चव्हाण यांच्या पाठपुराव्यामुळे पिकांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने शेतकऱ्यांनी खा. चव्हाण यांचे आभार मानले आहेत.

**रब्बीसाठी तीन पाणीपाळ्याचे नियोजन**

रब्बी सिंचन कार्यक्रम २०२४-२५ चा आवर्तन कार्यक्रम-एक-इसापूर उजवा कालवा इसापूर डावा कालव्यातून १ ते २२ डिसेंबरपर्यंत २२ दिवस, आवर्तन कार्यक्रम दोन साठी कालावधी १ ते २२ जानेवारी तर आवर्तन कार्यक्रम तीनसाठी १ ते २२ फेब्रुवारीपर्यंत २२ दिवसांसाठी राहील. पाऊस किंवा आकस्मिक घटनांमुळे आवर्तनाच्या दिनांकात बदल होऊ शकतो, असे पाटबंधारे विभागाने कळविले आहे.

# आंतर विद्यापीठ ज्युडो स्पर्धेत ओम हेमगीर यांना कास्यपदक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**

एल.एन.सी.टी विद्यापीठ भोपाळ येथे सुरू असलेल्या पश्चिम दक्षिण विभागीय आंतर विद्यापीठ ज्युडो क्रीडा स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मुलांचा संघाने सहभाग झाला आहे. ६० किलो वजन गटांमध्ये ओम हेमगीर या खेळाडू विद्यार्थ्याने विद्यापीठास कास्यपदक मिळवून दिले आहे.



या खेळाडू विद्यार्थ्यांना डॉ. राहुल कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. विठ्ठल डुमनर हे सहभागी झाले होते.

या त्यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांनी खेळाडू संघ, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुखेड येथे दिव्यांगांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. ०१ डिसेंबर**

मुखेड शहरातील शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरण विषयक उपक्रम राबविणारे छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान छत्रपती गणेश मंडळ, दिपनगर, मुखेडच्या वतीने दि.३० नोव्हेंबर रोजी दिव्यागांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे व गणेश मंडळाचे उपाध्यक्ष सचिन मेनकुदळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंडळाच्या शहरातील यशवंतराव चव्हाण निवासी अपंग विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विनोद पाटील, सचिव प्रा.डॉ.शंकर सकनुरे, संतोष पाटील, बळवंत जाधव, संतोष तळेगावे, वैभव इंगळे, विकास जाधव, अनिकेत पांचाळ, रितेश डुमणे सौरभ भिसे, विशाल जाधव, ओम गोंड, शुभम वडजे, साई जाधव, सोहम भिसे, गजानन गुंडे विद्यालयाचे मुख्याध्यापक पांचाळ सर, बसवे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये मंगेश कदम मित्रमंडळाच्या वतीने फटाक्याच्या आतिषबाजीत आ. बालाजी कल्याणकर यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघांचे नवनिर्वाचित आ. बालाजीराव कल्याणकर यांचे मंगेश कदम मित्रमंडळाच्या वतीने राज कॉर्नर येथे सकाळी फटाक्याच्या आतिषबाजीत भव्य स्वागत करण्यात आले.



राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी विजय मिळविला. मंगेश कदम मित्रमंडळाच्या वतीने रविवारी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी बहुजन नेतृत्व मंगेशभाऊ कदम, शिवसेना मागासवर्गीय विभागाचे शहरप्रमुख अँड. धम्मपाल कदम, बिलोलीचे माजी नगरसेवक महेंद्र गायकवाड, पप्पू देशमुख तरोडेकर, अशोक देशमुख तरोडेकर, मनीष कदम, देवानंद इंगोले, आकाश कदम, गौतम सोनकांबळे, सुशील सोनवणे, विक्की गायकवाड, अमित लिंबेकर,अमित थुले, सिद्धार्थ वाठोरे, गजानन गजभारे, आशिष मस्के, सचिन वायवळ, बंटी खिल्लारे, सचिन तोटावार, मयूर बाराटे, बिचू बोरडे, राहुल बोरडे आदर्श मस्के, रवी भवरे, प्रणव सूर्यवंशी, कृष्णा कोकरे यांच्यासह मंगेश कदम मित्रमंडळाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठामध्ये बायोटेक्नॉलॉजी दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीतील जैवशास्त्र संकुलामार्फत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ नोव्हेंबर रोजी ‘बायोटेक्नॉलॉजी दिवस’ अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.


शेती, मानवी आरोग्य, औषध निर्मिती, पर्यावरण-प्रदूषण व उपाय, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर, लसींचा शोध, प्राण्यांची उपयोगिता इत्यादी बद्दल चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी पुणे येथील एव्हिड डायग्नोस्टिक्स बायोइंजीनिअरिंग चे संचालक मोहन भागवत व शेगाव येथील ए.आय.सेन्स.एल.एल.पी. फाउंडर चे संतोष बोथे या दोन तज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते.

स्टार्टअप सुरू करणे, प्रदेशात नोकरी, देशात व प्रदेशात उद्योग व कंपनी सुरू करणे, कन्सल्टन्सी सुरू करणे यासाठी विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक शिक्षण घ्याव व या क्षेत्रात प्रवेश करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

# कारेगाव फाटा येथे सोयाबीन शासकीय हमीभाव केंद्र सुरू होणार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०१ डिसेंबर**

धर्माबाद, उमरी व नायगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी आनंदाची पर्वणी आहे. कारेगाव फाटा येथे दि. विदर्भ. को. प. मार्केटिंग फेडरेशन लि. नागपूर. ज्ञान सरस्वती अग्रो प्रोड्युसर कंपनी. लि. मार्फत शासकीय हमीभाव योजनेद्वारे चालणाऱ्या शासकीय सोयाबीन खरेदीस सुरुवात होत आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी ऑनलाईन नोंदणी करून आपल्या शेतातील पीक शासकीय हमीभावात द्यावा. ऑनलाइन नोंदणीची शेवटची तारीख १५ डिसेंबर २०२४ ही आहे. सर्व शेतकरी बांधवांनी १५ डिसेंबर पर्यंत ज्ञान सरस्वती अग्रो प्रोड्युसर कंपनी लि. कारेगाव फाटा. ऑनलाइन नोंदणी करून आपले पीक हमीभावात द्यावा. असे आव्हान करण्यात आले आहे. सोयाबीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनी आधार कार्ड झेरॉक्स, आधार कार्ड लिंक असलेले बँक पासबुक झेरॉक्स, सन २०२४ -२०२५ ऑनलाइन पेरा नोंद असलेला सातबारा असावा. नोंदणी ठिकाण बालाजी फर्टिलायझर्स उमरी रोड, कारेगाव फाटा. गोडाऊनच्या बाजूस बळेगाव रोड कारेगाव फाटा येथे खरेदी केंद्र सुरू आहे.



अशी माहिती केंद्र संचालक जीवन परशुराम गाडीवान चोंडीकर, बाबुराव उर्फ बबलू हणमंतराव जगदंबे कारेगावकर , अनिल शिवाजीराव सुर्यवंशी वझरगेकर. यांनी सर्व शेतकरी बांधवांना कळविले आहे.

# गुरुद्वारा बोर्डातील अनियमितता विरोधातील याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारली

## तत्कालीन दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

सचखंड गुरुद्वारा बोर्डातील पद भरती व वेतनवृद्धीसह भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या कर्मचाऱ्यांना कारवाई न करने इतर गैरकारभाराच्या विरोधातील बोर्डाचे सेवानिवृत्त कर्मचारी भुपिंदरसिंघ गिरणीवाले यांनी याचिकेतील मुद्दे गंभीर असल्याने उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने जनहित याचिका म्हणून स्वीकारली आहे. यावर लवकरच सुनावणी होणार असल्याने संबंधितांचे धाबे दणाणले आहेत.

गुरुद्वारा बोर्डातील वरिष्ठ कारकून पदावर कार्यरत भूपेंद्रसिंग गिरणीवाले वर्ष २०२० मध्ये नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले. महाराष्ट्र नागरी सेवा कायद्यानुसार कोणत्याही कर्मचाऱ्याला बारा वर्षानंतर पदोन्नती देणे बंधनकारक आहे. वर्ष १९९८ साली वीस वर्षे सेवा झाली तरी त्यांना नियमाप्रमाणे पदोन्नती दिल्या गेली नाही. पण बोर्डातील कनिष्ठ कर्मचाऱ्यांना नियमबाह्यरित्या पदवी अहर्ता नसताना पदोन्नती देत मुख्य लिपिक पद बहाल करण्यात आले. गुरुद्वारा बोर्डातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राजकीय दबावापोटी अनेकांना पदोन्नती दिल्याचा आरोप याचिककर्त्यांनी केला आहे. अनेक कर्मचाऱ्यांना मनमानीपणे वेतनवृद्धी दिली आहे. तत्कालीन गुरुद्वारा बोर्ड अधीक्षक गुरविंदरसिंघ वाधवा यांना नियमांचे पालन न करता नियुक्ती देत व वीस हजार पगार असलेल्या वाधवा यांना ७८ हजार रुपये वेतनवाढ देण्यात आली. अशा प्रकारे २०१५ ते २०१९ दरम्यान अनेकांना पदोन्नती देण्यात आली. जानेवारी २०१५ ते १ २०१९ दरम्यान गुरुद्वारा बोर्डात गरज नसताना विविध विभागात सेवादारांसह ३७५ कर्मचारी नेमणूक केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बोर्ड अध्यक्षांची दिशाभूल करीत तत्कालीन अधीक्षकांना दोनच वर्षाच्या काळात २६ हजारापासून सुमारे ७८ हजार वेतनवाढ दिल्याचा उल्लेख केला आहे.

गुरुद्वारा बोर्डातील कर्मचारी भरती व वेतन वाढीमुळे आलेल्या देणगीचा गैरवापर होत असल्याने याचिकाकर्त गिरणीवाले यांनी राज्याचे महसूल सचिव, जिल्हाधिकारी व गुरुद्वारा बोर्ड अधीक्षक यांना प्रतिवादी करीत २०१५ साली कर्मचाऱ्यांच्या पगारापोटी दीड कोटी खर्च वर्ष २०१९ मध्ये पावणेतीन कोटी तर वर्ष २०२२ मध्ये ३ कोटी ७४ लाख रुपये भविष्य निर्वाह निधीची रक्कम वगळता झाली असल्याचे निदर्शनास आणून आहे. या गंभीर बाबीची दखल घेत उच्च न्यायालयाच्या छ. संभाजीनगरचे न्या. मंगेश पाटील व न्या. संदीप मरणे यांनी मान्य केली आहे. सदर याचिका जनहित याचिका म्हणून सुनावणी घेण्यात येणार असून याचिकाकर्त्याची बाजू साहेबराव नागरसोगे यांनी मांडली त्यांना सामाजिक कार्यकर्ते जगदिपसिंघ नंबरदार यांनी सहकार्य केले.

# ग्रामीण परिसरात रब्बी पिकांसाठी ठरतेय गुलाबी थंडी पोषक

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ०१ डिसेंबर**

गेल्या दहा पंधरा दिवसांपासून ग्रामीण परिसरात गुलाबी थंडीचा जोरकस मुक्काम वाढलेला दिसून येत आहे.शेत शिवारातील रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी, धनिया, करडी आदि पिकांना ही गर्द,कुडकुडणारी थंडी लाभदायक असल्याचे चित्र समाधानी आहे. सव्वा महिने व एक महिन्याचा गहू, हरभरा, ज्वारी अगदी हिरव्यागर्द पर्णसंभाराने लदबदून गेल्याने शेतकरी सुखावला आहे.पुढच्या मागच्या करडी, हरभऱ्यास काही प्रमाणात अळीचा, किडीचा प्रादुर्भाव उद्भवल्याने शेतकऱ्यांकडून पहिली फवारणीही फवारण्यात आली आहे. त्यानंतर शेतकऱ्यांकडून एक तुषार सिंचनाची पाणी पाळीही देण्यात आलेली आहे. परिसरात काही शेतकऱ्यांकडून उस लागवडही

करण्यात आली असल्याने उस तोडणी हंगामाही सुरू आहे. एकीकडे तुरीलाही पिवळ्या धम्मक फुलांचा डवरून बहार आल्याने शेतकरी फवारणी करण्यात मग्न आहेत. कुठे तुरीच्या शेंगा निब्बर झाल्या आहेत, तर कुठे फुल,चट्ट्या तुरीच्या शेंगा अक्षरशः लगडलेल्या आहेत. परिसरातील आडत बाजारात सोयाबीनचे भाव अजुनही जैसे थे असल्याने शेतकरी राजा पुरता विवंचनेत सापडला आहे.घरात सोयाबीन वाळवून पडून राहिल्याने बळीराजा अस्वस्थ असल्याचे चित्र मन विषण्ण करणारे आहे. हमी भाव सुगीत दणकून पडल्याने अन् आगामी सरकार अमक्या तमक्या मंत्रीपद लोभापायी शपथग्रहणातंच अडकल्याने बळीराजा गोचीत सापडला आहे. सरकारलाही काही शेतकऱ्यांचं सोयर सुतक नसल्याचं यावरून स्पष्ट जाणवायला लागतं. शेतकऱ्यांसांठी, सर्वसामान्य नागरिकांसाठी आगामी सरकारी धोरण खडतर असल्याची चर्चाही ग्रामीण परिसरात ऐकायला मिळते आहे. सध्यातरी वाढती थंडी पिकांसाठी पोषक ठरल्याने तूर्तास शेतकरी झाक खुशीत आहे.

# चुका सुधारून यशाला गवसणी घालता येते-शिंदे

## रोलबॉलमध्ये बीड, हॉकीत छत्रपती संभाजीनगरचा दबदबा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

खेळात खिळाडूवृत्ती हवी. जो संघ विजयी होतो, त्यांनी हुरळून जाऊ नये. कारण पराभूत संघाचा ही खेळ चांगला असतो. अनेकदा थोड्याफार चुकांमुळे अपयश येते. या चुका सुधारून यशाला गवसणी घालता येते. त्यासाठी खेळाडूंनी एकाग्रतेने खेळत रहावे, असे मार्गदर्शन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांनी खेळाडूंना केले.



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषदेच्या विद्यमाने व जिल्हा हॉकी असोसिएशन आणि रोलबॉल असोसिएशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय शालेय हॉकी व रोलबॉल स्पर्धा नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुलात घेण्यात आल्या.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा संकुलात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, पत्रकार सोमनाथ खताळ, जिल्हा हॉकी संघटक प्रा. दिनकर थोरात, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडाधिकारी कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील, सतीश राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे जमादार सांगळे, हॉकी प्रशिक्षक व पंच अकबर खान, संस्थापक कार्याध्यक्ष म्युझिकल चेअर इंडिया तुकाराम ठोंबरे, रोल बॉल संघटनेचे सचिव रामदास गिरी उपस्थित होते.

स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागातील १० पेक्षा जास्त संघांनी सहभाग नोंदविला. रोलबॉल स्पर्धेत बीड आणि परभणीचे तर हॉकी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूंचे वर्चस्व राहिले. हॉकी स्पर्धेकरिता पंच म्हणून अकबर खान, शेख समीर, पवन ढाकणे, मोहमद वसीम तसेच रोलबॉल स्पर्धेकरिता वैभव गिरी, सुधीर हजारे, शरद पवार यांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी कालिदास होसूरकर, अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, अविनाश पाटील, क्रीडा संयोजक जितेंद्र आराक, वरिष्ठ लिपिक धनेश करांडे, कनिष्ठ लिपिक त्रिगुणा वाघमोडे, मंगेश वडमारे यांनी पुढाकार घेतला. प्रास्ताविक विद्यागर यांनी केले. सूत्रसंचालन जितेंद्र आराक यांनी केले.

**हॉकी निकाल**

१९ वर्षांखालील मुले : प्रथम गीता गुरुकुल विद्या मंदिर, फुलंबी जि. छत्रपती संभाजीनगर द्वितीय डॉ. सौ. इंदिराबाई भास्कराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

१९ वर्षांखालील मुली – प्रथम युरेका इन्फोसिस स्कूल, छत्रपती संभाजीनगर, द्वितीय डॉ. सौ. इंदिराबाई भास्कराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

रोलबॉल निकाल

१४ वर्षांखालील मुली – प्रथम गुरुकुल पब्लिक स्कूल, बीड

१४ वर्षांखालील मुले – प्रथम गुरुकुल इंग्लिश स्कूल, बीड, द्वितीय – स्कॉटिश अकादमी, परभणी

१७ वर्षांखालील मुले – प्रथम सेंट ॲगस्टोन इंग्लिश स्कूल, परभणी

द्वितीय – पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

## बालकांचे हक्क यावर जनजागृतीपर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

बाल हक्क सप्ताहानिमित्त ‘बालकांचे हक्क’ या विषयावर शहरातील तेलगाव रोड येथील राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयात प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (ता.२८) जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी केले. युनिसेफच्या वतीने सोनिया हंगे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विधीदूत मिथुन जोगदंड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. बलभीमराव जाहेर पाटील होते. सूत्रसंचालन तिडके यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती कदम यांनी आभार मानले.

## पवनचक्की कंपनीविरोधात तक्रार करण्यासाठभ शेतकऱ्यांनी पुढे यावे –डॉ.योगेश क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

आमदारांच्या वरदहस्तामुळे पवनचक्की कंपन्यांकडून बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू आहे. आर्थिक हितसंबंधातून पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे पाठबळ मिळत आहे. परंतु बालाघाटवरील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



बीड तालुक्यातील बालाघाटावरील १०-१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे. हे काम करणाऱ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील तारा ओढताना पिकांचे नुकसान झाले. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली मिळत नाही. तसेच, टॉवर व विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यापोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक चेक बाऊन्स झालेले असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. अशी अनेक प्रकरणे असताना कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांना अरेरावीची भाषा करतात आणि आमदार बघ्याची भूमिका घेतात. यावरून कंपन्यांचे आमदारांशी आर्थिक हितसंबंध आहेत, हे स्पष्ट होते. असे असले तरी कोणत्याही शेतकऱ्याची पिळवणूक होत असल्यास माझ्याशी संपर्क करून तक्रारी द्याव्यात. आपण पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करू, असेही पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

यापूर्वीही जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार; ठोस कार्यवाहीची शेतकऱ्यांना अपेक्षा

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासमवेत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन काही महिन्यांपूर्वी पवनचक्की कंपन्यांच्या गैरकारभाराबाबत तक्रार केली होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आमदारांचे आर्थिक हितसंबंध असल्याने कंपन्यांविरोधात अद्याप ठोस कार्यवाही होऊ शकलेली नाही.

## बीडच्या पुरणदास मठ संस्थानात साकारणार भव्य आशापूरक शिवमंदिर मंदिराच्या बांधकामास झाली सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

बीड शहरातील जुना मोंढा भागात स्थित असलेल्या पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळाच्या भव्य परिसरात भव्यदिव्य असे आशापूरक शिवमंदिर उभारण्यात येत असून नुकतीच या मंदिराच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले असून कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

बिंदुसरा नदीच्या काठावर पूर्वेस जुना मोंढा भागात पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळाचा भव्य परिसर असून या निसर्गरम्य परिसरात असलेल्या गोशाळेत शहरात मोकाट फिरणार्या मुक्या जनावरांचे आणि गाईंचे संगोपन केले जाते. या ठिकाणी पुरणदास महाराजांचे मंदिर असून नवसाला पावणार्या रामभक्त हनुमानाचे तसेच नागदेवतेचे मंदिर आहे. या ठिकाणी गोशाळेबरोबरच विविध पक्षी आणि प्राण्यांचे संगोपन केले जाते. तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी विविध साहित्य उपलब्ध आहे. या निसर्गरम्य परिसरात भव्य आशापूरक शिवमंदिर उभारण्याचा संकल्प पुरणदास मठ संस्थानग आणि गोशाळेचे सचिव तथा युवा शक्ती सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष रणजीत पवार यांनी केला होता. त्यांच्या या संकल्पाला पूर्णत्व देण्याचे काम प्रभू गोलक्षदास महाराज यांनी केले आहे. सदरील शिवमंदिरात उज्जैन येथून भव्य महादेवाची पिंड आणि नंदीची मूर्ती मागविण्यात आली आहे. पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळेला पुरणदास महाराज, भगवान बाबा, नागनाथ महाराज, हरिदास महाराज, सिलारामजी महाराज, किसननाथजी महाराज यांचे शुभाशीर्वाद लाभलेले आहेत.



या ठिकाणी नव्यानेच उभारण्यात येणार्या आशापूरक शिवमंदिराचे भूमिपूजन प्रभू गोलक्षदास महाराज, पुरणदास महाराज मठ संस्थान आणि गोशाळेचे सचिव रणजीत पवार, दै. मराठवाडा साथीचे बीड जिल्हा प्रतिनिधी संदीप बेदरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी राजाभाऊ चव्हाण, सुधीर चव्हाण, बाबुराव जाधव, बबलू ढाकणे, विजय रायभान, शैलेश गीते, सचिन पवार, डॉ. सिद्धांत बेदरे, अभिषेक पवार, प्रेम कोयरे, अक्षय पवार, बाळू जैन, टिंकू जैन आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## बालकांच्या पालक, नातेवाईकांचा शोध घेण्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

बीडच्या बालकल्याण समितीने शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथील सनी गायकवाड, प्रीतम काळे या बालकांच्या पालक व नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांना आदेशित केल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

ही दोन्ही बालके शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथे काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समितीच्या आदेशाने दाखल झाली आहेत. या दोन्ही बालकांना निरीक्षण गृह, बालगृह येथे दाखल झाल्यापासून कोणीही आई-वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही. सदरील वृत्त प्रसारित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बीड, बाल कल्याण समिती, बीड व अधीक्षक, शासकीय निरीक्षण गृह, बालगृह, बीड तसेच संस्थेच्या चाँदमारी क्वार्टर, पालवन चौक, बीड या पत्त्यावर अथवा अधीक्षक (मो. क्र.९९२२९८८८०६) यांच्याशी संपर्क करावा. अन्यथा बाल कल्याण समिती या बालकांबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल. मुदत संपल्यानंतर कोणताही दावा अथवा हक्क बाल कल्याण समिती ग्राह्य धरणार नाही.

सनी राजू गायकवाड याचा जन्म १० जून २००७ रोजीचा आहे. त्यांचे वय १७ वर्ष ०४ महिने आहे. सध्याचा त्याचा पत्ता बीड येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह आहे. बेवारस अवस्थेत ते सापडले होते. बाल कल्याण समितीच्या आदेशाने या बालकास एक ऑक्टोबर २०१३ रोजी बालगृहात दाखल केले. बालकाचा रंग सावळा असून हनुवटीवर तीळ आहे.

प्रीतम दत्तात्रय काळे याचा जन्म २६ जुलै २०१३ रोजीचा आहे. त्याचे वय ११ वर्ष ०२ महिने असून तो सध्या बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील शिराळ येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह असा त्याचा सध्याचा पत्ता आहे. हा बालक घरातून निघून गेला होता. तो बालगृहात बाल कल्याण समिती, बीड यांच्या आदेशाने २९ डिसेंबर २०२३ रोजी दाखल झाला. हा बालक रंगाने गोरा असून मानेवर उजव्या बाजूला तीळ आहे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

## श्री संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ डिसेंबर**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये सकाळी १० वाजता महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील नामांकित श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये गुरुवारी सकाळी १० वाजता स्त्री शिक्षणाचे शिल्पकार महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



यावेळी सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री संस्कार इंग्लिश स्कूल चया मुख्याध्यापिका सौ. सिमा काळे यांनी बोलताना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जिवन चरित्रावर उजाळा दिला. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सिमा काळे, शिक्षीका देशमुख मॅडम, निलम जोगदंड, खंदारे मॅडम, गायकवाड मॅडम, शिंदे मॅडम, यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपद्वारे होणार ई-पीक पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

रब्बी हंगाम एक डिसेंबर २०२४ पासून राज्यात सुरू होत आहे. शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यासाठी आधी ई-पीक पाहणी मोबाईल प उपलब्ध होते. परंतु आता केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे काही तांत्रिक दुरूस्ती करून नवीन रूपात ई-पीक पाहणी DCS मोबाईल प उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या नंतर १०० टक्के पीक पाहणी सुधारित ई-पीक पाहणी DCS मोबाईल पद्वारे संपूर्ण राज्यात होणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपली पीक पाहणी ठराविक मुदतीत करून घ्यावी. जेणेकरून कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचण येणार नाही, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून केले आहे.

शेतकरी स्वत: पिकांची नोंद ई-पीक पाहणी मोबाईल पद्वारे नोंदवायचे व उर्वरीत पीक पाहणी जे शेतकऱ्यांनी नोंदवलेली नाही, ते तलाठी यांच्यामार्फत होत असत. त्यामध्ये दुरूस्ती करून शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहायक यांची नेमणूक करण्यात येत आहे. प्रत्येक गावासाठी सहायक उपलब्ध राहणार असून सहायकामार्फत पीक नोंदणी होणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी ऊड मोबाईल पमध्ये पिकांची नोंद असणे आवश्यक आहे.

नवीन मोबाईल पमधील आवश्यकता

पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत फोटो घेणे अनिवार्य आहे.

पिकांचे दोन फोटो घेणे बंधनकारक.

सुधारित पमधील नवीन सुविधा

शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सहायक उपलब्ध असेल, असेही प्रशासनाने कळवले आहे.

## जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवांनी महोत्सवात सहभाग नोंदवावा – अरविंद विद्यागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

### जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजनासाठी बैठक

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ ते ०५ डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ ते २९ वयोगटातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन संदर्भात समिती सदस्य, तज्ज्ञ, परीक्षक यांची बैठक शुक्रवारी (ता.२९) पार पडली. बैठकीस माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी अरुणा कोचुरे, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, तुकाराम पवार, गटशिक्षणाधिकारी श्री . तुरुकमाने आदींची उपस्थिती होती. बैठकीत शिक्षणाधिकारी श्री. शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर यांनी जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजना बाबत उपस्थितांना माहिती दिली.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना यावर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, यात समूह लोकनृत्य , लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, या कथालेखन , चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ७ हजार , द्वितीय ५ हजार, तर तृतीय ३ हजार रुपये देण्यात येणार आहेत. लोकगीत स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार, तर तृतीय २५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

बैठकीस जिल्ह्यातील युवा क्षेत्रात काम करणारे दिनकर थोरात, प्रा. दीपक जमदाडे, प्रा. राम गव्हाणे, प्रा. सोपान सुरवसे, प्रा. केशव भागवत, प्रा.एस.एस.राऊत , प्रा .डॉ. रवींद्र काळे , श्री .व्ही. बी ठोंबरे श्री. आर. एस .इंगळे आदींची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी अनिकेत काळे , कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गर्शक सतीश राठोड, रेवननाथ शेलार, अविनाश पाटील, धनेश करांडे, जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, राजेश बागलाने, मंगेश वडमारे आदी पुढाकार घेत आहेत.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या ऑनलाईन अर्जासाठी १६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून ही योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १६ डिसेंबरपर्यंत वाढविली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## कोणत्याच रजिस्ट्री बेकायदा नाही, नोंदणी उपमहानिरीक्षक विजय भालेराव यांचा जावाई शोध

### चौकशी समितीच्या अहवालाला केराची टोपली

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : जिल्हा मुद्रांक नोंदणी विभागाने गेल्या वर्षभरातील केलेल्या रजिस्ट्रींची चौकशी करून सादर केलेल्या अहवालात शहरातील तीन कार्यालयात एकूण ७८८ रजिस्ट्रींमध्ये तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन झाल्याचे समोर आले आहे. जिल्हाधिकार्यांकडे आलेल्या पुराव्यानिशी तक्रारींवरून केलेल्या चौकशीत ही गंभीर बाब समोर आली असून, जिल्हा मुद्रांक नोंदणी विभागातील वरिष्ठ अधिकारी मात्र आपली चूक मान्य करण्यास तयार नाही.

एकीकडे जिल्हाधिकार्यांच्या आदेशाने अप्पर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने मुद्रांक विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यार आणून उघडा-नांगडा करूनही अधिकारी मात्र 'मी नाही त्यातली' म्हणी प्रमाणे वागत आहेत. केलेल्या कृत्याची कबुली देणे अथवा सुधार करू अशी भाषा करणे सोडाच उलट आम्ही आमचे काम करू, नागरिकांची फसवणूक झाल्यास त्यांनी न्यायालयात जावे, न्यायालय आहेच त्यासाठी असा अजब सल्ला अधिकारी देत आहेत. अधिकार्यांच्या अशा बेजबाबदार वागण्याने सर्व सामान्यांची फसवणूक झाल्यास त्यास अधिकारी जबाबदार राहणार नाही तर मालमत्ता खरेदी -विक्री करणारे राहतील असा अजब जावाई शोध मुद्रांक विभागाने लावला आहे.

**'एनए'चीही होणार चौकशी**

रजिस्ट्रींसोबत जोडलेल्या काही बनावट एनए दस्तऐवजांमुळे बेकायदेशीर व्यवहार लपवण्याचा संशय आहे. अद्याप काही व्यवहार चौकशीच्या बाहेर ठेवल्याने बेकायदेशीर रजिस्ट्रींची संख्या कमी भासवल्याची चर्चा आहे.

**२ डिसेंबरपूर्वी अहवाल**


१५ दिवसांत माहितीच्या सूचना जिल्हा सहनिबंधकांना दिल्या होत्या. पण, समितीची मुदत संपूनही नोंदणी विभागाने विहित नमुन्यात अहवाल सादर केलेला नाही. आता २ डिसेंबरपूर्वी सविस्तर अहवाल सादर करण्याचे पत्र दिले आहे.

पत्रकार न्यायाधीश बनलेत काय? अप्पर जिल्हाधिकारी डॉ. लोखंडे यांच्या समितीने ७८८ रजिस्ट्रीची नोंद बेकायदेशीर झाल्याच्या अहवालासंदर्भात नोंदणी उपमहानिरीक्षक विजय भालेराव यांची भेट घेतली असता, भालेराव यांनी पत्रकार आणि पेपरला न्यायाधीश बनन्याचा अधिकार आहे का? दैनिकात बातम्या देताना पेपर न्यायाधीशांच्या भूमिकेत असतात का? माझे सहकारी माझ्या आदेशानेच काम करतात, त्यांनी केलेल्या कामांना मी बेकायदा म्हणत नाही.

मालमत्तेची नोंद घेताना देणार व घेणार यांनी कागदपत्रांची पाहणी करावी, ते योग्य आहे की आयोग्य आम्ही पाहू शकत नाही, आम्ही फक्त महसूल जमा करतो, यात नागरिकांची फसवणूक होत असेल तर न्यायालय कशासाठी उभारले? त्यांनी तिथे न्याय मागावा अशा बेजबाबदारपणाचे उत्तर देत टाळाटाळ करून भ्रष्ट अधिकार्यांच्या चुकांवर पांघरून घालण्याचे काम करीत होते. यावर न्यायालयात जावेच लागणार नाही असे आपल्या विभागाला काम करता येणार नाही का? या प्रश्नावर भालेराव म्हणाले की, आमची स्टॅम्प ड्युटी घेण्याची जबाबदारी ज्यांची फसवणूक झाली त्यांनी न्यायालयात जावे, न्यायालय कशासाठी उभारले असे म्हणत. आजपर्यंत होत असलेल्या बेकायदा कामांना एकप्रकारचा पाठिंबाच दिला.

---

### मयत इसमानाची ओळख पटवण्याचे पोलिसांचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर -नांदेड येथील रेल्वे स्थानकावर रंग काळा - सावळा, नाक सरळ ,कपाळ उंच ,दाढी बारीक ,पांढरी डोक्याचे केस बारीक पांढरे ,अंगात पांढऱ्या रंगाचे फुल बाह्याचे काळे ठिपके असलेले शर्ट व ग्रे कलरची फुल पॅन्ट उंची पाच फूट सहा इंच ,बांधा सडपातळ , वय अंदाजे ६५ वर्ष असलेले पुरुष जातीचा मयात इसम आढळून आला आहे. त्याच्याजवळ काही एक वस्तू मिळून आली नसल्या कारणाने अद्याप ओळख पटली नाही,सदर इसमानाचे मयत शरीर हे सरकारी दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे दोन दिवस शीत गृहात ठेवण्यात येणार असून मयत इसम कोणाच्या ओळखीचे असल्यास त्यांनी लोहमार्ग पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजया मेलफेदेवार यांनी केले आहे.

### कैलास दंडगव्हाळ यांचे निधन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१ डिसेंबर:



भालगाव तालुका गंगापूर येथील कैलास गंगाधरशेठ दंडगव्हाळ ( वय ७० ) वर्ष यांचे दिनांक ३० नोव्हेंबर रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे.त्यांचा अंत्यविधी रविवारी १ डिसेंबर रोजी दुपारी बारा वाजता दंडगव्हाळ वस्ती भालगांव तालुका गंगापूर येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली एक मुलगा असून ते भगवानशेठ दंडगव्हाळ यांचे बंधू व गोकुळ दंडगव्हाळ यांचे वडील होत.

### घाटीतीतून मोबाईल लंपास

छत्रपती संभाजीनगर : घाटीतील वार्डातून एकाचा मोबाईल चोरट्याने लांबविल्याची घटना २८ नोव्हेंबर रोजी रात्री घडली. या प्रकरणी बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख कुतुबुद्दीन शेख जैनुद्दीन रा. नूतन कॉलनी अजबनगर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार २८ नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास ते घाटी रुग्णालयातील वार्ड क्रमांक १७ मध्ये होते. अज्ञात चोरट्याने त्यांचा रेडमी कंपनीचा मोबाईल लंपास केला. याप्रकरणी बेगमपुरा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### काल्डा कॉर्नरवरील दुकान फोडले

छत्रपती संभाजीनगर, : काल्डा कॉर्नर जवळील इलेक्ट्रिकल दुकान फोडून ३ लाख ४१ हजार रुपयांचे मोबाईल लंपास केले. ही घटना २९ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री घडली. या प्रकरणी जवाहर नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरीश देविदासराव पंडित रा. ज्योती नगर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार २९ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी काल्डा कॉर्नर वरील त्यांचे डी एस इंटरप्राईजेस या दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला. दुकानातील ४१ हजार रुपये रोख, रेडमी कंपनीचे मोबाईल हँडसेट, ३१ हजार ५०० रुपये किंमतीचा टीव्ही, ७ हजार रुपये किंमतीची स्मार्ट वॉच असा ३ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. जवाहर नगर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### गुलाम अहेमद पटेल दु:खद निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १ डिसेंबर:




गुलाम अहेमद बापूलाल पटेल (वय -४८, रा. सोमपुरी) यांचे दि १ रविवारी दुपारी एक वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. सायंकाळी साडेसहा वाजता त्यांचा कब्रस्थानात दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, तीन मुली, मुलगा असा परिवार आहे.

---

## पैठण वकील संघाच्या अध्यक्षपदी अँड घायाळ तर सचिवपदी अँड घोरपडे

तभा वृत्तसेवा पैठण दि ०१ :- पैठण वकील संघाच्या अध्यक्षपदी अँड रवींद्र घायाळ तर सचिवपदी कैलास घोरपडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली असून वकील संघाच्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी अँड राहुल बाबर, अँड ओमप्रकाश भांडेकर,कार्यकारी अध्यक्ष अँड संदीप गोरे,अँड जी. काकडे, सहसचिव अँड सिद्धार्थ सुतार, कोषाध्यक्ष अँड दादासाहेब दसपुते तसेच महिला प्रतिनिधी म्हणून अँड जनाबाई औटे यांची वर्णी लागली आहे.

पैठण वकील संघाच्या कक्षात २०२४- २५ नूतन कार्यकारिणी साठी सभा बोलावण्यात आली होती.त्यावेळी सर्वानुमते बिनविरोध वरील कार्यकारिणीची निवड करण्यात आली. पैठण





वकील संघाचे अध्यक्ष अँड रवींद्र घायाळ यांच्या सह नूतन कार्यकारिणीचे जेष्ठ विधीतज्ञ अँड देविदास निवारे, अँड लक्ष्मण डमाळे, अँड देवेंद्र गव्हाणे, अँड आरती राका,अँड आघाव, अँड प्रवीण निवारे, अँड नंदा जाधव, अँड सदाशिव जाधव, अँड आकाश जगताप, अँड अमर पटेल, अँड सलीम शेख, अँड गणेश डहाळे,अँड विठ्ठल उघडे, अँड सुवर्णा देवगिरे, अँड आदिनाथ सानप,अँड संजय मिसाळ,अँड शमेर पटेल आदींनी अभिनंदन केले आहे.

## इंग्रजीवर प्रभुत्व असणे वकिलांसाठी महत्त्वाचे : संजीव देशपांडे

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

वकिली व्यवसायात इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व मिळवणे अतिशय महत्वाचे आहे आणि त्याकरता कठोर परिश्रम करण्यास पर्याय नाही, असे प्रतिपादन वरिष्ठ विधिज्ञ संजीव देशपांडे यांनी केले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंडपीठातील वकील संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मार्गदर्शन व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना वरिष्ठ विधिज्ञ संजीव देशपांडे बोलत होते. उच्च न्यायालय वकील संघाच्या वतीने आयोजित व्याख्यानात देशपांडे बोलत होते. खंडपीठ वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अविनाश बोरूळकर, उपाध्यक्ष ॲड. श्रीकांत कवडे, ॲड. शिल्पा अवचार, शेरखाने व्यासपीठावर होते. 'वकील आणि वकिलीबाबत शेक्सपिअरचे लेखन' या विषयावर ते बोलत होते. त्यांनी शेक्सपियरचे साहित्य आणि कायदा व वकील यांचा संबंध याचा उलगडा आपल्या खुमासदार शैलीत सादर केला.

देशपांडे म्हणाले, उत्तम वकिलास भाषा आणि साहित्याची जाण असणे आवश्यक आहे. शेक्सपिअरच्या वाचनामुळे केवळ जीवनविषयक दृष्टिकोन प्राप्त होतो, असे नव्हे तर अनेक कायदेविषयक संकल्पनांचा उलगडा होतो. अन्य कोणत्या व्यवसायाहून अधिक आपल्या नाट्यकृतींमधून शेक्सपिअरने वकील व वकिली व्यवसायाविषयी विपूल लेखन केल्याचे दिसून येते. शेक्सपिअरने औपचारिकरित्या विधी अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता किंवा कसे याबाबत ठोस माहिती उपलब्ध नाही. तथापि, त्यांच्या अनेक नाट्यकृतींमधून मोठ्या प्रमाणावर कायदेविषयक संकल्पनांचा उहापोह केल्याचे दिसून येते.

मर्चंट ऑफ व्हेनिस मधील व्यापारी अँटोनियो हा शायलॉक नावाच्या सावकारास काही पैसे देणं लागतो. या व्यव्हाराचा एक लिखित करार दोघांमध्ये होतो. या कराराच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयापुढे खटला दाखल करण्यात येतो अशी या नाटकाची कथा. अनेक महत्त्वपूर्ण निवाड्यांमधून या नाटकातील उतारे न्यायालयांनी आपल्या निकालांमध्ये उद्धृत केले आहेत. हॅम्लेट या शेक्सपिअरच्या गाजलेल्या नाटकामधूनही वकिलांविषयीचे एक स्वगत लक्षवेधी आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी वकील संघाचे सचिव ॲड. रवींद्र गोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन ग्रंथालय समितीचे सचिव ॲड. विश्वेश्वर पठाडे यांनी केले, तर आभार ॲड. उमेश गीते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खंडपीठ वकील संघाचे सहसचिव ॲड. शरद शिंदे, ॲड. सुस्मिता दौंड, खजिनदार ॲड. राम थोरात, ग्रंथालय समितीचे चेअरमन ॲड. बळीराम शिंदे, सदस्य ॲड. अक्षरा मडके, ॲड. नासिमबानो देशमुख, ॲड. मयूर बोरसे, ॲड. कृष्णा भोसले, ॲड. संकेत पळणीटकर, ॲड. आशुतोष सिसोदिया, ॲड. राहुल सूर्यवंशी, ॲड. ओमप्रकाश तोतावाड यांनी परिश्रम घेतले.

---

## जवान करण कच्चे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १ डिसेंबर

पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील लाखेगाव ता पैठण येथील सीआयएसएफ जवान करण कच्चे हा विहिरीत पडलेल्या भावजयी ला वाचविण्यासाठी गेला असता विहिरीत उडी घेतली असता डोक्याला मोठी इजा झाल्याने पाण्यातील गाळात अडकल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि.२८ गुरुवार रोजी घडली होती.आज दि २९ शुक्रवार रोजी ग्रामीण रुग्णालय बिडकीन वैद्यकीय अधिकारी डॉ अस्मा शेख यांनी येणे शवविच्छेदन करत मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला होता.यावेळी मयत करण कच्चे यांचे पार्थिव रूग्णवाहिकेतुन लाखेगाव येथील गावी नेण्यात आले होते.लाखेगाव येथील राहत्या घरापासून ते स्मशानभूमी पर्यंत अशी मोठ्या संख्येने गावातील व परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.स्मशानभुमी येथे पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवले होते तर यावेळी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल व महाराष्ट्र पोलीस व बिडकीन पोलीस ठाणे यांच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करत आदरांजली अर्पण करत मानवंदना देण्यात आली.यावेळी बिडकीन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, सहायक पोलीस फौजदार जगन्नाथ उबाळे, पोलीस कर्मचारी पवन चव्हाण यांनी हि सलामी देत मानवंदना दिली.

## मधुमेह असतानाही सुरक्षित मातृत्व शक्य : पीएसजी परिषदेस सुरुवात



छत्रपती संभाजीनगर : बदलती जीवनशैली आणि वाढणारा मधुमेह यामुळे गर्भधारणा आणि प्रसूती दोन्ही मधील गुंतागुंत वाढत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन आणि तंत्रज्ञान यामुळे ही गुंतागुंत कमी होऊन सुरक्षित मातृत्व आणि निरोगी बाळ जन्माला घालता येते त्यासाठी सुरुवातीपासून योग्य उपचार घेण्याची गरज आहे आहे असे मत औरंगाबाद मधुमेह तज्ञ संघटनेच्या वतीने प्रेग्नसी स्टडी ग्रुप फॉर डायबेटीस २०२४ (पीसीजी)या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत सहभागी तज्ञ डॉक्टरांनी केले.

सकाळी नर्सेस आणि ड्युटी वरील डॉक्टरांसाठी आयोजित कार्यशाळेने परिषदेचा श्रीगणेशा झाला. शहरातील अनेक रुग्णालयातून आलेल्या १०० हुन अधिक परिचारिकां आणि डॉक्टरांना डॉ. अजय रोटे , डॉ. दीपक भोसले, डॉ. एहसान शेख, डॉ. मयुरा काळे, डॉ. संजीव इंदूरकर, डॉ. चित्तरंजन याज्ञिक आणि पल्लवीं याज्ञिक यांनी मार्गदर्शन केले. अशा प्रशिक्षणाच्या माध्यमातून गर्भावस्थेतील मधुमेही रुग्णांची अधिक चांगल्या पद्धतीने काळजी घेता येईल असा विश्वास व्यक्त झाला.

मधुमेही महिलेने गर्भधारणे पूर्वी घ्यावयाची काळजी, गर्भावस्थेतील मधुमेह निदानाची योग्य पध्दती, उपचाराच्या योग्य पद्धती आणि मार्गदर्शक तत्वे ,रक्तातील साखरेचे नियोजन, मधुमेही रुग्णांसाठी गर्भधारणेतील आव्हाने, अशा महत्वाच्या विषयावर राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीयस्तरावरील तज्ञ डॉ. चित्तरंजन याज्ञिक, डॉ. संजीव चावला, डॉ. संजीव कानील, डॉ. संजीव अग्रवाल, डॉ. पिंकी सक्सेना, डॉ. शालिनी जग्गी, डॉ. प्रदीप जेठलानी, डॉ. संजीव पाठक , डॉ. धर्मेंद्र पांचाळ, डॉ. बन्सी साबू, डॉ. ज्योतीदेव, डॉ. ऋतुल गोकलानी,डॉ. अजित भागवत, डॉ.सास्तूरकर, डॉ. माया इंदूरकर, डॉ. अर्चना सारडा यांनी मार्गदर्शन केले. परिषदेत वीस संशोधन निबंध सादर करण्यात आले.

परिषदेसाठी देशभरातून चारशे हुन अधिक फिजिशियन, मधुमेह तज्ञ आणि स्त्री रोग तज्ञ सहभागी झाले आहेत.

**मान्यवरांच्या हस्ते उदघाटन**

परिषदेचे उदघाटन डॉ. बन्सी साबू, डॉ. चित्तरंजन याज्ञिक , डॉ. संजीव इंदूरकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. पुणे येथील शाश्त्रज्ञ आणि ज्येष्ठ मधुमेह तज्ञ डॉ. चित्तरंजन याज्ञिक , प्रसूती व स्त्री रोग तज्ञ डॉ. किशोर अतनूरकर आणि ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. सविता पानट यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तसेच मधुमेह क्षेत्रात अद्वितीय कार्य केल्याबद्दल डॉ. मनोज चावला आणि डॉ. पूर्वी चावला यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. संजीव इंदूरकर यांनी प्रास्ताविक केले. संयोजन समितीच्या सचिव डॉ. मयुरा काळे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. अजय रोटे यांनी आभार प्रदर्शन केले.

---

## वेदांतनगर पोलीसांनी व माणुसकी समुहाने दिला हैंद्राबाद येथील २९ वर्षीय मनोरुग्ण महिला अलीरा मसुद हिस मायेचा आधार

### माणुसकी वृध्द सेवालय जटवाडा रोड पुनर्वसनासाठी केले दाखल; वेदांतनगर पोलीस घेत आहेत नातेवाईकांचा शोध

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ डिसेंबर

छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन परिसरातील जागीरदार कॉलनीत एक अनोळखी महिला हि जोरजोरात वोरडत फिरत होती ती बेवारस अवस्थेत फिरत असल्याने स्थानिक नागरिकांनी डायल ११२ ला फोन करुन पोलीसांना माहिति दिली व वेदांतनगर पोलीसांनी जाहागीरदार कॉलनी येथे जाऊन बघीतले असता सदर महिला हि खूप हिंसक झाली होती तीस पोलीसांनी तात्काळ पोलीस स्टेशन वेदांतनगर येथे आनले तीला तीचे नाव गाव विचारले व तीने आपले नाव हे इंग्रजी भाषेत अलीरा मो.उद्दिन मसुद असे सांगीतले व पत्ता बदलागुड्डा नुरि मज्जीद जवळ हैद्राबाद असे सांगीतले असता वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रविणा यादव यांनी



नातेवाईक यांचा शोध घेत आहे.परंतु ती भोळसर वाटत असल्याने तीस शासकीय रुग्णालय घाटि येथे प्रथोमचाराकरीता पाठवले असता डॉक्टर यांनी तपासून

तिचे कोणीही नातेवाईक मिळत नसल्याने,तिच्या सुरक्षेच्या व मानवतेच्या दृष्टीने तिचे पुनर्वसन होण्यासाठी योग्य कारवाई होण्याबाबत प्रवीणा ताराचंद यादव पोलीस निरीक्षक वेदांतनगर यांनी महिलेच्या सुरक्षेच्या दृष्टीने तीच्या पुनर्वसनासाठी पुढे आल्या व मनोरुग्णासाठि काम करणार्याना सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेचे सुमित पंडित यांना सदर महिलेची माहिती दिली व पुणर्वसनासाठी सांगीतले असता माणुसकी समुहाच्या टिम ने तात्काळ मदतकार्या साठि पुढे आले.सुमित यांनी पोलीसांच्या मदतीने सदर महिलेस शासकीय रुग्णालय घाटि छत्रपती संभाजीनगर येथे प्रथोमचाराकरीता दाखल केले व प्रथोमचार करुन कागदोपत्री पुर्तता करुन सदर महिलेस आपले माणुसकी वृध्द सेवालय गावंदरी तांडा जटवाडा रोड येथे अन्न वस्त्र निवारा याकरिता पुनर्वसनासाठी माणुसकी वृध्द सेवालयाच्या संचालीका पुजा पंडित यांनी जबाबदारी स्वीकारली व सदर महिलेस वेदांतनगर पोलीसांनी व माणुसकी समुहाच्या टिम ने मदतकार्य केले या प्रवीणा ताराचंद यादव वरिष्ठ पोलिस निरीक्षक वेदांतनगर,संगीता गिरी पोलीस उपनिरीक्षक,पो.हे.का. देवकुमार सुर्यवंशी,पो.ह.वर्षा मुंढे,मनीषा दाभाडे,जारवाल,व

शेख सलमा व माणुसकी समुहाचे सुमित पंडित व वृध्दाश्रमाच्या संचालीका पुजा पंडित आदिनी मदतकार्य केले.

## मोकाट कुत्रे त्वचा रोगाने हैराण!सोयगाव तालुक्यातील प्रकार

### पाळीव कुत्र्यांनाही धोका : त्वचेवर आले आहेत फोड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ डिसेंबर

सोयगावशहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील बहुतांश मोकाट कुत्र्यांना स्किन इन्फेक्शन झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.शहरासह तालुक्यातही स्किन इन्फेक्शन झालेल्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीती पसरली आहे.

सोयगाव शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात भटके कुत्रे आहेत.या कुत्र्यांना त्वचेच्या आजाराची लागण झाल्याचे दिसून येते.पाळीव कुत्र्यांना त्यांचे मालक सकाळी व सायंकाळी फिरायला बाहेर काढत असल्यामुळे त्या पाळीव कुत्र्यांनाही आजाराची लागण होण्याची शक्यता वाढली आहे. स्किन इन्फेक्शनचा आजार पसरून वारंवार खाजविल्याने जागोजागी केस गळती होऊन असते आणि जंतू पाळीव कुत्र्याच्या संपर्कात आले तर पाळीव कुत्र्यांनाही लागण होण्याची शक्यता वाढली आहे.

पाळीव कुत्र्यांना लसीकरण आणि रेबीज देऊनही त्यांच्यावर अन्य दुसरे आजार जडते. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा संबंधित विभागांनी वेळीच विल्हेवाट लावण्याची मागणी शहरवासियांकडून होत आहे.

**मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त कोण करणार?**

शहरासह ग्रामीण भागात नवनवीन मोकाट कुत्रे आढळतात या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.तर ग्रामीण भागात ग्रामपंचायतीची आहे. या मोकाट कुत्र्यांचे लसीकरण पशुवैद्यकीय कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने करणे आवश्यक असते.अन्यथा ही समस्या गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**स्किन इन्फेक्शन कसे होते?**

कुत्र्यांमधील अस्वच्छता, संसर्ग, ऋतूनुसार ॲलर्जी, शरीरातील हार्मोनल असंतुलन, पिसू झाल्याने सतत अंग खाजवणे आणि चघळणे सुरुवात होते.

**उपचार कुठे कराल?** पाळीव कुत्र्याला जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये नेऊन उपस्थित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून झालेल्या स्किन इन्फेक्शन वेळीच तपासणी करून औषध उपचार करणे गरजेचे आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शेकोट्या पेटल्या...




**तेर** : तेर व परिसरात कडाक्याच्या थंडी पासुन बचाव करण्यासाठी तेर येथील नागरी शेकोटी करुन तापताना ग्रामस्थ.



## संक्षिप्त वृत्त...

### तुळजाभवानी मातेस भाविकाकडून अकरा तोळे सोन्याची माळ अर्पण

**तुळजापूर, दि.१ डिसेंबर -**



तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेस परभणी येथील भाविक जयश्री रमेशराव देशमुख, यांनी ११ तोळे सोन्याची माळ देवी चरणी अर्पण केली. यावेळी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे त्यांचा देवीची प्रतिमा, शाल, श्रीफळ देऊन देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री तुळजाभवानी संस्थानचे पदाधिकारी, देशमुख यांचे कुटुंब उपस्थित होते.

### क्रूझरच्या धडकेत बालकाचा मृत्यू

**परंडा, दि.१ डिसेंबर -**

रस्त्याच्या कडेला खेळत असलेल्या तेरा महिन्याच्या बालकाच्या अंगावरून क्रूझर गाडी गेल्यामुळे यामध्ये बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना परंडा तालुक्यातील शेळगाव या गावात घडली. मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव राजविर विजय धेंडे (वय १३ महिने, रा. शेळगाव ता. परंडा) असे आहे. दि.२६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता शेळगाव येथील ग्रामपंचायतच्या बाजूच्या रोडवर खेळत होता. त्यावेळी क्रुझर (क्र. एमएच २५/एएल ९२३६) चा चालक मल्हारी खटके (रा. पांढरेवाडी ता. परंडा) याने त्याच्या ताब्यातील कुझर ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून राजविर धेंडे याला धडक दिली. या अपघातात राजविर धेंडे हा गंभीर जखमी होवून मृत्युमुखी पडला. फिर्यादी विजय अरुण धेंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.




### आईच्या नावाने सुरु केला वाचन कट्टा

**नळदुर्ग, दि.१ डिसेंबर -**

आईच्या नावाने माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी सुरु केलेला वाचन कट्टा हा उपक्रम अतिशय स्तुत्य व लोप पावत चाललेल्या वाचन संस्कृतीला चालना देणारा आहे असे शिवसेनेचे माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे. आपल्या मातोश्री कै. यमुनाबाई अहंकारी यांच्या स्मरणार्थ विनायक अहंकारी यांनी आम्मा वाचन कट्टा सुरु केला आहे. या वाचन कट्ट्याचा शुभारंभ दि.१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला आहे. यामध्ये सर्व वर्तमानपत्रे व विविध पुस्तकं वाचण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. या कार्यक्रमास कमलाकर चव्हाण, शरद बागल, बसवराज धरणे, विलास येडगे, शिवाजी नाईक, उत्तम बनसगोळे, भगवंत सुरवसे, रमेश जाधव, उत्तम रामदासी, वसंत रामदासी, सुधीर पुराणिक, नंदकुमार जोशी, संजय जाधव, राजकुमार वैद्य, आकाश कुलकर्णी आदी उपस्थित होते.



### श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण

**मुरूम, दि.१ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग माहिती तंत्रज्ञान साहित्या केंद्र आयोजित करेल कथेच्या वतीने कट्टाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस आणि आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय करिअर कट्टा एक्सलन्स सेंटर महाविद्यालय म्हणून निवड झालेल्या सेंटरमध्ये पोलीस व आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यास प्रमाणपत्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांच्या हस्ते प्रा.डॉ. संजय अस्वले यांना देण्यात आले. पुणे येथील यशदा प्रशिक्षण केंद्रामध्ये युवा धोरण निश्चिती आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र प्रशिक्षण दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेत महाराष्ट्रातील निवडक सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालयामध्ये करिअर कट्ट्याच्या वतीने पोलीस प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यात आली आहे. या कार्यशाळेसाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. अस्वले आणि समन्वयक डॉ.ए.के. कटके, डॉ.सी.डी. करे आणि पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक मद्रे यांची उपस्थिती होती.

# अतिवृष्टीचे ३०८ कोटी २१ लाख रुपये अनुदान शेतकऱ्यांना तातडीने वाटप करावे

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची राज्याचे मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

सन २०२४ चे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे अतिवृष्टीचे ३०८ कोटी २१ लाख रुपये अनुदान प्रस्तावास मंजुरी देऊन शेतकऱ्यांना तातडीने वाटप करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे केली आहे.



धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने, जिल्हा प्रशासनाने सुरुवातीला ४ ऑक्टोबर रोजी परंडा, कळंब, धाराशिव, वाशी या तालुक्याचा अनुदान प्रस्ताव पाठवला होता. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे आग्रह धरल्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाने उमरगा आणि लोहारा या दोन तालुक्याचा ८६ कोटी ४६ लाख रुपयांचा प्रस्ताव पाठवला होता; मात्र त्या पुढील कालखंडात विधानसभेची आचारसंहिता लागल्यानंतर सदरील प्रस्तावास मंजुरी मिळू शकली नाही. सध्या प्रस्ताव राज्याच्या मुख्य सचिव यांच्याकडे आहे. राज्यात सध्या काळजीवाहू मुख्यमंत्री असल्याने शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अनुदान मिळत नाही. २०१९ ला ही अशीच परिस्थिती उद्भवल्यानंतर राज्याच्या मुख्य सचिवांनी त्या निधीला मान्यता देऊन अतिवृष्टी व सततच्या पावसाचे अनुदान दिले होते. त्याच पद्धतीने याही वर्षी शेतकऱ्यांना अनुदान द्यावे, अशी आग्रही मागणी केली आहे. धाराशिव जिल्ह्यातील दोन लाख ६० हजार ६९० शेतकऱ्यांना त्यांच्या दोन लाख ३९ हजार ७६७ हेक्टर वरील नुकसानी पोटी ३०८ कोटी सत्तावीस लाख रुपये मिळणार आहेत.

सदरील अनुदान प्रस्ताव अस तातडीने मान्यता देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी विनंती मुख्य सचिव सैनिक यांना अनिल जगताप यांनी केली आहे.

### शेतकरी संख्या व मिळणारी अनुदान रक्कम...

**धाराशिव** तालुक्यातील ६५६३३ शेतकऱ्यांना ४८ कोटी ४२ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. **परंडा** तालुक्यातील १४ हजार ३९५ शेतकऱ्यांना नऊ कोटी ४४ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. **कळंब** तालुक्यातील ६५३३१ शेतकऱ्यांना ७३ कोटी ४५ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. **वाशी** तालुक्यातील ३५ हजार ५७ शेतकऱ्यांना २२ कोटी १८ लाख अनुदान मिळणार आहे. **उमरगा** तालुक्यातील ४९ हजार २२८ शेतकऱ्यांना ५२ कोटी ७५ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तर **लोहारा** तालुक्यातील ३००६९२ शेतकऱ्यांना ३३ कोटी ७० लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

# तेर शिवारात दोन गटात तुंबळ हाणामारी

## ढोकी पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

तेर शिवारात दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या घटनेत सोमनाथ शेळके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फुलचंद पसारे, खुडू भक्ते, दादा पसारे, धनाजी भक्ते, सोमनाथ सौदागर, राजेंद्र पसारे, बाळा शिंदे, हरी भक्ते, नवनाथ पसारे आणि इतर तिघांनी त्यांना, त्यांच्या आईला आणि मेहुण्याला शिंदे यांच्या शेतात मेंढ्या चारल्याच्या कारणावरून मारहाण केली. आरोपींनी लाथाबुक्यांनी, दगड आणि काठ्यांनी मारहाण करून जखमी केले.

तसेच अनिल कुचेकर यांच्या खिशातील २५ हजार ६०० रुपये आणि विवो मोबाईल चोरून दुसऱ्या मोबाईलचा डिस्प्ले फोडला.

दुसऱ्या घटनेत, राजेंद्र पसारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सोमनाथ शेळके, बायडाबाई शेळके, अनिल कुचेकर, मनिषा कुचेकर आणि इतर पाच जणांनी त्यांना, त्यांच्या भावाला आणि पुतण्याला नवनाथ नाईकवाडी यांच्या कांद्याच्या रिकाम्या शेतात झालेल्या भांडणाच्या कारणावरून मारहाण केली.

आरोपींनी लाथाबुक्यांनी, काठ्या आणि लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. तसेच राजेंद्र पसारे यांच्या हातातील ५ ग्रॅमची अंगठी आणि दादासाहेब पसारे यांच्या खिशातील पाच हजार रुपये काढून घेतले.

दोन्ही गटांनी एकमेकांवर जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे. ढोकी पोलिसांनी दोन्ही तक्रारींची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

# मनोज जरांगे-पाटील यांचे येरमाळ्यात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१ डिसेंबर -**

अंतरवाली सराटी येथुन तुळजापुरकडे जाताना मनोज जरांगे-पाटील यांचे येरमाळा येथे जंगी स्वागत करण्यात आले.

आंतरवाली सराटी येथुन तुळजापुरच्या तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पन्नास चारचाकी वाहनांसह निघालेल्या मनोज जरांगे-पाटील यांचे येरमाळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मराठा युवकांनी जेसीबीच्या साहाय्याने हार घालून स्वागत केले.

त्यावेळी येरमाळा व परिसरातील मराठा युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१ डिसेंबर -**



धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठा आठवडी बाजार समजल्या जाणाऱ्या तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. वाशी तालुक्यातील तेरखेडा गावात दर शनिवारी मोठा आठवडी बाजार भरतो. या बाजारात कळंब, भूम, वाशी, आणि बार्शी तालुक्यातील अनेक गावचे व्यापारी, नागरिक खरेदी विक्रीसाठी येत आहेत. या बाजाराचे स्वरूप मोठे असल्याने बाजारात मोठी गर्दी असते, याच गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरीच्या घटना वाढल्या आहेत. यात दि.३० शनिवार रोजी सटवाईवाडी गावचे माजी सरपंच योगीराज फरताडे हे तेरखेडा गावात बाजार करत असतात चोरट्यांनी १३ हजार रुपये किंमत असलेला विवो कंपनीचा मोबाईल लंपास केला. गेली अनेक वर्षे झाली लाखो किंमतीचे मोबाईल चोरट्यांनी बाजारातून लंपास केले आहेत. पोलिसांच्या आशिर्वादाने हे प्रकार सुरू आहेत असे स्थानिक लोकांचे म्हणणे आहे. चोरीच्या घटनांमुळे तेरखेडा आठवडी बाजारात नागरिकांमध्ये, व्यापाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. पोलिसांना हे प्रकार माहीत असताना देखील आठवडी बाजारात कुठलीही सुरक्षा व्यवस्था करण्यात आली नाही. तेरखेडा आठवडी बाजार येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते आहे.

> मी तेरखेडा येथे शनिवारी दुपारी दीड च्या सुमारास बाजारात भाजीपाला खरेदी केला आणि गावाकडे वापस जात असताना घरी फोन करण्यासाठी मोबाईल खिशात बघितले तर मोबाईल नव्हता.
> - **योगीराज फरताडे**, माजी सरपंच सटवाईवाडी

# बाबुराव पाटलाने गणपतीच्या मूर्तीला अर्पण केले ४५ किलो चांदीचा मुकुट



## हनुमान गणेश मंडळासाठीचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१ डिसेंबर -**

शहरातील हनुमान चौक येथील हनुमान गणेश मंडळाच्या गणपती मूर्तीला ४५ किलोचा मुकुट बाबूराव पाटील या गणेश भक्ताने एक दिवसांपूर्वी अर्पण केले आहे. या गणेश भक्ताच्या धार्मिक सेवेबद्दल मंडळाने आभार मानले आहे.

मुरूम शहरातील हनुमान गणेश मंडळाच्यावतीने प्रतिवर्षी विविध सामाजिक उपक्रम अनेक कार्यक्रम यासह रक्तदान हेच श्रेष्ठदान या हेतूने रक्तदान शिबिराचे वर्षभरात अनेकवेळा उपक्रम राबवले जातात. गतवर्षी राज्यभरात एकापाठोपाठ एक होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या घटनांची पुनरावृत्ती राज्यात होऊ नये या हेतूने छत्रपती शिवरायांच्या काळातील महिलाविषयक धोरण या अनुषंगाने छत्रपती शासन या नावाने गणेश उत्सवात देखावा सादर करण्यात आला होता. या हनुमान गणेश मंडळाचे विशेष महत्त्व म्हणजे पर्यावरण पूरक असलेली सुबक व अप्रतिम गणपतीची मूर्ती आहे. या गणपतीवर हनुमान चौकातील बाबुराव गुरुलिंग पाटील व अविनाश हनुमंत पाटील यांची श्रद्धा व निस्सीम प्रेम या भक्तीमुळे त्यांनी या गणपतीच्या मूर्तीसाठी ४५ तोळे चांदीचा मुकुट हनुमान गणेश मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अर्पण करण्यात आला.



यावेळी हनुमान गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजापूर येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ डिसेंबर -**

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरातील नवीन बसस्थानक रोडलगत चक्री जुगार अड्यावर पोलिसांनी छापा टाकुन चक्री जुगार साहित्य व रोख रकमेसह १९,१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शुक्रवार (दि.२९) रोजी दुपारी तुळजापूर पोलिसांनी केली.

तिर्थक्षेत्र तुळजापूरात चक्री जुगार अड्यांचा सुळसुळाट वाढला असुन, नवेजुने बसस्थानक मंदीर परिरासरात सर्रास जुगार अड्डे गेल्या अनेक महिन्यापासुन राजरोस चालु आहेत. या चक्री जुगारास तरुण भाविक वर्ग बळी आहेत.

या जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत विश्वनाथ कॉर्नरकडुन नविन बसस्थानकडे जाणाऱ्या रोडलगत छापा टाकला.

यावेळी राम बाबुराव टकले (वय ३२, रा. बसवंतवाडी), राजु उर्फ कैलास कुंडीबा मोहिते (वय ४६, रा. गावठाण भागडे स्थळ काहेचीवाडी ता. खेड जि. पुणे ह.मु. हंगरगा पाटी ता. तुळजापूर) हे दोघे विश्वनाथ कॉर्नर कडुन नविन बसस्थानककडे जाणाऱ्या रोडलगत चक्री जुगाराच्या साहित्यासह एकुण १९ हजार १५० रुपये रक्कम स्वतःच्या कब्जात बाळगलेले आढळले.



यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय व उपजिल्हा रुग्णालयाच्यावतीने एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ डिसेंबर -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत गुणवत्ता कक्ष विभाग आणि उपजिल्हा रुग्णालय कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स दिन साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने महाविद्यालयात एड्स जनजागृती विषयी विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा घेण्यात आली तसेच एड्स विषयीच्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातून एड्स जनजागृती विषयी रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील पवार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिटकरी, डॉ. पुरुषोत्तम पाटील, वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रुग्णालय कळंब, समुपदेशक भंडारी प्रगती, कोळी परशुराम, ईश्वर भोसले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डॉ. लोंढे, आयएमए पूर्व प्रेसिडेंट ऑफ महाराष्ट्र, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संदीप महाजन, प्रा.डॉ. राघवेंद्र विठ्ठल, प्रा. अर्चना मुखेडकर, प्रा.डॉ. हेमंत चांदोरे, प्रा. गणेश आडे, प्रा.विलास अडसूळ, प्रा.डॉ. श्रीकांत भोसले, प्रा. ओमन, प्रा. बोबडे, प्रा. प्रताप शिंदे, तसेच महाविद्यालयीन कर्मचारी विनोद खरात, अमोल सुरवसे, मारुती केचे, शफिक शेख, अधीक्षक हनुमंत जाधव व सहाय्यक ग्रंथपाल अरविंद शिंदे आणि करा सेयो व एनसीसीचे स्वयंसेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

# वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एकमध्ये जलदगतीने परावर्तित करा

## आमदार कैलास पाटील यांच्या सूचना... जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्यासमवेत बैठक...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

धाराशिव शहरातील वर्ग २ जमिनी वर्ग १ करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या उपस्थितीत आ. कैलास पाटील यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी वर्ग दोनच्या जमिनी जलदगतीने वर्ग एकमध्ये परावर्तित कराव्यात, अशा सूचना आमदार कैलास पाटील यांनी दिल्या.

मराठवाड्यासह धाराशिव जिल्ह्यातील भोगवटदार वर्ग २ जमिनी वर्ग १ मध्ये नियमानुकुल करण्याबाबत २४ सप्टेंबर रोजी राज्य सरकारचा आदेश निर्गमित झाला आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने धाराशिव शहरातील भोगवटदार वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ मध्ये परावर्तित करण्यासाठी जिल्हा प्रशासन स्तरावर जलदगतीने पावले उचलावीत आणि शेतकरी, प्लॉटधारक नागरिक यांना न्याय मिळावा बैठकीचे आयोजन आले होते. यासाठी करण्यात आ. कैलास पाटील म्हणाले की, तहसील कार्यालयाकडे उपलब्ध असणारी सर्व माहिती ऑनलाइनवर अपलोड करावी, प्रस्ताव मंजूर करताना चेकलिस्टचा वापर करून सर्वांना एक सारख्या कागदपत्रांची मागणी करावी, गाव नमुना ९/३, ९/४ तयार करून क्लाउडर अपलोड करावे, इतर जिल्ह्यात वर्ग २ च्या जमिनीवर मध्ये परावर्तित करण्याबाबत काय कार्यवाही केली जात आहे. १ याची माहिती घ्यावी. ग्रामीण भागातील जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये परावर्तित करताना तहसील कार्यालय स्तरावर तसेच न.प. भागातील जमिनीचे रूपांतर करताना वॉर्ड निहाय कॅम्पचे आयोजन करण्यात यावे, ज्या जमिनींचा एन.ए. फायनल असेल त्यांना इतर कागदपत्रे न मागता वर्ग दोनमधून एक वर्ग एकमध्ये ५ टक्के नजराणा भरून परावर्तित करून द्याव्यात कारण त्यांना सर्व कागदपत्राची पडताळणी करून कार्यालयाने मंजूरी दिलेली आहे.



तहसील कार्यालय स्तरावर एक खिडकी तयार करून प्रस्तावाची सर्व कागदपत्रे उपलब्ध करावीत अशा सूचना देण्यात आल्या.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अवैध गौण खनिज पथक स्थापन : तहसीलदार हेमंत ढोकले

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील अवैद्य वाळू माती दगड, मुरूम उत्खनन वाहतुकीमध्ये खूप प्रमाण वाढले असल्याने व संबंधितअनेक तक्रारी प्राप्त झाल्याने अवैद्य गौण खनिज उत्खनन वाहतूक प्रतिबंधक करण्याच्या दृष्टीने कळंब तहसीलदार हेमंत ढोकले यांनी ग्रस्त पथक स्थापन करण्यात केले आहेत.

तालुक्यातील सात मंडळाधिकारी यांना तहसीलदार यांनी आदेशीत केले आहे.या पथकामध्ये मंडळ अधिकारी व त्या मंडळाच्या मंडळामधील सर्व तलाठी व एक सशस्त्र धारी पोलीस असणार आहे.

सह नियंत्रण अधिकारी म्हणून नाईब तहसीलदार महसूल हे या गस्त पथकाचे प्रमुख असणार आहेत. या कळंब मंडळाधिकारी व त्या मंडळातील सर्व तलाठी शस्त्रधारी पोलीस यांच्यासोबत गस्त घालणार आहे.

कळंब मंडळ अधिकारी व मंडळमधील सर्व तलाठी सोमवार आपल्या





कार्यक्षेत्रामध्ये गस्त घालणार आहेत. मंगळवार ईटकुर मंडळाधिकारी व सर्व तलाठी, बुधवार येरमाळा मंडळ अधिकारी व सर्व तलाठी, गुरुवार मंडळ अधिकारी व सर्व तलाठी, शुक्रवार मोह मंडळ अधिकारी व त्या मंडळातील सर्व तलाठी, शनिवार शिराढोण मंडळ अधिकारी व त्या मंडळामधील सर्व तलाठी, रविवार मस्सा मंडळ अधिकारी व त्या मंडळामधील सर्व तलाठी असे सप्ताहातील नियोजन असनार आहे.

या पथकांनी अवैद्य गौण खनिज व उत्खनन वाहतूक करणाऱ्याचा शोध घेऊन सदरील वाहन संबंधित पोलीस ठाणे येथे जमा करण्यात यावे अशी आदेश तहसीलदार यांनी काढले आहेत.

यामुळे संबंधित अवैद्य गौण खनिज करणाऱ्यामध्ये भीती निर्माण झाली आहे.

# उदगीर येथे माऊली ग्रुपच्यावतीने संतश्रेष्ठ माऊलीचा समाधी उत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ डिसेंबर -**

माऊली ग्रुपच्यावतीने संतश्रेष्ठ माऊलीचा समाधी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात त्रिवार गायत्री मंत्र पठणाने होऊन संत ज्ञानेश्वर माऊलीच्या प्रतिमेचे पुजन मनोज शिवनखेडे व शीतल शिवनखेडे व माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन झाले.

प्रास्ताविकात माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे यांनी एकमेकाच्या सुख आणी दु:खात सहभागी होणे हाच उद्देश असुन एकमेकाची काळजी घेणारा माऊली ग्रुप समाज व राष्ट्राप्रती काही देणे लागतो या उद्देशाने माऊली ग्रुपची स्थापना झाली आहे.

चांगले कर्म केले तर चांगले फळ मिळते यासाठी सतकर्म करा असे विचार व्यक्त केले.

यावेळी माऊली ग्रुपचे मार्गदर्शक, विलास बोके, माऊली ग्रुपचे उपाध्यक्ष मनोहर पांचाळ, सचिव मनोज शिवनखेडे, सुनिल पाटील, राम मोतीपवळे, शिवलिंग मठपती, अ‍ॅड. कपील बिरादार, अ‍ॅड. विजय दिक्षीत, शिवाजी चिल्ले, शिवशंकर जिवणे, संजय दुणगे, विजय कळसे, संतोष काळेकर, भरत कोयले, मन्मथ मुळे, मिरा डोईजोडे, शितल शिवनखेडे, सविता बोके, कमल दुनगे, रत्नमाला मठपती, संगीता मठपती, सावित्री कोयले, सोनाली काळेकर, गोदावरी जिवणे, सुवर्णा शेट्टे, किर्ती दिक्षीत, संतोषी कळसे, भाग्यश्री बिराजदार, सुनिता चिल्ले, छाया मुळे, संगीता मोतीपवळे, माधवराव शिवनखेडे, आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचलन संजय दुनगे यांनी तर आभार प्रा. संजय पाटिल यांनी मानले.

# संत अधिष्ठानाशिवाय भगवान परात्माची प्राप्ती नाही : हभप. रामभाऊ महाराज निंबाळकर

## ब्रह्मांडनायक संत बाळूमामा मंदिर परंडा येथे भंडारा उत्सव संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ डिसेंबर -**

परंडा शहरातील ब्रह्मांडनायक संत बाळूमामा मंदिर या ठिकाणी अमावस्या उत्सवानिमित्त सकाळी श्री बाळूमामा मूर्तीला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर उपस्थित भजनी मंडळ यांचा भाजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सकाळी १० ते १२ वेळेत संत स्वामी रघुराज महाराज यांचे विद्यमान वंशज गुरुवर्य रामभाऊ महाराज निंबाळकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. कीर्तनामध्ये महाराज प्रबोधन करताना म्हणाले की, आपण भाग्यवान आहोत कारण आपल्या ला मनुष्य देह प्राप्त झाला आहे. परमार्थ घडण्यासाठी खुप मोठी पुण्याई लागते.संताच्या संगतीशिवाय मानवी जिवनाची परिपुर्णता नाही. दुसऱ्याच्या सुखामध्ये संत सुख मानतात दुसऱ्याच्या दु:खा एकामध्ये संत दु:ख मानतात. केवळ सर्वसामान्य जिवावर उपकार करण्याकरता या पृथ्वीतला संत अवतार घेत असतात. हे मत महाराजांनी कीर्तनामध्ये प्रतिपादन केले.



कीर्तनानंतर हभप. मुरलीधर महाराज बोराडे यांची अन्नदान सेवा संपन्न झाली. चहा व्यवस्था गणेशसिंह सद्दिवाल, कण्या अबिंल व्यवस्था अनंतसिंह सद्दीवाल, पाणी जार व्यवस्था भालचंद्र अवसरे यांच्या वतीने करण्यात आली होती.

यावेळी हभप. नवनाथ महाराज साठे, हभप. नागेश महाराज मांजरे, हभप. रामराजे महाराज भोसले, हभप. विठ्ठल महाराज पाटील, हभप. बालाजी महाराज बोराडे, हभप. सुरज महाराज रणभोर, तात्या महाराज हजारे, कृष्णा महाराज चव्हाण, परमेश्वर नेटके, बळीराम कोळी, अंकुश जमदाडे, मारूती महाराज बारस्कर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मंदिर समितीच्या केशरताई वैरागे मदने यांनी केले होते.

# दगडोजीराव देशमुख फार्मसीत नुतन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ डिसेंबर -**

तालुक्यातील आलमला येथील ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारासाठी शिक्षण या बिद्र वाक्यातून निर्माण झालेल्या श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीरावा देशमुख फार्मसी महाविद्यालयात या वर्षी डी. फार्मसीच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या नुतन विद्यार्थ्यांचे व्हाईट कोट सिरेमनी कार्यक्रमात त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत संस्थेच्या वतीने पांढया रंगाचा कोट व पुष्पगुच्छ देवुन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे शैक्षणिक विभाग प्रमुख प्रा.एस.एस. वागदरे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, गापोळ माळी, पायल जाधव, बालाजी विभुते, अजहर ठेंगाडे, प्रतिक धाराशिवे, कोमल गिरी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. कैलास कापसे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा चढता आलेख विद्यार्थी व पालकांसमोर मांडला. तसेच पांढऱ्या रंगाचा कोट सकारात्मकतेचे प्रतिक आहे. फार्मासिस्ट रूग्ण आणि डॉक्टर यांच्यामधील दुवा असल्याचे प्राचार्य कापसे यांनी सांगितले.

तसेच विद्यार्थ्यांसाठी पालकत्व योजना राबवुन त्यांच्या अडीअडचणीचे समाधान केले जाते.

महाविद्यालयातील डिजीटल लायब्ररी, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय जर्नल्स, अत्याधुनिक प्रयोगशाळा यांचा भरपूर वापर करुन विद्यार्थ्यांनी आपली स्वत:ची ओळख निर्माण करावी, असे मत प्राचार्य कापसे यांनी यावेळी व्यक्त केले केले.

प्रा.एस.एस. वागदरे यांनी फार्मसी क्षेत्राची निवड केल्याबद्दल व या क्षेत्रात असलेल्या विविध करिअर व संधी याबाबत माहिती देवुन अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास व्हावा म्हणुन क्रीडा स्पर्धा, विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी व्हावे.

शिक्षणाबरोबर सुसंस्कार, आदर भावना अशा या नैतिक मुल्यांचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य महाविद्यालयाच्या वतीने केले जात असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सूत्रसंचालन प्रा. पायज जाधव यांनी केले तर विभाग प्रमुख प्रा. गोपाळ माळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुबाबा उत्सवाची गोपाळकाल्याने सांगता

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ डिसेंबर -**

सदगुरू गुरुबाबा महाराज आणि रामकृष्ण महाराज यांच्या वार्षिक उत्सवाची निलंगा शहरातून सद्गुरूंच्या पालखीची नगर प्रदक्षिणा होऊन नंतर श्रीक्षेत्र बारवं येथे दहीहंडी गोपाळकाला फोडून उत्साहात सांगता झाली.

२५ नोव्हेंबरपासून श्रीक्षेत्र निलंगा बारवं यथे श्री गुरुबाबा महाराज व रामकृष्ण महाराज यांच्या उत्सवास स्थापनेने आरंभ होऊन आज शुक्रवार दि.२९ रोजी गोपाळकाल्याने हजारो भाविकांच्या उपस्थितीत सांगता झाली. यावेळी ज्ञानोबा तुकाराम ाच्या, सद्गुरूंच्या आणि विठ्ठलाच्या नाम गजराने बारवं क्षेत्र परिसर दुमदुमून गेला होता. पिठाधीपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात आणि सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनात आणि हभप. श्रीरंग महाराज व हभप. ज्ञानराज महाराज औसेकर यांच्या सहभागात मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाला. या उत्सवात हभप. वीरनाथ महाराज शेडजी निटूरकर, हभप. ज्ञानराज महाराज औसेकर, हभप. श्रीरंग महाराज औसेकर. सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर व सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा गुरुबाबा रामकृष्ण महाराज यांच्या समाधी समोर संपन्न झाली. निलंग्याच्या बारवं क्षेत्री दरवर्षी होणाऱ्या उत्सवात निलंगा व पंचक्रोशीतील नित्यनेमाचे सदभक्त शिष्य आपली सेवा विरनाथ महाराज चरित्र ग्रंथाचे पारायण कडाक्याच्या थंडीचे दिवस असताना मोठ्या उत्साहाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून करतात.

या उत्सवात जवळपास ३० ते ४० गावातून ज्ञानोबा तुकाराम, सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज आणि रामकृष्ण गुरुबाबा महाराज यांच्या नावाचा जयघोष करीत आपापल्या गावातून निलंग्यात उत्सव स्थळी येतात.

हजारो टाळकरी, भाविक भक्त, कीर्तन, चक्रीभजन, प्रवचन दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतात, सलग पाच दिवस निलंग्यात या उत्सवामुळे भक्ती उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

# व्यंकटेश महाजन महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात आर्थिक साक्षरता व संपत्तीचे व्यवस्थापन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख व्याख्याते म्हणून लातूर येथील योगेश मिरजगावकर हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.



या कार्यशाळेमध्ये आर्थिक साक्षरता या विषयावर व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले. संपत्तीचे व्यवस्थापन कशा पद्धतीने केले पाहिजे तसेच गुंतवणुकीचे वेगवेगळे पर्याय यावेळी त्यांनी सांगितले. शेअर मार्केट व म्युच्युअल फंड यामध्ये केली जाणारी गुंतवणूक याविषयी देखील त्यांनी मार्गदर्शन केले .

हि कार्यशाळा महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी केले. प्रास्ताविकात या कार्यशाळेच्या आयोजानामागची भूमिका विषद केली. प्रत्येकाच्या जीवनात आर्थिक नियोजन का महत्वाचे आहे. या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रमोद बेरळीकर यांनी केले.

या कार्यशाळेत प्राध्यापक वर्ग, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंगरुळ येथे हजरत ख्वाजा सैपन मुल्क दर्गाहचा जिर्णोद्धार व कळसारोहन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे हजरत गैबीपीर दर्गाह जवळ हजरत ख्वाजा सैपन मुल्क (र.अ) यांच्या दर्ग्याचा जीर्णोद्धार व कळसा रोहन गुरुवार २८ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला असून बुधवार २७ नोव्हेंबर रोजी ऊरुसनिमित्त सायंकाळी सहा वाजता मंगरूळ येथील मुलांनी परिवाराच्या घरून संदलची पारंपरिक वाद्य व नात, मुशायरे मिलाद म्हणत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

ही मिरवणूक रात्री ८ वाजता दर्ग्यावर पोहोचल्यानंतर उपस्थित मुलाणी परिवार, नातेवाईक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत संदल



चढवण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. मागील सहा महिन्यापासून या दर्गाहाचे बांधकाम चालू होते.

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दि.२८ नोव्हेंबर रोजी हैद्रा (ता. अक्कलकोट) येथील हजरत ख्वाजा सैपन मुल्क (र.अ) यांचा उरुस संपन्न झाल्यानंतर मंगरूळ येथील उरूस साजरा करुन उपस्थित भाविकांच्या हस्ते कळसारोहन करण्यात आले.

उरुसानिमित्त काटगाव, मुंबई, अकलुज, कोल्हापूर, कुंभारी, वडगाव (गांजा) जळकोट, माकणी, कनगरा, होर्टी, मेंढा, तुळजापूर, मंगरूळ, खोताचीवाडी, सरडेवाडी, तीर्थ बुद्रुक, तीर्थ खुर्द, बिजनवाडी, पोहनेर, कसई, निलेगाव इत्यादी परिसरातील भाविक व नातेवाईक यांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

या उरुसानिमित्त बाबालाल मुलाणी व सलीम (हज्जु) मुलाणी यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# लातूरमध्ये ६ डिसेंबरपासून जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१ डिसेंबर -**

क्रीडा व युवक सेवा आयुक्त कार्यालय, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालय, लातूर जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ७ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृह व जिल्हा क्रीडा संकुलाच्या इनडोअर हॉल येथे हा युवा महोत्सव होईल.

युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देणे व त्यांना एक खुले व्यासपीठ करण्याच्या हेतूने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे, युवकांना विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्व पटवून देणे, शिक्षण, उद्योग-व्यवसाय यासोबतच शेती या व्यवसायासी युवकांची ओळख करुन देणे, सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्व युवकांना पटवूण देणे, हा युवा महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. युवा महोत्सवात सांस्कृतिक कला प्रकार : समुह लोकनृत्य (सहभाग संख्या १०), लोकगीत (सहभाग संख्या १०), कौशल्य विकास : कथा लेखन, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, कविता स्पर्धा. संकल्पना आधारीत स्पर्धा : विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना आधारित विज्ञान प्रदर्शन. युथ आयकॉन : जिल्ह्यातील युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित करणारे कार्य केलेले १५ ते २९ वयोगटातील ५ युवक.

जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये लातूर जिल्हयातील १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभाग घेवू शकतात. त्यांचे वय १२ जानेवारी २०२५ या दिनांकापर्यंत परिगणना करण्यात येईल. यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, संगीत कॅडमी, महिला मंडळ, महिला बचत गट, युवकांसाठी कार्य करणाऱ्या स्वंयसेवी संस्था, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) इत्यादी संस्थेतील युवक व युवती यांना सहभागासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. युवा महोत्सवामध्ये प्रत्येक कलाप्रकारासाठी विजयी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षीस, स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर विजयी युवक-युवती स्पर्धकांना विभागीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

जिल्ह्यातील १५ ते २९ वयोगटात असलेल्या ५ युवकांची नावे विभागस्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहेत. तसेच विभागस्तरावरून ५ युवकांची नावे राज्यस्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार असून राज्यस्तरावरून एकूण १० युवकांना राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी पाठविण्यात येणाऱ्या संघामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये युवांच्या भारत निर्माणासाठी नवीन संकल्पना विचारात घेऊन युवांना राष्ट्र निर्माणामध्ये सहभागी करून, त्यांची दूरदृष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय युवा महोत्सव अंतर्गत विकसित भारत यंग लिडर्स डायलॉग अंतर्गत खालील संकल्पना निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

विकसित भारत क्विझमध्ये वैयक्तिकरित्या युवांना सहभागी होता येईल. यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा ही सामान्यज्ञान व भारताची कामगिरी या बाबींवर होणार आहे. ‘माय भारत’ पोर्टलवर शैक्षणिक संस्था व कॉलेज यांनी सहभाग नोंदवावा ही स्पर्धा ही २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग घ्यावा. यामध्ये सहभागी होणाऱ्या युवकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. विकसित भारत यावर निबंध लेखन स्पर्धा घेतली जाईल यामध्ये शब्द मर्यादा १००० शब्दांची राहील. प्रथम टप्प्यात सहभागी होवून निवड झालेल्या युवांचा यामध्ये सहभाग राहील. वर नमूद केलेल्या विषयावर निबंध लेखन करता येईल. यामधील सहभागासाठी प्रमाणपत्र देण्यात येईल. निबंध स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने ८ ते १५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. विकसित भारत पीपीटी चॅलेंजवर नमुद केलेल्या विषयांवर राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक राज्यातून ४ युवांची निवड करण्यात येणार आहे. राज्यस्तरावरून यासाठी राज्याचा संघ निवड करण्यात येणार आहे. निबंध माय भारत पोर्टलवर अपलोड करावयाचे आहेत. २० ते २६ डिसेंबर २०२४ या कालावधीत ही स्पर्धा होणार आहेत. राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेल्या युवांना प्रथम ११ जानेवारी २०२५ रोजी सादरीकरण करावे लागेल. यामधून अंतिम फेरी साठी निवड झालेल्या युवांना पंतप्रधान यांच्यासमोर संकल्पनांचे सादरीकरण करावयाचे आहे. १२ जानेवारी २०२५ रोजी सदर सादरीकरण होणार आहे.

तरी लातूर जिल्ह्यातील इच्छुक युवक व युवतींनी आपली नावे ४ डिसेंबर, २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे नोंदवावीत. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी कळविले आहे.

# औंढा नागनाथ येथे श्रीराम कथेस प्रारंभ

## हजारो नागरिकांची कथा ऐकण्यासाठी सभामंडपात गर्दी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ डिसेंबर**

शहरात श्रीराम कथेअंतर्गत आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ मंदिर परिसरामध्ये श्रीरामचरित-मानस वर आधारित श्रीरामकथा-मानस सहस्त्रनाम एक डिसेंबर पासून सुरुवात झाली. ३० नोव्हेंबर रोजी औंढा शहरातील प्रमुख मार्गाने श्रीराम कथा ग्रंथ दिंडी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ग्रंथ दिंडीचे पूजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते. यावेळी सिध्दनाथ संस्थान गांगलवाडीचे आत्माराज गिरी महाराज यांचेहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

औंढा नागनाथ शहरात आजपासून श्रीराम कथा वाचनास सुरुवात झाली असून कथा वाचन रवींद्र पाठक यांच्या मधुरवाणीतून रामकथा ऐकण्यासाठी औंढा शहरासह परिसरातील महिला, पुरुष तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासाठी भव्य व्यासपीठाची आणि श्रोत्यांना बसण्यासाठी आयोजकांच्यावतीने आसन व्यवस्था करण्यात आली आहे. १ डिसेंबर ते ७ डिसेंबर या कालावधीत सकाळी साडेनऊ ते बारा तसेच संध्याकाळी साडेपाच ते सात या कालावधीत कथा वाचन होणार आहे. आयोजक नागनाथ इनामदार यांच्यावतीने निशुल्क सकाळ-संध्याकाळ भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# राहोली फाटा येथे शंकरपटाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांचेहस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ डिसेंबर**

तालुक्यातील राहोली फाटा येथे दि १ डिसेंबर रोजी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांचेहस्ते शंकरपटाला सुरुवात करण्यात आली.

यप्रसंगी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि रामोड, सरपंच रवी डोरले, सपोनि शंकर जाधव, सुधीर ढेंबरे, आसलम गारवे, प्रकाश कांबळे, विजय चव्हाण, सोडगिरे, सुनील जाधव, अभिषेक सोडगिरे, सचिन डोरले आदींची प्रमुख उपस्थिती होती. तालुक्यातील राहोली फाटा येथे एक डिसेंबर रोजी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले होते. या शंकरपटासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांच्या बैलजोड्या आणल्या होत्या. शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शंकरपटात पहिल्या येणाऱ्या बैलजोडीला पंधरा हजाराचे पारितोषिक देण्यात आले. शंकरपटासाठी समितीच्यावतीने बैलांना धावण्यासाठी मैदान चांगल्याप्रकारे तयार करण्यात आले होते. यावेळी परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# रेल्वे स्थानकावरील कॅन्टीनचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० नोव्हेंबर**

येथील रेल्वे स्थानकावरील नवीन कॅन्टीनचे उद्घाटन झेडआरयुसीसीचे सदस्य राकेश भट्ट यांचेहस्ते दि १ डिसेंबर रोजी थाटात करण्यात आले. त्यामुळे आता हिंगोली स्थानकावर प्रवाशांना नाश्ता आणि चहाची सोय होणार आहे.

हिंगोली रेल्वेस्थानकाचे नव्यानेच बांधकाम करण्यात आले होते. परंतु रेल्वेस्थानकावर प्रवाशांसाठी कॅन्टीन नसल्यामुळे चहा किंवा नाश्ता उपलब्ध होत नसे. या कॅन्टीनवर अनधिकृतपणे ताबा घेवून त्यामध्ये सामान ठेवण्यात आले होते. रेल्वे प्रशासनाने नुकतेच पोलिस बंदोबस्तात कॅन्टीनवरील अनधिकृत ताबा काढला. हिंगोली रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे परंतु प्रवाशांना पाणी, चहा, नाश्ता मिळत नव्हता आता नवीन कॅन्टीन सुरू झाल्यामुळे येथे प्रवाशांची सोय होणार आहे. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा, माजी नगरसेवक जीतसिंग साहू, माजी नगरसेवक ॲड राजेश गोटे, प्रा सुखदेव बलखंडे, गवई, कय्युम पठाण आदींची उपस्थिती होती.

# मुटकुळेंना मंत्रीपद मिळावे यासाठी मारोतीला अभिषेक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० नोव्हेंबर**

आडगाव व फाळेगाव सर्कल मधील सर्व भाजप कार्यकर्ते यांनी आमदार तानाजीराव मुटकुळे यांना जनतेने तिसऱ्यांदा निवडून दिले आहे. त्यांना पुढील काळात राज्याचे मंत्री म्हणून संधी मिळावी या करिता सर्व भाजप कार्यकर्ते यांच्या वतीने माळहिवरा येथील जागृत हनुमान मंदिर येथे अभिषेक करण्यात आला.

यावेळी सर्व भाजप कार्यकर्ते यांच्या वतीने महाआरती करून देवाला साकडे घालण्यात आले आहे. या वेळी उपस्थित राजाराम पाटील आडगाव, ॲड अमोल जाधव, शंकर पाटील वडदकर, भानुदास वाबळे, भिंगीकर, गणेश मुटकुळे, विठ्ठल मुटकुळे, विठोबा मुटकुळे, विक्रम जाधव, सदाशिव मुटकुळे, दत्तराव जाधव, ज्ञानोबा वसू, दत्तराव पोहरे, ज्ञानोबा मुटकुळे, पांडुरंग मुटकुळे, संजू पाटिल, मंसाराम गुरुजी, रामेश्वर गायकवाड, सुधाकर गायकवाड, रमेश पाटील आडगाव, संजय जाधव, सुनिल वसू, सुनिल जाधव, लक्ष्मण बॉस, अनिल जाधव, शिवाजी लोंढे, शंकर पाटील आडगाव, सारंगधर.मुटकुळे, भागवत आगलावे, राजू आगलावे, दंडे म हाराज, दत्ता दंडे, राजाराम पाटील बोडखी, गणेश रसाळ, पिराजी रसाळ, परमेश्वर रसाळ, शेषराव रसाळ, शेषराव पाटील आडगाव, राजाराम पाटील आडगाव, नामदेवराव इंगोले पाटील अंबाला, बंडू कहाळे, जामठी तसेच परिसरातील अनेक कार्यकर्ते हजर होते. त्यांनी हनुमान मंदिर माळहिवरा तेथें मंत्री पद मिळावे म्हणून पदासाठी देवाला प्रार्थना केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### महावीर नगर बागेत डीपी न हटवताच कामे



हिंगोली- शहरानजीक असलेल्या महावीर नगर येथे सध्या बागेचे काम चालू आहे. या बाबेच्या मध्यभागी महावितरण कंपनीचा मोठा डीपी आहे. परंतु हा डी पी न हटवताच बागेचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे हा डी पी धोकादायक बनला असून जीवीतहानी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तत्काळ डी पी एका बाजूला हलविण्यात यावा अशी मागणी येथील रहीवाशांमधून होत आहे.

### शनि आमवस्येनिमित्त खटकाळी हनुमान मंदिरात कडाक्याच्या थंडीतही भाविकांची गर्दी



हिंगोली- शहराचे ग्रामदैवत असलेल्या खटकाळी हनुमान मंदिरात शनी आमवस्येनिमित्त महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. मंदिराचे पुजारी यांचेहस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी कडाक्याच्या थंडीतही भाविकांनी हनुमानाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

# हिंगोलीत दिवसभर आभाळ आणि थंडी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ डिसेंबर**

हिंगोली शहरासह जिल्ह्यात रविवार दि १ डिसेंबर रोजी सकाळपासूनच आभाळ आणि कडाक्याची थंडी असल्यामुळे नागरिक हैराण झाल्याचे दिसत होते.

मागील आठवड्यापासून जिल्ह्यात कडाक्याची थंडी पडत असून नागरिक शेकोट्या करीत थंडीपासून संरक्षण करीत असतांना दिसत आहेत. रविवारी आभाळ असल्यामुळे दिवसभरात क्वचीतच सुर्यदर्शन झाले. नागरिकांना गरम स्वेटर आणि उबदार कपडे घालून घरात बसणे पसंद केले.

# महिला व बालविकास विभागाच्यावतीने कळमनुरी तालुक्यात आंतरराष्ट्रीय दत्तक महिना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ डिसेंबर**

महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्ह्यात नोव्हेंबर महिना हा आंतरराष्ट्रीय दत्तक महिना म्हणून साजरा केला जातो. या दत्तक महिना निमित्ताने कळमनुरी, आखाडा बाळापूर येथील पोलीस स्टेशन, बसस्थानक, उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी उपस्थितांना दत्तक इच्छुक पालकास कायदेशीर दत्तक प्रक्रियेसंदर्भात माहिती देण्यात आली. दत्तक इच्छुक पालक यांचे संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करुन कायदेशिररित्या बालकास दत्तक घेऊ शकतात. तसेच प्रतिपालकत्व स्वीकारु इच्छिणाऱ्या पालकांसाठी बालगृहातील काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांचे प्रतिपालकत्व स्वीकारणे तसेच जिल्ह्यात विधवा माता, कुमारी माता यांना नको असलेल्या नवजात बाळाचे सुखरुप सम र्पण करण्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

अनाथ, सोडून दिलेले, परित्याग केलेले बाळ इत्यादी बालकांसंदर्भात माहिती मिळाल्यास तात्काळ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय हिंगोली किंवा चाईल्ड हेल्प लाईन (१०९८) यांना संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी केले.

यावेळी महिला व बालविकास विभागाने तयार केलेले पोस्टर्स, जाहीर आवाहन संपर्क क्रमांकासह, भिती पत्रके लावण्यात आली. याप्रसंगी जिल्हा बाल संरक्षण कक्षातील बाल संरक्षण अधिकारी संस्थाबाह्य जरीबखान पठाण, चाईल्ड हेल्प लाईन (१०९८) चे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे, समुपदेशक अंकुर पाटोडे उपस्थित होते.

# गावपातळीवरील व्यापाऱ्यांना महासंघ संरक्षण देणार- हस्तीमल बंब



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ डिसेंबर**

गुंतागुंतीचे नवीन नवीन कायदे यामुळे त्रस्त असलेल्या थेट गाव पातळीवरील व्यापाऱ्यांना संरक्षण देण्याकरिता व्यापारी महासंघ कटिबद्ध असून देशातील किरकोळ व्यापाऱ्यांची एकमेव असलेली कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स या संघटनेच्या माध्यमातून केंद्र शासनाचे अनेक कायदे व्यापाऱ्यांना कसे फायदेशीर ठरतील याबाबत सातत्याने पाठपुरावा करीत आहे. प्रत्येक गाव ते शहर पातळीपर्यंत व्यापारी क्षेत्रात महिलांचा जो सहभाग वाढत आहे. त्यांना प्रशिक्षित करून व्यवसाय वाढीकरता प्रयत्न करण्याचे काम होत असल्याचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष हस्तीमल बंब यांनी हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने आयोजित संवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना विचार व्यक्त केले तसेच हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाने व्यापाऱ्या करता केलेल्या व करीत असलेल्या कामांचा बद्दल गौरवोद्गार काढले.

कॉन्फिडेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या सोबत मराठवाडा विभागीय सचिव सुखदेव बजाज, मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष सौ. सिता मोहिते पाटील, सचिव सौ. आनंदी अय्यर, गोविंदजी साकला ,रामजी मोहिते कॅटचे राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवाणी, हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल यांची प्रमुख्याने उपस्थिती होती.

सुखदेव जी बजाज यांनी मराठवाडा स्तरावरील संघटनेच्या कार्याचा आढावा सादर केला तर सौ. सिता मोहिते पाटील यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करून महिलांनी व्यवसाय व्यापारात उतरणे महत्वाचे असून ज्यामुळे व्यवसाय वृद्धी होऊन कुटुंबाच्या उत्पन्नाचे स्त्रोत पण वाढणार असून महिलांना यातून सन्मानाचे स्थान पण मिळणार असल्यामुळे महिलांनी या क्षेत्रामध्ये धाडसीने व चिकाटीने काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

याच कार्यक्रमात हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाचे विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या ज्यात प्रशांत सोनी गोल्डी सेठ, राजेश बगडीया यांची जिल्हा उपाध्यक्ष म्हणून रवींद्र सोनी यांची जिल्हा सचिव, ओम नैनवाणी जिल्हा सहसचिव, पवन राठी व रजनीश पुरोहित यांची हिंगोली शहर उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली तसेच हिंगोली जिल्ह्यातील व्यवसाय व्यापारात असणाऱ्या महिलांच्या संघटनाची बांधणी करण्याचे ठरले असून हिंगोली येथील सौ शीतल बालाप्रसाद तापडिया यांची हिंगोली जिल्हा महिला व्यापारी संघाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

व्यापारी संवाद कार्यक्रमात प्रामुख्याने दिलीप चव्हाण, सुरेश आप्पा सराफ गजेंद्र बियाणी, जगजीतराज खुराणा, दिपक सावजी, मधुर भन्साळी, सेनगाव तालुका अध्यक्ष राजकुमार देशमुख, सचिव निलेश जैन, हिंगोली तालुका अध्यक्ष संजय देवडा, कळमनुरी तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत देशमुख, माबूत बागवान, सुभाष तापडिया, तन्वीर नाईक, शुभम मुंदडा, आनंद चौधरी, सुमीत चांडक, कार्तीक चांडक, अंकित बगडीया, सागर दुबे, जुबेर मामू यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला उपस्थित होत्या.